सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ १९२६
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ९ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १८० | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघ हिंदू समाजाला सामर्थ्य संपन्न करू इच्छितो, संघाची इच्छा आहे की, ही शक्ती नेहमीच स्वाभाविक पद्धतीने समाजात विद्यमान राहावी. कोणत्याही बाह्य संघटनेद्वारा सदैव समाजाचे रक्षण केले जावे, हे योग्य नाही. समाजाने नेहमीच स्वतःच्या समस्या स्वतः सोडविल्या पाहिजेत. संघ अशा प्रकारच्या स्वाभाविक शक्तीला जागृत करत आहे.

**- बाळासाहेब देवरस,**
रा. स्व. संघाचे तृतीय सरसंघचालक

### विनम्र अभिवादन



महाराणा प्रताप यांची आज जयंती

**युद्ध झाल्यास पाकिस्तान केवळ सात दिवस धरू शकेल तग**

(पान ३ वर)

# काश्मिरात युद्धाचे ढग

**पाककडून ड्रोन हल्ले, भारताचा जोरदार प्रतिकार**


**पाकिस्तानचे एफ-१६ जेट पाडले**

**भारताच्या सीमावर्ती भागात पाकिस्तानने डागली क्षेपणास्त्रे**

**जम्मू विमानतळ, पंजाबच्या गुरदासपूरमध्ये रॉकेट हल्ला**

**सांबा भागात अनेक क्षेपणास्त्रे हवेतच केली नष्ट**

**जम्मू, गुरदासपूर, पठाणकोटमध्ये ब्लॅकआऊट, मोबाईल सेवा विस्कळीत**






◆ **श्रीनगर, ८ मे**

भारत- पाकिस्तानच्या तणावादरम्यान गुरुवारी रात्री काश्मिरात युद्धजन्य स्थिती निर्माण झाली. पाकिस्तानच्या लष्कराने रात्री ८ वाजताच्या सुमारास जम्मू-काश्मीरसह पंजाबच्या सीमावर्ती भागात क्षेपणास्त्र हल्ल्यासह अंधाधुंद गोळीबार केला. यानंतर जम्मूसह पंजाबच्या पठाणकोट आणि सीमेवरील भागात ब्लॅकआउट करण्यात आले. पाकने जम्मू विमानतळ, पठाणकोट विमानतळासह निवासी भागात डागलेले अनेक क्षेपणास्त्र भारताच्या संरक्षण प्रणाली एस-४०० सुदर्शनने नष्ट केले, तसेच सुरक्षा दलाने पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले.

सांबा येथे पाकिस्तानकडून जोरदार गोळीबार केला. त्यानंतर जम्मूतील आरएसपुरा सेक्टरमध्ये ब्लॅकआउट लागू करण्यात आला आहे, येथे सायरन वाजत होते. यावेळी जम्मू शहरात मोबाईल नेटवर्क सेवा विस्कळीत झाली. सतवारी कॅम्पवर क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला. दुसरीकडे, कुपवाडामध्येही जोरदार गोळीबार झाला. ज्याला भारताच्या सुरक्षा दलाने पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर दिले. भारताच्या एस-४०० ने पाकिस्तानची बहुतांश क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट केली. याशिवाय काश्मिरातील राजौरीसह अनेक भागातील भारतीय सीमेवर दोन्ही बाजूने जोरदार गोळीबार सुरू होता. *(वृत्तसंस्था)*



## काय आहे एस ४०० सुदर्शन?

भारताची एस ४०० सुदर्शन ही एअर डिफेन्स मिसाईल यंत्रणा जगातील सर्वात अत्याधुनिक लांब पल्ल्याची एअर डिफेन्स मिसाईल सिस्टीम मानली जाते. भारताने रशियाशी एकूण ५ एस ४००चा करार केला आहे. त्यातील तीन भारतीय ताफ्यात आधीच दाखल झाली असून उर्वरित दोन २०२६ पर्यंत दाखल होण्याची शक्यता आहे. २०१८ मध्ये यासाठी भारताने रशियासोबत ३५ हजार कोटींचा करार केला होता. एका एस-४०० स्क्वाड्रनमध्ये एकूण १२ लाँचर्स, अत्याधुनिक रडार आणि कंट्रोल युनिट असते. मोठ्या संख्येने मिसाईल्स एकाच वेळी डागण्याची क्षमता एस-४०० मध्ये असते. -४०० शत्रूराष्ट्राकडून येणारी विमाने, फायटर जेट्स, ड्रोन, क्रूज आणि बॅलेस्टिक मिसाईल्स यांचा ४०० किलोमीटरच्या अंतरावरूनही माग काढून त्यांचा वेध घेऊ शकते.

# पाकची हवाई यंत्रणा उद्ध्वस्त



◆ **नवी दिल्ली, ८ मे**

भारतीय हवाई दलाने 'एस-४०० सुदर्शन चक्र' डागून पाकिस्तानने उत्तर आणि पश्चिम भागात १५ ठिकाणी केलेले क्षेपणास्त्रे व ड्रोन हल्ले भारतीय सुरक्षा यंत्रणेने परतवून लावले आहेत. पाकिस्तानकडून डागण्यात आलेल्या क्षेपणास्त्रांचे अवशेष या भागात पडले असून ते गोळा करण्याचे काम चालू आहे. या अवशेषांवरून ते पाकिस्ताननेच डागल्याचे स्पष्ट झाले आहे. ७ आणि ८ मे च्या मध्यरात्री पाकिस्तानकडून उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी ठिकाणांवर हल्ले करण्याचे प्रयत्न झाले. त्यात अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपुरथला, जालंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगड, नाल, फलोदी, उत्तरलाई आणि भूज या १५ शहरांचा समावेश आहे. पाकिस्तानकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून हे हल्ले करण्यात आले. इंटिग्रेटेड काऊंटर यूएएस ग्रीड आणि एअर डिफेन्स सिस्टीमच्या मदतीने पाकिस्तानचे हे प्रयत्न हाणून पाडण्यात आले. हे पाकिस्तानचेच हल्ले असल्याचे या ड्रोन व क्षेपणास्त्रांच्या अवशेषांवरून स्पष्ट होत आहे, असे संरक्षण मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनात सांगण्यात आले. *(वृत्तसंस्था)*

### २४ तासातील घडामोडी

- मध्यरात्री १२.३० वाजता पाकिस्तानचा भारतीय सीमेवर गोळीबार
- काश्मीरातील सीमावर्ती भागात अनेक घरांचे नुकसान
- १७ नागरिकांचा मृत्यू, ५३ जखमी, नागरिकांचे स्थलांतर
- मध्यरात्री २.३० सीमावर्ती भागातील १५ लष्करी तळावर पाकिस्तानने डागलेले क्षेपणास्त्र नष्ट
- गुरुवारी पहाटे ५.३० वाजता पाकिस्तानच्या हल्ल्यावर भारताचा पलटवार
- हार्पी ड्रोन हल्ल्यात लाहोर येथील पाकची हवाई सुरक्षा यंत्रणा उद्ध्वस्त
- भारताचे हवाई हल्ले थोपविणारी पाकिस्तानची यंत्रणाच नष्ट
- पाकिस्तानात लाहोर ते कराचीपर्यंत ९ शहरांवर ड्रोन हल्ले
- अनेक इमारती जमीनदोस्त, कराचीतील क्रिकेट स्टेडियम उद्ध्वस्त
- पंजाब सीमेवरून पाकिस्तानी घुसखोर ठार, ओळख पटली नाही
- गुरुवारी रात्री ८ वाजता जम्मूच्या आरएसपुरा सेक्टरमध्ये ब्लॅकआउट
- जम्मू विमानतळावर पाकने रॉकेट डागले , मोबाईल सेवा विस्कळीत
- सुरक्षा दलाच्या सतवारी तळावर डागले क्षेपणास्त्र

## ड्रोन हल्ल्यांनी पाकिस्तानच्या नऊ शहरांवर प्रहार

◆ **इस्लामाबाद, ८ मे**

पाकिस्तानच्या ९ शहरांवर गुरुवारी सकाळी एकाचवेळी इस्त्रायली बनावटीच्या हार्पी ड्रोनने हल्ले झाले. यात लाहोर येथील पाकिस्तानची रडार व हवाई संरक्षण यंत्रणा पूर्णतः उद्ध्वस्त झाली. लाहोर, कराची, गुजरानवाला, चकवाल, रावळपिंडी, बहावलपूर, मियांवाली आणि चोरशहर येथे झालेल्या या ड्रोन हल्ल्यांनी पाकिस्तानी लष्कराची अक्षरशः भंबेरी उडाली. या हल्ल्यानंतर नागरिकांमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण आहे.

पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, लाहोर, कराचीसह ९ ठिकाणी आज सकाळी ड्रोन हल्ले करण्यात आले. यात अनेक इमारतींचे नुकसान झाले. एचक्यू-९ सुरक्षा यंत्रणाचेदेखील हल्ल्यात नुकसाना झाले. हे हल्ले भारतानेच केले असून ही कृती गंभीर आहे आणि ती आमच्याविरुद्ध चिथावणी देणारी आहे. आम्ही १२ ड्रोन हवेत नष्ट केले. ड्रोन हल्ल्यांत हवाई संरक्षण दलाच्या प्रणालीचे नुकसान झाले आहे. भारताने पाकिस्तानच्या ज्या भागात लक्ष्य केले, तिथे इस्रायलकडून खरेदी केलेले हार्पी ड्रोन वापरले असल्याचा आरोप पाकिस्तानने केला आहे. पाकिस्तानवर होणाऱ्या कारवायांना जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशाराही पाकिस्तानने दिला.

**हवाई कारवाया थोपविणे कठीण**

पाकिस्तानला प्रत्युत्तर म्हणून भारतीय हवाई दलाने लाहोर येथील सुरक्षा यंत्रणांना लक्ष्य केले. पाकिस्तान ज्या प्रकारे कारवाई करेल, त्याच पद्धतीने भारताकडून उत्तर दिले जाईल असे भारतीय संरक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

### रावळपिंडीचे स्टेडियम चक्काचूर

ड्रोन हल्ल्यात पाकिस्तानमधील रावळपिंडी क्रिकेट स्टेडियम उद्ध्वस्त झाले. रावळपिंडीमधील या स्टेडियममध्ये पाकिस्तान सुपर लीगचा सामना खेळवण्यात येणार होता. तत्पूर्वीच भारतीय सुरक्षा दलांकडून करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान, एक ड्रोन या स्टेडियमवर जाऊन धडकले. या हल्ल्यानंतर पाकिस्तानमध्ये खळबळ माजली.

### हल्ल्यामुळे पंजाब-दिल्ली आयपीएल सामना रद्द

**धर्मशाला, दि.७ मे**

पाकिस्तानच्या हल्ल्यामुळे धर्मशाळा मैदानावर पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना थांबवण्यात आला आहे. मैदानातील सर्व फ्लडलाइट्स बंद करुन सर्व प्रेक्षकांना बाहेर काढण्यात आले. खेळ थांबेपर्यंत पंजाबने १०.१ षटकांत एका विकेटच्या म ोबदल्यात १२२ धावा केल्या होत्या. धर्मशालातील पंजाब-दिल्ली सामना रद्द झाल्यानंतर, बीसीसीआयने सर्व भागधारकांची आपत्कालीन ऑनलाइन बैठक बोलावली होती. उर्वरित सामन्यांच्या आयोजनावर चर्चा करण्यासाठी ही बैठक आयोजिल्याचे समजते.

### पाहिजेत

सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय **दैनिक सोलापूर तरुण भारत** साठी सोलापूर **शहरात कॅम्पेनिंग** करण्यासाठी दहावी, बारावी, पदवीपर्यंत शिक्षण झालेले २० युवक पाहिजेत. आकर्षक मानधन दिले जाईल. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह खालील पत्त्यावर कार्यालयात समक्ष भेटावे अथवा खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क: ९८८११९१४४३**

**पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.**



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### ठोकळ प्रशाला ''मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र २''अंतर्गत तालुक्यात प्रथम

**सोलापूर, दि. ८ मे-**
महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०२४- २५ या शैक्षणिक वर्षात मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र. २ स्पर्धेत इंदिरा ज्ञानवर्धिनी संचलित श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाने सर्व व्यवस्थापनाच्या शाळा या गटात दक्षिण सोलापूर तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला. दक्षिण सोलापूर तालुक्यातील सर्व व्यवस्थापनातील १८७ शाळा सहभागी झालेले होते. त्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक तीन लाख रुपयांचा धनादेश प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या हस्ते व गटशिक्षणाधिकारी सुतार मॅडम विस्ताराधिकारी व पर्यवेक्षक श्री स्वामी यांच्या उपस्थितीत दक्षिण पंचायत समिती येथे झालेल्या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य दत्तात्रय गाजरे उपस्थित होते. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थापक अध्यक्षा निर्मलाताई ठोकळ अध्यक्ष अ‍ॅड. विपीन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पाताई ठोकळ यांनी प्राचार्य डी. डी. गाजरे व स्टाफचे अभिनंदन केले.

### शांती चौकात महिलेच्या गळ्यातील दीड लाखांचे मंगळसूत्र हिसकावले

**सोलापूर, दि. ८ मे -**
शहरातील जुना अक्कलकोट नाका परिसरातील शांती चौकात महिलेच्या गळ्यातील दीड लाख रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी धुम स्टाईलने चोरून नेले. याबाबत जया नागेश पल्ली (रा. सुवर्ण कलश अपार्टमेंट, पाचवा मजला, गडगी नगर, विडी घरकुल, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जया पल्ली या ६ मे रोजी रात्री साडेआठच्या सुमारास शांती चौकातून त्यांच्या पतीसमवेत दुचाकीवर मागे बसून घराकडे जात होत्या. त्यावेळी शांती चौकात दुचाकीवरून आलेल्या दोघां चोरट्यांपैकी पाठीमागे बसलेल्या चोरट्याने जया यांच्या गळ्यातील दीड लाख रुपये किंमतीचे सव्वा तीन तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून चोरून नेले. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक सोनवणे पुढील तपास करीत आहेत.

### विजापूर वेसमधून ३० हजाराची दुचाकी चोरीस

**सोलापूर -** शहरातील विजापूर वेस परिसरातील स्टार हॉटेल समोरून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत इरफान महेबुब मुलाणी (वय ४०, रा. पिलीव, ता. माळशिरस) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ मे रोजी सकाळी आकराच्या सुमारास इरफान मुलाणी हे विजापूर वेसमधील स्टार हॉटेलसमोर कामानिमित्त आले होते. त्यावेळी त्यांनी त्यांची दुचाकी क्र. एमएच ४५ एआर ३४६३ ही स्टार हॉटेलसमोर पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

### पूर्व वैमनस्यातून तरूणास मारहाणप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर -** पूर्व वैमनस्यातून तरूणास मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात



आला आहे. याबाबत जाकीर हमीद मुल्ला (रा. वळसंग, ता. दक्षिण सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन आयदु शेख, सद्दाम शेख, अरबाज शेख, बाबा शेख (रा. शेळगी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ मे रोजी दुपारी जाकीर मुल्ला यांच्या पत्नीचा चुलत भाऊ नुरूद्दीन याचा विवाह झाल्यानंतर चारचाकी वाहनामध्ये खरेदी करण्यासाठी जात होते. त्यावेळी अक्कलकोट रोडवरील वेलकम फंक्शन हॉल येथे काल झालेल्या तक्रारीवरून जाकीर मुल्ला यांना आयदू शेख याने बाहेर बोलावून शिवीगाळ करून दमदाटी केली. आयदू शेख, सद्दाम शेख यांनी लाकडाने पाठीवर हातावर, डोक्यावर मारहाण करून जखमी केले. तसेच अरबाज व बाबा यांनी खाली पाडून हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करून चारचाकी गाडीची काच फोडली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

### तळे हिप्परगा येथून ३० हजारांची दुचाकी लंपास

**सोलापूर -** तळे हिप्परगा येथील संभाजी नगर येथून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत किरण संभाजी



भोकरे (वय ३८, रा. संभाजी नगर, तळे हिप्परगा, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ एप्रिल रोजी रात्री किरण भोकरे यांनी त्यांची एमएच १३ ईई ०३९० ही घरासमोर पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार दुधाळे पुढील तपास करीत आहेत.

### बायको माहेरी गेल्याने नवऱ्याने प्राशन केले कीटकनाशक

**सोलापूर -** कौटुंबिक कारणातून पती-पत्नीच्या झालेल्या वादानंतर पत्नी माहेरी निघून गेल्याने संतापलेल्या पतीने कीटकनाशक प्राशन केले. हा प्रकार बुधवारी मध्यरात्री एकच्या सुमारास घडला. हा प्रकार अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगी येथे घडला. योगीनाथ राजशेखर जवळगी (वय ३८, रा. सुलेरजवळगी) असे या नवऱ्याचे नाव आहे. यातील योगीनाथ व त्याच्या पत्नीमध्ये घरगुती कारणावरुन वाद झाला. त्यानंतर पत्नी घर सोडून माहेरी गेली. या रागाच्या भरात योगीनाथने बुधवारच्या मध्यरात्री घरात पिकांसाठी आणून ठेवलेले कीटकनाशक प्राशन केले. यात त्रास होऊ लागल्याने वडील राजशेखर यांनी योगीनाथला येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. सिव्हील पोलीस चौकीत या घटनेची नोंद झाली आहे.

# सोलापुरात पावसाच्या सरी बरसल्या!

## जिल्ह्यासाठी वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**
४ मेपासून परभणी, हिंगोली, जालना, सोलापूर, नांदेड, धाराशिव, लातूर, पुणे, अहमदनगर जिल्ह्यांतील आदी ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे ताशी ३०-४० किमी वेगाने वाहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. आजही (दि. ८) अशी शक्यता वर्तविण्यात आल्याने शेतकरी बांधवांना योग्य ते नियोजन केल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, आज (दि. ८) दुपारी सव्वाचारच्या सुमारास सोलापुरात पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. यामुळे काहीकाळ हायसे वाटले.



मे महिन्याच्या सुरूवातीपासूनच तापमानात वाढ होत असून, अवकाळी पावसाचाही इशारा वारंवार देण्यात येत आहे. इतकेच नाही तर विजांचा कडकडाट आणि वादळी वारेही वाहणार असल्याचाही इशारा देण्यात येत असल्याने शेतकऱ्यांनी चारा-वैरण झाकून ठेवणेची व्यवस्था केली आहे. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात काढून पडलेली पिके झाकून ठेवली आहेत. दरम्यान, आता द्राक्षबागाची तोडणीही झाल्याने द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. दरम्यान, ज्यांच्या शेतात रब्बीतील पेरण्या उशिराने झाल्या; अशा काही शेतकऱ्यांचा कडबा काढून पडला आहे, तर अजूनही काहीजणांची काढणी चालूच आहे. तर काही जणांचा आंबा उतरायचा राहिला आहे; अशा शेतकऱ्यांना मात्र अवकाळी पावसाची भीती वाटत आहे. त्यातच वादळी वारे सुटले की, आंबा पिकांचे मोठे नुकसात होण्याची भीती जाणकार शेतकऱ्यांकडून वर्तविली जात आहे.

सध्या बहुतांश शेतकरी आगामी खरीप पेरणीपूर्व मशागतीत गुंतल्याचेही दिसून येत आहे. यानंतर ते बियाणे-खतांची जुळवाजुळण करण्याच्या तयारीला लागणार असल्याचे सांगण्यात येते.

## मंद्रूपमध्ये घरगुती भांडणातून पत्नीला मारहाण

**सोलापूर :** घरगुती भांडणातून पतीने पीव्हीसी पाईप व लाकडाने मारहाण करुन पत्नीला जखमी केले. ही घटना मंद्रूप येथे गुरुवारी सकाळी ८च्या सुमारास घडली. वैष्णवी चंद्रकांत व्हनमाने (वय ३५, रा. मंद्रूप) असे जखमी पत्नीचे नाव आहे. गुरुवारी सकाळी जखमी वैष्णवी व पती चंद्रकांत यांच्या घरगुती कारणावरुन भांडण झाले. यानंतर रागाच्या भरात पतीने लाकडाने व पाईपने मारहाण केली. यात वैष्णवी यांच्या डोक्याला जखम झाली. तसेच सर्वांगास मुकामार लागला. सकाळी ११:३५च्या सुमारास भाऊ रामचंद्र खेंडे यांनी महिलेला शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### गुळवंचीत आर्थिक व्यवहारातून तरुणाला मारहाण

पैशाच्या व्यवहारातून एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार गुळवंची येथे गुरुवारी सकाळी साडेसातच्या सुमारास घडला. जमीर चाँदसाब शेख (वय ३०, रा. गुळवंची) असे जखमीचे नाव आहे. जखमी तरुण व गावातील दोघांमध्ये पैशाचा व्यवहार झाला होता. यावरुन गुरुवारी सकाळी वादातून चिडून दोघांनी जमीर याला लाकडाने, लाथाबुक्क्याने बेदम मारहाण केली.यात त्याच्या सर्वांगास मुका मार लागला. त्यास उपचारासाठी मुलगा लालसाब शेख याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## कुर्डूवाडी-टेंभुर्णी रोडवर अपघात; जखमी शासकीय रुग्णालयात

**सोलापूर, दि.८ मे-**
कुर्डूवाडी - टेंभुर्णी रोडवर झालेल्या अपघातात
४० वर्षीय व्यक्ती जखमी झाला. हा प्रकार बुधवारी रात्री १० च्या सुमारास निदर्शनास आला. आनंदराव गंगाराम मस्के (वय ४०) असे त्याचे नाव आहे. त्याला जखमी अवस्थेत कुर्डूवाडी येथील सरकारी दवाखान्यात प्राथमिक उपचार केले. डॉक्टरांच्या सल्ल्याने शुक्रवारी पहाटे रुग्णवाहिकेद्वारे डॉ. ओंकार मोहिते यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर उपचार सुरु असून, तो शुद्धीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सिव्हील पोलीस चौकीत या घटनेची नोंद झाली आहे.

### बँकेचा हप्ता मागण्यासाठी गेलेल्या तरुणाला मारहाण

बँकेचा हप्ता मागण्यासाठी गेलेल्या तरुणास लाकडाने व हाताने बेदम मारहाण करुन जखमी करण्यात आले. बुधवारी रात्री नऊच्या सुमारास मनगोळी (ता. द. सोलापूर) येथे ही घटना घडली. ऋतूराज बाळासाहेब जाधव (वय २५, रा. मनगोळी, ता. द. सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. यातील जखमी तरुण बुधवारी विनोद उड्डाणशिवे याच्याकडे बँकेचा हप्ता घेण्यासाठी गेला होता. त्याने हप्ता देणार नाही असे म्हणत लाकडाने व हाताने मारहाण केली. यात मुकामार लागल्याने मंद्रूप येथील सरकारी दवाखान्यात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी मित्र कमलाकर डोरे याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. त् सिव्हील पोलीस चौकीत या घटनेची नोंद झाली आहे.

## आर्थिक शिस्त आणि देशाच्या आर्थिक विकासात महाराष्ट्राचा मोलाचा वाटा : डॉ. अरविंद पनगडिया

▸ १६ व्या वित्त आयोगाच्या बैठकीत राज्याने मांडल्या महत्त्वाच्या आर्थिक मागण्या

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, ८ मे-**
सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित १६व्या वित्त आयोगाच्या बैठकीत आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरविंद पनगडिया यांनी महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक शिस्तीचे आणि देशाच्या आर्थिक प्रगतीतील योगदानाचे कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व वित्त, नियोजन आणि उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरविंद पनगडिया आणि सदस्य डॉ. मनोज पांडा व डॉ. सौम्यकांती घोष यांचे स्वागत केले. मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारच्या वतीने आयोगासमोर निवेदन सादर केले. आयोगाच्या कार्यसूचीप्रमाणे राज्याच्या विविध मागण्या व सूचना यात मांडण्यात आल्या. महाराष्ट्र शासनाने केंद्र व राज्यांतील कर वाटपातील राज्यांचा हिस्सा ४१ टक्क्यांवरून वाढवून ५० टक्के करण्याची मागणी केली आहे.



तसेच उपकर आणि अधिभार यांना प्रमुख करांमध्ये समाविष्ट करावे, तसेच केंद्र सरकारच्या करतर महसुलालाही कर वाटपात समाविष्ट करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. क्षैतिज कर वाटप संदर्भात राज्य सरकारने नवीन निकष सुचवले आहेत जसे की 'सतत विकास व हरित ऊर्जा' तसेच भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा.याशिवाय, उत्पन्न अंतर निकष ४५ टक्क्यांवरून कमी करून ३७.५ टक्के करावा, अशीही राज्य सरकारची मागणी आहे.

**१ लाख२८ हजार २३१ कोटींच्या विशेष अनुदानाची मागणी**

राज्य सरकारने मुंबई महानगर प्रदेशासाठी आर्थिक मास्टर प्लॅन अंमलबजावणी, नद्यांना जोडणारी योजना, नवीन उच्च न्यायालय संकुल, कारागृह पायाभूत सुविधा, वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, तसेच इको-पर्यटन क्षेत्रांसाठी एकूण १ लाख २८ हजार २३१ कोटी रुपयांच्या विशेष अनुदानाची मागणी केली आहे. तसेच राज्याला महसुली तूट भरपाई अनुदान मिळावा, अशीही विनंती करण्यात आली आहे. आपत्ती निवारण निधी व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अधिक निधीची मागणी राज्य सरकारने आपत्ती निवारण निधी वाढवण्याची आणि सध्या असलेल्या केंद्र-राज्य भागीदारीचे प्रमाण ७५:२५ ऐवजी ९०:१० करावे, अशी मागणी केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अनुदान वाढवून ४.२३ टक्क्यांवरून ५ टक्के करावे आणि ते ग्रामीण व शहरी लोकसंख्येच्या प्रमाणात वितरित करावे, असे राज्य सरकारने सुचवले आहे. नगरपालिका व महानगरपालिकांसाठी सार्वजनिक बस सेवा आणि अग्निशमन सेवेकरिता स्वतंत्र अनुदानाचीही मागणी करण्यात आली आहे. या बैठकीत आयोगाने व्यापारी व उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशीही संवाद साधला.

## गतवर्षात वाळू लिलाव झाले नाहीत
# ऑनलाईन बुकींगद्वारे ११ हजार ३२० ब्रास वाळू दिली!

### प्रभारी उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी केला खुलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**
दि. २८ एप्रिल २०२४ रोजी 'जिल्ह्यात ठेकेदार वाढले मात्र वाळू अद्यापही मिळेना' या मथळ्याखाली सोलापूर दैनिक तरूण भारतमधून वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. या वृत्ताबाबत प्र. उपजिल्हाधिकारी (महसूल) संतोष देशमुख यांनी खुलासा केला आहे. यामध्ये त्यांनी गतवर्षात १५५९ ऑनलाईन बुकींगद्वारे ११हजार३२०.३६ ब्रास वाळू नागरिकांना महाखनिज प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिल्याचे नमूद केले आहे.

त्या बातमीला अनुसरून काही मुद्देही प्रशासनाकडून मांडण्यात आले आहेत. यामध्ये प्र. उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी



नमूद केले आहे की, यंदा जिल्हा प्रशासनाकडून ३ ठेके ई टेंडर प्रक्रियेतून दिले आहेत. याद्वारेही ऑनलाईन बुकींगद्वारे १३५४ ब्रास वाळू नागरिकांना उपलब्ध करून दिली आहे. यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना वाळू आता मिळू लागल्याचा दावा त्यांनी केला आहे. अजून ९ वाळू घाटास पर्यावरण विभागाकडून अनुमती मिळालेली आहे. शासनाच्या दि. ८ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयाद्वारे सुधारित वाळू धोरण जाहीर केले आहे. या निर्देशानुसार वाळू ठेक्याची निविदा प्रसिध्द करण्यात येणार आहेत. त्यामुळे आजतागायत ठेकेदार निश्चितच नाहीत तर ठेकेदारांना अधिकृतरित्या ठेकाही दिला नसल्याचा खुलासा केला आहे. सोलापूर जिल्ह्यात सध्या २५ दगड खाणपट्टे मंजूर आहेत. सदर दगड खाण धारकांकडून विहीत स्वामित्वधन शुल्क भरणा करून घेण्यात येत आहे. तथापि त्यांचेकडून विक्री होणारे गौण खनिजाबाबत कोणतेही समान दर तांत्रिकदृष्ट्या निश्चित करता येणार नाहीत किंवा सदर दर निश्चित करून द्यावेत याबाबत कोणतेच शासन निर्देश नाहीत. दरम्यान, आता वाळू घाटाचा लिलाव जाहीर करण्यात येणार असल्याने क्रश सॅन्ड, खडीचे दरही नियंत्रणात राहणार असल्याचे त्यांनी या खुलाशाद्वारे सांगितले आहे.

जिल्ह्यात अवैध वाळू उपसा होत नसल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला असून, जिल्ह्यात गाळमिश्रीत वाळूचे चालू असलेले सर्व डेपोवरील वाळूची विक्री ही शासनाकडील निर्धारित केलेल्या महाखनिज या संगणकीय प्रणालीद्वारे होत आहे. त्यामुळे येथील वाळू एजंटामार्फत व ठेकेदारामार्फत बांधकाम व्यावसायिकांना विक्री करता येणार नाही. दरम्यान, जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकी विषयांत प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी महसूल विभागाच्या तालुका, जिल्हा स्तरावर भरारी पथके असून, त्यांनी अशा ४१० प्रकरणात ३.६१ कोटीचा दंड रक्कम वसूल केल्याचेही या खुलाशात नमूद केले आहे. तर अशा कारवाईमध्ये ६१ प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व १३२ वाहने जप्त करण्यात आली आहेत. तसेच इतर ०६ यंत्रसामुग्रीवर कारवाई केल्याचा दावाही श्री. देशमुख यांनी केला आहे.

### डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण
## मनिषा माने-मुसळे हिच्या जामीन अर्जावर आज सुनावणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मे -**
सोलापुरातील प्रसिद्ध न्यूरो फिजिशियन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या मनिषा माने-मुसळे हिच्या जामीन अर्जावर ९ मे रोजी सुनावणी होणार आहे.



डॉ. वळसंगकर यांनी १८ एप्रिल रोजी रात्री ८:३० च्या सुमारास राहत्या घरातील बाथरूममध्ये स्वतः कडील पिस्तूल मधून डोक्यात गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली. यानंतर याप्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात त्यांचा मुलगा डॉ. अश्विन वळसंगकर यांच्या फिर्यादीवरून रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी महिला कर्मचारी मनीषा मुसळे-माने हिला ताब्यात घेतले. त्यानंतर तपास कामासाठी पाच दिवस तिला पोलीस कोठडी मिळाली होती. त्यानंतर न्यायालयाने तीला ९ मे पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली

दरम्यान, मनिषा माने हिने जिल्हा न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल केलेला असून त्या आर्जावर ९ मे रोजी सुनावणी होणार आहे. या दिवशी मनिषा माने हिच्या जामीनासाठी विरोध करून पुन्हा पुढील तपासासाठी पोलिस कोठडीची मागणी करण्यात येणार असल्याचे तपास अधिकारी अजित लकडे यांनी सांगितले.

## तणनाशक प्राशन करुन शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ८ मे-**
तरुण शेतकऱ्यानं त्याच्या स्वत:च्या शेतामध्ये तणनाशक औषध प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला. गुरुवारी सकाळी ८ च्या सुमारास केमवाडी (ता. तुळजापूर, जि. धाराशिव) येथे हा प्रकार घडला. नागेश लक्ष्मण खांडेकर (वय ३५) असे या शेतकऱ्याचे नाव आहे. त्याच्यावर वडाळा येथील सरकारी दवाखान्यात प्राथमिक उपचार केले. डॉक्टरांच्या सल्ल्याने सकाळी ९:२० च्या सुमारास येथील शासकीय रुग्णालयात मेव्हणा सतीश याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर उपचार सुरु असून, शुद्धीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सिव्हील पोलीस चौकीत या घटनेची नोंद आहे.

# मुलगी दाखवितो असे सांगून दीड लाखांना फसविले

### दोन एजंटासह तोतया पोलिसाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मे -**
विवाहासाठी मुलगी दाखवितो असे सांगून सासकल (जि. सातारा) येथील दोघां भावांना दीड लाख रूपयांना फसवून त्यांना खोट्या गुन्ह्यात अडविण्याची धमकी देणाऱ्या महिला एजंटासह तिघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी तोतया पोलिसास अटक केली आहे तर दोन्ही एजंट फरार आहेत.

अशोक सामल (वय ४५, रा. गांधी नगर, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या तोतया पोलिसाचे नाव असून त्यास न्यायालयाने दोना दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. तर दशरथ चव्हाण व क्षितीजा उर्फ संगीता क्षिरसागर (रा. सोलापूर) हे दोघे फरार आहेत. याबाबत रोहिदास पांडुरंग मुळीक (वय ४५, रा. सासकल, ता. फलटण, जि. सातारा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रोहिदास मुळीक यांचा भाऊ दत्तात्रय याच्या विवाहासाठी मुळीक कुटुंबिय हे मुलगी पाहण्याच्या प्रयत्नात होते. त्यातत मुळीक यांना सोलापुरातील एजंट दशरथ चव्हाण व क्षितीजा क्षिरसागर यांचा संपर्क झाला. रोहिदास मुळीक यांनी भाऊ दत्तात्रय यास मुलगी पहा असे सांगितल्याने एजंटचे काम करणाऱ्या दशरथ चव्हाण व क्षितीजा क्षिरसागर यांनी मुळीक यांना मुलगी आहे ती पाहण्यासाठी या म्हणून सोलापूरला बोलावले. त्यामुळे मुळीक बंधु हे २७ एप्रिल २०२५ रोजी तसेच २ मे रोजी सोलापुरात आले. त्यावेळी चव्हाण व क्षिरसागर या दोघांनी

### लग्नास मुली दाखविण्यासाठी एजंटाच्या टोळ्या कार्यरत

सध्या विवाहायोग्य मुलांसाठी मुली मिळत नसल्याचे सर्वत्र चित्र आहे. त्याचाच फायदा घेत विवाहायोग्य मुली दाखविणाऱ्या एजंटाच्या अनेक टोळ्या कार्यरत आहेत. या टोळ्यांच्या माध्यमातून विवाहायोग्य मुले व त्यांच्या कुटुंबियांची मोठ्या प्रमाणात फसवणुक करण्यात येते. अशाप्रकारच्या अनेक घटना सोलापूरात उघडकीस आलेल्या आहेत. त्यामुळे विवाहायोग्य मुलां-मुलींकडून योग्य ती खात्री करूनच आपली फसवणुक तरी होणार नाही ना हे पाहून एजंटांकडे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

क्षिरसागर यांच्या घरी मुलगी पाहून देण्यासाठीची १ लाख १० हजार रुपये फी व मुलीसाठी १८ हजार रुपयांची साडी घ्यावी लागेल असे सांगितले. त्यानंतर मुळीक यांनी क्षितीजा क्षिरसागर व चव्हाण यांना रोख १ लाख रुपये व क्षितीजा क्षिरसागर हिच्या फोन पे व १० हजार रुपये आणि मुलीला लग्नात घालण्यासाठी साडीला १८ हजार रुपये दिले. या सर्वांचे दत्तात्रय मुळीक यांनी त्यांच्या मोबाईलवर पैसे देत असतानाचे व्हिडीओ चित्रीकरण करून घेतले.

त्यानंतर दशरथ चव्हाण व क्षितीजा क्षिरसागर या दोघांनी मुळीक यांना मुलगी वैगेरे काही नाही असे म्हणून हाकलून दिले. त्यामुळे मुळीक यांनी एमआयडीसी पोलिस ठाणे गाठून याबाबत तक्रार देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी चव्हाण व क्षिरसागर यांनी त्यांचा साथीदार असलेल्या अशोक सामल यास बोलावले. अशोक सामल याने आपण पोलिस असल्याचे मुळीक यांना सांगून हे प्रकरण आपण मिटवू असे म्हणून त्यांना पोलिस ठाण्यातून बाहेर आणले. त्यानंतर मुळीक यांना प्रकरण मिटवून घेऊ म्हणून सामल याने मुळीक यांच्याकडून स्वतःच्या फोन पे वर २० हजार रुपये घेतले. त्यानंतर सामल याने मी पोलिस आहे, तुम्हांला खोट्या गुन्ह्यांत अडकावितो असे म्हणून मुळीक यांनाच दमदाटी करून दत्तात्रय मुळीक याच्या मोबाईलमधील चव्हाण व क्षितीजा यांना पैसे देत असतानाचा व्हिडीओ डिलीट केला. तसेच मुळीक बंधुना मारहाण केली. अशाप्रकारे मुळीक यांची १ लाख ४८ हजार रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी तिघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी सामल यास अटक केली असून चव्हाण व क्षितीजा हे दोघे फरार झाले आहेत. पोलिस उपनिरीक्षक बनसुडे पुढील तपास करीत आहेत.

CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आजचा सामना
LUCKNOW SUPER GIANTS VS ROYAL CHALLENGERS
लखनौ सुपरजाएंट्स् वि. रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर
वेळ : रात्री. ७.३० वाजता
ठिकाण : इकाणा स्टेडियम, लखनऊ

श्री भगवंत प्रकटोत्सव विशेष - पान ८, ९, १२

शुक्रवार, ९ मे २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# पाकिस्तानचा गोळीबार, १८ नागरिक ठार

**मोर्टार शेल डागले, भारताचे जोरदार प्रत्युत्तर ● पाकिस्तान लष्कराच्या अनेक चौक्या उद्‌ध्वस्त ● काश्मीरच्या १० जिल्ह्यांत नियंत्रण कक्ष स्थापन**

**जम्मू, ८ मे**

दहशतवादावर प्रहार करण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत केलेल्या कारवाईनंतर पाकिस्तानी लष्कराने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर बुधवारी रात्रीदेखील अंधाधुंद गोळीबार केला आणि सीमेपलीकडील गावांमध्ये मोर्टार शेल डागले, यात पूंछ जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात १८ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ५९ जण जखमी झाले आहेत. भारतीय सैन्याने याला जबरदस्त प्रत्युत्तर देत पाकिस्तानी लष्कराच्या अनेक चौक्या पार उद्‌ध्वस्त करून टाकल्या.

नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थानांतरित करण्यासाठी काश्मीरच्या १० जिल्ह्यांत नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पाकिस्तानी सैन्याने जम्मू आणि काश्मीरच्या कुपवाडा, बारामुल्ला, उरी, पूंछ आणि अखनूरच्या भागात मोर्टार शेल, लहान शस्त्रांनी हल्ला केला. गोळीबारात १३ नागरिकांचा मृत्यू झाला असून ५९ जण जखमी आहेत, त्यांच्यावर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहे. पाकिस्तानी सैन्याच्या गोळीबारात अनेक घरांचे, दुकानांचे आणि वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. पाकच्या सैन्याला भारतीय लष्कराने जोरदार प्रत्युत्तर दिले. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील पाकिस्तानी लष्कराच्या अनेक चौक्या उद्‌ध्वस्त करण्यात आल्या. वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर सीमेवरील गावातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी १० जिल्ह्यांत नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले, तसेच जम्मू प्रदेशातील पाच सीमावर्ती जिल्ह्यांतील सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले.



**सीमावर्ती राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द**

भारत-पाकिस्तानमधील तणावाच्या पृष्ठभूमीवर जम्मू-काश्मीर, पंजाब आणि राजस्थान राज्यातील शासकीय कर्मचारी, पोलिस आणि निमलष्करी दलातील कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या. या राज्यात हाय अलर्ट जारी करण्यात आला असून पुढील आदेशापर्यंत शाळा, महाविद्यालये बंद करण्याचे आदेश दिले. पंजाबचे मंत्री अमन अरोरा म्हणाले, पंजाबची पाकिस्तानशी ५३२ किमी लांबीची सीमा आहे. त्यामुळे कोणत्याही लष्करी तणावाच्या वेळी पंजाब सरकारची भूमिका खूप महत्त्वाची बनते. सीमेजवळील सर्व जिल्ह्यांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे.

**श्री गुरू रामदास विमानतळ वाहतुकीसाठी बंद**

अमृतसरमध्ये तीन ठिकाणी स्फोटांचे आवाज ऐकू आले. यानंतर जिल्हा प्रशासन आणि पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई करीत संपूर्ण जिल्ह्यात ब्लॅकआऊट केले. श्री गुरू रामदास आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल पूर्णपणे रिकामे करण्यात आले आणि तेथेही ब्लॅकआऊट करण्यात आले. (वृत्तसंस्था)

## पाकिस्तानी घुसखोराला जवानांनी केले ठार

पंजाबच्या फिरोजपूर सेक्टरमध्ये घुसखोरीचा प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानी घुसखोराला सीमा सुरक्षा दलाने ठार केले. घुसखोराची ओळख अद्याप पटलेली नाही.

सुरक्षा अधिकाऱ्याने सांगितले की, फिरोजपूर सेक्टरमध्ये पाकिस्तानी घुसखोर जाणूनबुजून आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडताना आणि अंधाराचा फायदा घेत सीमा सुरक्षा कुंपणाकडे जाताना दिसला. त्यानंतर सतर्क बीएसएफ जवानांनी त्याच्यावर गोळीबार केला. दिवस उजाडल्यानंतर त्याचा मृतदेह पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.

# सीमेवरील लोकांनी सोडली गावे



**चंडीगड, ८ मे**

पंजाबमधील फाजिल्काच्या भारत-पाकिस्तान सीमावर्ती भागातील लोक गाव सोडू लागले आहेत. लोक घरातील सामान ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरत आहेत आणि सुरक्षित ठिकाणी जात आहेत.

स्थानिकांचे म्हणणे आहे की, १९६५-७१ च्या युद्धादरम्यान पाकिस्तानने या भागाला वेढा घातला आणि अनेक लोकांना बंदिवान बनवले. म्हणूनच आता युद्धाच्या भीतीमुळे त्यांना त्यांचा परिसर सोडावा लागत आहे.

पक्का चिश्ती गावातील रहिवासी फौजा सिंग, खुशाल सिंग, बलजिंदर सिंग आणि गुरचरण सिंग यांनी माहिती देताना सांगितले की, भारताने पाकिस्तानवर केलेल्या हवाई हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाचे वातावरण आहे. त्यामुळे हे लोक त्यांच्या घरातील वस्तूंसह सुरक्षित ठिकाणी जात आहेत.

**पाकिस्तानी सैनिकांनी सामान लुटले**

१९६५-७१ च्या युद्धात पाकिस्तानने या भागावर कब्जा केला होता असे त्यांचे म्हणणे आहे. ज्यामुळे त्याने या भागातील अनेक लोकांना बंदिवान बनवले होते. जेव्हा परिस्थिती शांत झाली आणि दोन्ही देशांमध्ये करार झाला तेव्हा पाकिस्तानने भारतीय लोकांना सोडले. (वृत्तसंस्था)

## भारत-नेपाळ सीमेवर चिनी नागरिकांना अटक

**मोतिहारी** : बिहारच्या पूर्व चंपारण जिल्ह्यातील भारत-नेपाळ सीमेवर वैध व्हिसाशिवाय देशात प्रवेश करणाऱ्या चार चिनी नागरिकांना अटक करण्यात आली आहे, असे पोलिस अधीक्षक स्वर्ण प्रभात यांनी गुरुवारी सांगितले. चीनमधील हुनान प्रांतातील रहिवासी असलेले हे चार विदेशी नागरिक बुधवारी रात्री उशिरा रक्सौल चेकपोस्टवर पकडले गेले.चिनी नागरिकांसोबत दोन नेपाळी पर्यटक मार्गदर्शक होते. एसएसबी आणि स्थानिक पोलिसांनी चौकशी केल्यानंतर नेपाळी नागरिकांना सोडून देण्यात आले. चिनी नागरिकांवर विदेशी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बद्रीनाथ धामची सुरक्षा आयआरबीकडे सोपविली

**डेहराडून, ८ मे**

उत्तराखंडमधील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री बद्रीनाथ धामच्या सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी इंडो-तिबेटीयन बॉर्डर पोलिस अर्थात् आयटीबीपीने बुधवारी इंडियन रिझर्व्ह बटालियन अर्थात् आयआरबीकडे सोपविली.

बद्रीनाथ धामचे दरवाजे हिवाळ्यात सहा महिन्यांसाठी बंद असतात. या काळात परिसरात प्रचंड बर्फवृष्टी आणि अत्यंत कठीण परिस्थिती असते. अशा परिस्थितीत, आयटीबीपीचे सैनिक येथे सुरक्षेची जबाबदारी घेतात आणि पूर्ण समर्पणाने आपले कर्तव्य बजावतात. बुधवारी बद्रीनाथ धामचे दरवाजे भाविकांसाठी उघडण्यात आले, त्यानंतर आयआरबीने सुरक्षेची जबाबदारी घेतली. सीमा द्वार युनिटच्या आयटीबीपी जवानांनी औपचारिक प्रक्रियेनुसार आयआरबीकडे पदभार सोपवला. या सुरक्षा हस्तांतरणाचा उद्देश वर्षभर धाममधील सुरक्षा व्यवस्था सुव्यवस्थित राहावी हा आहे. हिवाळ्याच्या काळात प्रतिकूल परिस्थितीत आयटीबीपीने सेवा दिली असली तरी, आता यात्रा काळात आयआरबी यात्रेकरूंची सुरक्षा सुनिश्चित करेल. (वृत्तसंस्था)

# बलूच बंडखोरांच्या हल्ल्यात १४ पाकिस्तानी सैनिक ठार

**लष्करी ताफ्यातील वाहनाला आयईडी स्फोटाने उडविले**

**इस्लामाबाद, ८ मे**

बलुचिस्तानमधील बोलान आणि केच येथे फुटीरतावादी संघटना बलुच लिबरेशन आर्मी अर्थात् बीएलएने पाकिस्तानी लष्कराच्या वाहनाला आयईडीने स्फोटाने उडविले, यात १४ सैनिक ठार झाले. हल्ल्यानंतर बलुचने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. बीएलएने समाज माध्यमावर पोस्ट करीत म्हटले की, आम्ही पाकिस्तानी भाडोत्री सैन्याला लक्ष्य करीत हल्ले केले आणि यापुढेदेखील आमची कारवाई सुरूच राहणार आहे. पाकिस्तानच्या सुरक्षा दलाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, पहिला हल्ला बलुचिस्तानच्या बोलन जिल्ह्यातील माछ भागातील शोरकंद भागात झाला जिथे बीएलएच्या स्पेशल टॅक्टिकल ऑपरेशन्स स्क्वॉडने रिमोट कंट्रोल्ड आयईडी स्फोटाने लष्करी ताफ्याच्या वाहनाला लक्ष्य केले. या स्फोटात वाहनातील सर्व १२ सैनिक ठार झाले. दुसरा हल्ला केच जिल्ह्यातील कुलाग तिग्रान भागात आयईडीचा स्फोट झाला, ज्यामध्ये दोन सैनिक ठार झाले. या प्रकरणात, बीएलएचे प्रवक्ते झियांद बलोच यांनी एक निवेदन जारी केले, त्यात म्हटले की, बीएलएला परदेशी एजंट म्हणणाऱ्यांनी हे जाणून घ्यावे की पाकिस्तानी सैन्य स्वतः परदेशी भांडवल आणि हितसंबंधांचे रक्षण करत आहे. आम्ही त्यांना सोडणार नाही. बलुच स्वातंत्र्यसैनिकांचे हल्ले आणखी तीव्र होतील.



# पाकिस्तानने भारताच्या नादी लागू नये

**अमेरिकेने पाकिस्तानला सुनावले**

**वॉशिंग्टन, ८ मे**

पाकिस्तानने भारतावर कोणताही प्रतिहल्ला करण्याचा विचारसुद्धा करू नये. दहशतवाद्यांवर कारवाई करण्याचा भारताला पूर्ण अधिकार आहे, अशा शब्दांत अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी पाकिस्तानला बजावले. त्यामुळे पाकच्या गोटात खळबळ माजली आहे. रुबियो यांनी त्यांच्या समाज माध्यम खात्यावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, भारताच्या कारवाईला अमरिकेचे समर्थन आहे.

पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्ध करण्याचे धाडस करू नये. दहशतवाद्यांवर कारवाई करण्याचा आणि त्यांचे अड्डे नष्ट करण्याचा भारताला पूर्ण अधिकार आहे. पाकिस्तानच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांना आम्ही शांत राहण्यास बजावले आहे. आम्ही भारत आणि पाकिस्तानमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत. अमेरिकेला आशा आहे की, उभय देशांत निर्माण झालेला तणाव लवकरात लवकर निवळेल. शांततापूर्ण तोडग्यासाठी भारतीय आणि पाकिस्तानी नेतृत्वाने प्रयत्न करावेत, अशी आमची धारणा आहे.

## युध्द झाल्यास पाकिस्तान केवळ सात दिवस धरु शकते तग

**ऑपरेशन सिंदूरला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान युद्ध पुकारेल का? जर हो, तर पाकिस्तान किती काळ तग धरू शकेल. भारत पाकिस्तानच्या तीन पट जास्त मजबूत आहे. सौनिकही दुप्पट आहे. अशात पाकिस्ताला केवळ सात दिवस तग धरणे शक्य होईल. दोन्ही देश युद्धासाठी किती तयार आहेत, हे जाणून घेऊ या.**

### भारताच्या नौदल ताफ्यात २९३ तर पाकिस्तानकडे १२१ जहाजे आहेत



| भारत | | पाकिस्तान |
|---|---|---|
| २ | विमान वाहक | ० |
| १० | पाणबुडी | ८ |
| १३ | डिस्ट्रॉयर | ० |
| १४ | फ्रिगेट नौका | ९ |
| १८ | कार्बेट नौका | ९ |
| १३५ | गस्ती जहाज | ६९ |

### भारताकडे २,२२९ तर पाकिस्तानकडे १,३९९ विमाने



| भारत | | पाकिस्तान |
|---|---|---|
| ५१३ | फायटर एअरक्राफ्ट | ३२८ |
| १३० | समर्पित हल्ला | ९० |
| २७० | ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट | ६४ |
| ३५१ | ट्रेनर एअरक्राफ्ट | ५६५ |
| ७४ | स्पेशल एअरक्राफ्ट | २७ |
| ६ | हवाई टँकर | ४ |
| ८९९ | हेलिकॉप्टर | ३७३ |
| ८० | हल्ला हेलिकॉप्टर | ६ |

### भारताकडे पाकिस्तानपेक्षा तिप्पट सैनिक आहेत



| भारत | | पाकिस्तान |
|---|---|---|
| १४.५५ लाख | सक्रिय जवान | ६.५४ लाख |
| ११.५५ लाख | राखीव जवान | ५.५ लाख |
| २५.२७ लाख | निमलष्करी सैनिक | ५ लाख |
| १.४८ लाख | चिलखती वाहने | १७ हजार |
| ४२०१ | टँक | २६२७ |
| ४०७५ | आर्टिलरी | ३२९१ |
| २६४ | मोबाईल रॉकेट प्रोजेक्टर | ६०० |

# 'ऑपरेशन सिंदूर' अद्याप सुरू

**सर्वपक्षीय बैठकीनंतर रिजिजू यांचाही पुनरुच्चार ● राहुल म्हणाले- आम्ही सरकारसोबत**

**नवी दिल्ली, ८ मे**

पाकिस्तानविरुद्ध ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे. म्हणजेच ७ मे रोजी पाकिस्तानातील ९ ठिकाणी झालेल्या हवाई हल्ल्यानंतरही कारवाई थांबलेली नाही, असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले.

दिल्लीतील संसदेच्या कक्षात बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत संरक्षणमंत्र्यांनी हे सांगितले. सुमारे दीड तास चाललेल्या बैठकीतून बाहेर पडल्यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनीही संरक्षणमंत्र्यांच्या विधानाचा पुनरुच्चार केला. ऑपरेशन सिंदूरची माहिती देण्यासाठी बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खडगे उपस्थित होते.

बैठकीपूर्वी काँग्रेसने पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीची मागणी केली होती. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे म्हणाले की, या संकटात आम्ही देश आणि सरकारसोबत आहोत. सरकारवर टीका करण्याची गरज नाही.

राहुल गांधी म्हणाले, आम्ही सरकारला पूर्ण पाठिंबा दिला आहे. मल्लिकार्जुन खडगे म्हणाले त्याप्रमाणे, त्यांनी (सरकारने) म्हटले की काही गोष्टी आहेत ज्यांवर आपण चर्चा करू इच्छित नाही. एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी म्हणाले, ऑपरेशन सिंदूरसाठी मी आपल्या सशस्त्र दलांचे आणि सरकारचे कौतुक केले आहे. आपण रेझिस्टन्स फ्रंट या दहशतवादी संघटनेविरुद्ध जागतिक मोहीम सुरू केली पाहिजे.

गेल्या बैठकीत, सरकारने पहलगाम हल्ल्यात सुरक्षेत त्रुटी असल्याचे मान्य केले होते.

पहलगाम हल्ल्यात सुरक्षेत त्रुटी असल्याचे यापूर्वीच्या सर्वपक्षीय बैठकीत, केंद्र सरकारन मान्य केले होते. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले होते की, आयबी आणि गृह मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी बैठकीत सुरक्षेतील त्रुटींबद्दल विरोधी नेत्यांना माहिती दिली. आपण सरकारसोबत आहोत, असे त्यावेळी विरोधकांनी सांगितले होते. तसेच पाकिस्तानातील दहशतवादी छावण्या नष्ट करण्याची मागणी देखील विरोधी पक्षाच्या खासदारांनी केली होती. सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर कारवाई करावी, असे ते म्हणाले. बैठकीनंतर राहुल गांधी म्हणाले - सरकारच्या प्रत्येक कृतीला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. (वृत्तसंस्था)



ऑपरेशन सिंदूरवर आयोजित सर्वपक्षीय बैठकीदरम्यान काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी समाजवादी पक्षाचे नेते रामगोपाल यादव आणि तृणमूल काँग्रेसचे सुदीप बंदोपाध्याय.

# अत्याधुनिक क्षेपणास्त्रे भारताच्या सीमेवर तैनात

**नवी दिल्ली, ८ मे**

पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानविरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून भारतीय लष्कर व हवाई दलाने पाकिस्तान व व्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या नऊ तळांवर हवाई हल्ले करत ते उद्‌ध्वस्त केले आहेत.

यानंतर पाकिस्तानबरोबर वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर, भारतीय लष्कराने पश्चिम सीमेवर आयसीएलए-एस हवाई संरक्षण क्षेपणास्त्रे तैनात केली आहेत आणि भारतीय हवाई दलाचे एसयू-३० एमकेआयमध्ये प्रगत बीव्हीआर क्षेपणास्त्रांनी सज्ज केले आहे. याबाबत दूरदर्शनच्या एका व्हिडीओमध्ये माहिती देण्यात आली आहे. सीमेलगतच्या राज्यांना हाय अलर्ट याचबरोबर केंद्र सरकारने संभाव्य धोक्यासाठी पूर्ण तयारी केल्याचे दिसत आहे. याचाच भाग म्हणून सीमेलगत असलेल्या राज्यांना हायअलर्ट देण्यात आला आहे. राजस्थान आणि पंजाब राज्य अलर्ट मोडवर असून पोलिसांच्या सर्व सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच, सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी घालण्यात आली आहे. राजस्थानची १ हजार ३७ किमीची सीमा पाकिस्तानला लागून आहे. त्यामुळे या राज्यात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.



या राज्याची सीमा पूर्णपणे सील करण्यात आली असून संशयास्पद हालचाली आढळल्यास सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना शूट अॅट साईटचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, भारतीय हवाई दलही पूर्णपणे सज्ज आहे. पश्चिम क्षेत्रातील आकाशात लढाऊ विमाने गस्त घालत असल्याने जोधपूर, किशनग्रह आणि बिकानेर विमानतळ ८ मेपर्यंत बंद ठेवण्यात आले आहेत

## अग्रलेख...

# प्रहाराय सन्निहितः...

गेल्या जवळपास १५ दिवसांपासून देशात उफाळलेल्या संतापाच्या लाटा अखेर बुधवारच्या निर्णायक कारवाईमुळे आश्वस्ततेच्या किनाऱ्यावर येऊन स्वस्थ झाल्या आहेत. बुधवारची पहाट उजाडण्याआधीच केवळ २५ मिनिटांत आपल्या समंजस राजनीतीचे आणि आंतरराष्ट्रीय संकेतांचा आदर करण्याच्या भावनेचे दर्शन घडवून भारताने केवळ पाकिस्तानलाच नव्हे, तर उभ्या जगाला आपल्या सामर्थ्याची जाणीव करून दिली आहे. २२ एप्रिलला काश्मीरच्या पहलगाम येथे निरपराध पर्यटकांवर हल्ला करून त्यांची गोळ्या घालून हत्या करण्याचे उद्दाम धाडस अतिरेक्यांनी केले, तेव्हाच पाकिस्तानच्या पापाचा घडा भरल्याचे स्पष्ट झाले होते. भारताच्या समाजजीवनाला एक संस्कृती, परंपरा आहे आणि त्यामध्ये स्त्रीचे सौभाग्यलेणे असलेल्या, तिच्या भाळावरच्या कुंकवाचे स्थान सर्वोच्च आदराचे आहे. पाकिस्तानातील धर्मांध अतिरेक्यांच्या म्होरक्यांनी पढवून भारतात पाठविलेल्या कट्टरपंथी अतिरेक्यांनी भारतीय महिलांच्या कपाळावरचे कुंकूच पुसून टाकण्याचा उद्दामपणा केला. त्याचे स्पष्ट प्रत्यंतर पुढे १३ दिवसांतच पाकिस्तानला आले आहे. पाकिस्तानच्या हद्दीत घुसून त्यांना काही कळण्याच्या आत व कोणतीही कृती करण्याची वा बचावाची संधी न देता भारताच्या लष्कराने अभूतपूर्व युद्धनीतीचे दर्शन घडविले आहे. 'प्रहाराय सन्निहितः जयाय प्रशिक्षितः' ही आपल्या संस्कृतीने आखून दिलेली युद्धनीती आहे. कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर काहीशा द्विधा मनःस्थितीमुळे गलितगात्र होऊन माघारीच्या विचारांनी ग्रासलेल्या अर्जुनास युद्धासाठी प्रवृत्त करताना, रणांगणात त्याच्या रथाचे सारथ्य करणाऱ्या भगवान श्रीकृष्णाने उपदेशातून दिलेला हा संदेश केवळ महाभारतातील त्या एका युद्धापुरता सीमित नव्हता, तर तो समाजमनावरचा शाश्वत संस्कार होता. त्यामुळे पुढे युगे लोटून गेल्यानंतरही आपल्या संस्कृतीने आणि परंपरेने या उपदेशाची पालखी अभिमानाने खांद्यावर मिरविली आणि प्रत्येक पिढीने पुढच्या पिढीच्या खांद्यावर सोपवूनच जगाचा निरोप घेतला आहे. युद्धासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत आणि प्रत्येक युद्धात विजय प्राप्त करणे हेच आमचे अंतिम उद्दिष्ट असेल, ही श्रीकृष्णाची शिकवण केवळ गीतापठनापुरती राहिलेली नाही, तर जेव्हा जेव्हा युद्धाचा प्रसंग लादला गेला, तेव्हा तेव्हा ती आचरणात आणली गेलेली आहे. बुधवारचा दिवस उजाडण्याआधी पाकिस्तानातील दहशतवादी अड्ड्यांवर उडालेला हलकल्लोळ आणि अनपेक्षिताच्या धक्क्याने पाकिस्तानात माजलेला भयगंड पाहता, भारतातील जनतेस अपेक्षित असलेल्या विजयाचा आनंद उत्स्फूर्तपणे व्यक्त होणे गैर नव्हतेच. त्यातही अतिरेक्यांनी भ्याड हल्ल्यात ज्या महिलांचे कुंकू पुसण्याचे बेमुर्वत धाडस केले, त्या प्रत्येक धाडसाच्या पापाचे माप त्यांच्या पदरात घालण्याची कृतीदेखील अनपेक्षित नव्हतीच. या प्रत्येक हल्ल्यास आणि अशा कृतीला प्रोत्साहन देणाऱ्या प्रत्येक विघातक शक्तीला धडा शिकविण्याची प्रतिज्ञा पंतप्रधानांनी केल्यानंतर देशातील प्रत्येक राष्ट्रप्रेमी नागरिकाच्या मनात प्रतिशोधाच्या भावना उफाळून येणे साहजिक होते. 'ऑपरेशन सिंदूर' या नावाने भारतीय सेना दलाने आखलेल्या या ऐतिहासिक मोहिमेतून, पहलगामच्या संकटामुळे पुसल्या गेलेल्या प्रत्येक सिंदुराचा हिशेब पूर्ण झाल्याचा उन्माद देशात उफाळला, तेव्हा या संयमाची संयत जाणीव करून देण्याचे समंजस पाऊल केंद्र सरकारने कोणताही गाजावाजा न करता उचलले. युद्धज्वराच्या उन्मादाचे भरते पुन्हा जागेवर आणण्याच्या दृष्टीने बुधवारी भारतीय संरक्षण दलाने आणि सरकारने केलेल्या कृतीची दखल घ्यायलाच हवी. कारण देशातील अनेकांच्या भावनांचा अतिरेक होऊन देशात सामाजिक विद्वेष उफाळून उद्रेक होणार नाही किंवा सामाजिक भेदभावाच्या भिंती उभ्या राहणार नाही, याची खबरदारी घेणे सरकारच्या व संरक्षण खात्याच्या त्या कृतीमुळेच साध्य झाले आहे.

सैन्य दलाने पाकिस्तानात घुसून तेथे असलेल्या अतिरेक्यांच्या अड्ड्यांना लक्ष्य केले. सर्वसामान्य नागरिकांस या कारवाईची कोणतीही झळ पोहोचणार नाही, याची पुरेपूर दक्षता घेत भर नागरी वस्तीतील अतिरेकी अड्डे उद्ध्वस्त करणे हे सोपे आव्हान नव्हते. त्यामुळेच अत्यंत अभ्यासपूर्वक आखणी करून सीमेपलीकडच्या केवळ अतिरेक्याचा तळ असलेल्या जागांचा ठावठिकाणा अचूक शोधून काढणे व नेमके लक्ष्य साधून त्यावर अचूक मारा करणे हे काहीसे असाध्य आणि सामान्यांच्या कल्पनेसही शिवणार नाही, असे काम सैन्य दलाने अर्ध्या तासाहूनही कमी वेळात पूर्ण केले. पहलगामच्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारतीय सैन्यास कारवाईची संपूर्ण मुभा देताना मोदी सरकारच्या ज्या काही अपेक्षा होत्या, त्यांची एवढ्या प्रगाढ आत्मविश्वासाने यशस्वी पूर्तता करण्याच्या सैना दलांच्या या कार्यवाहीबद्दल स्वतः पंतप्रधानांनीच त्यांचे कौतुक केलेच, पण कारवाईच्या यशाचे संपूर्ण श्रेयदेखील सैन्य दलांच्या पराक्रमास बहाल करून संयमशील नेतृत्व गुणाचे दर्शनही घडविले. बुधवारच्या दिवसभर देशात युद्धज्वराचा उद्रेक माजला होता, तसे काही विघ्नसंतोषींना मोदीद्वेषाच्या ज्वराचीही बाधा झाल्याचे दिसू लागले होते. अर्थात, मोदीद्वेषाच्या ज्वराचे विषाणू राजकीय विरोधातूनच फोफावत असल्याने अशा आव्हानात्मक स्थितीत त्यांना आवर घालण्याचा विवेक दाखविणे शक्यदेखील होते; पण तसे झाले नाही. भारतीय लष्कराचे मोकळ्या मनाने अभिनंदन करताना, मोदी यांनी स्वतःच न घेतलेल्या श्रेयाचे माप त्यांच्या पदरात पडू नये यासाठी काही विरोधी नेत्यांची अहमहमिका सुरूदेखील झाली होती. अर्थात, अशा प्रसंगी नेतृत्वाच्या संयमाचीही कसोटी लागत असते. देशातील द्वेषाच्या संकुचित भावनांकडे फारसे लक्ष न देता, ऑपरेशन सिंदूरच्या कारवाईनंतर जगातील प्रमुख राष्ट्रांना भारताच्या या कृतीचे कारण पटवून देण्याची तत्परता दाखवत असतानाच लष्कराच्या वतीने देशातील माध्यमांच्या मंचावरही कारवाईमागची भूमिका स्पष्ट करणारी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली, तेव्हाही छिद्रान्वेषी द्वेषबुद्धीने पछाडलेल्या काहींनी त्यातूनही सामाजिक भेदाचे मुळातच नसलेले धागे उसविण्यास सुरुवात केली होती. या पत्रकार परिषदेत भारतीय सेनादलाच्या दोघा महिला अधिकाऱ्यांनी देशाची कारवाईमागील भूमिका स्पष्ट केली होती. भारताची ही कारवाई लक्ष्यकेंद्रित, प्रतिक्रियात्मक आणि सुनियोजित असल्याचे या पत्रकार परिषदेतही स्पष्ट करण्यात आले होते आणि हे पाकिस्तानवरील हल्ला किंवा पाक लष्कराशी छेडलेले युद्ध नसून भारतात अस्थिरता माजविणाऱ्या दहशतवादी कारवायांच्या बंदोबस्ताकरिता उचललेले पाऊल होते, हेही भारताने स्पष्ट केले होते. यावर पाकिस्तानकडून कोणत्याही स्वरूपात हल्ला किंवा लष्करी कारवाई झाली तर त्यास मात्र योग्य ते प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशाराही भारताने दिला होता. त्यानंतरही पाकिस्तानच्या सैन्याकडून भारताच्या उत्तर व पश्चिमेकडील सीमेवर अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, जालंधर, लुधियाणा, आदमपूर, भटिंडा, चंडीगढ, भुज आदी भागात ड्रोन व मिसाईलचे हल्ले झाल्याने गुरुवारी सकाळी भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या संरक्षण यंत्रणांचा भेद करून जशास तसे उत्तर दिले आहे. भारतीय सैन्याने लाहोरचा लष्करी तळच उद्ध्वस्त केल्यामुळे भयाने पछाडलेल्या पाकिस्तानच्या उतावळ्या कारवायांत १६ निरपराध भारतीयांचा मृत्यू ओढवला. त्यामध्ये तीन महिला व पाच बालकांचा समावेश आहे. पाकिस्तानच्या या युद्धखोर कुरापतीमुळे आता 'ऑपरेशन सिंदूर' या कारवाईचा पुढचा टप्पा सुरू होणे अपरिहार्य दिसते. धडा शिकविण्यासाठी युद्ध हाच निर्णायक पर्याय असेल, तर आता त्याची अपरिहार्यता लक्षात घेऊन भारताच्या प्रत्येक नागरिकाने संयम, समंजसपणा दाखवून विद्वेषाचे राजकारण बाजूला ठेवावयास हवे. केंद्र सरकारने गुरुवारी बोलाविलेल्या सर्वपक्षीय बैठकीत विरोधी पक्षांनी समंजसपणाचे दर्शन घडविले आहे. आता समाजाने ही जबाबदारी पार पाडावयास हवी. सामाजिक सौहार्द आणि ऐक्य ही देशाची सर्वात मोठी शक्ती आहे, याची पंतप्रधान नरेंद्र मोदी वारंवार जाणीव करून देत असतात. भारतीय जनतेची ही शक्ती पुढच्या संघर्षाचे मोठे पाठबळ ठरणार आहे. कारण दहशतवादी हल्लेखोरांनी निरपराध भारतीय नागरिकांना गोळ्या घालण्याआधी त्यांचा धर्म कोणता ते विचारले होते. आता भारतीयांचा धर्म दाखवून देण्याची वेळ समोर येऊन उभी राहिली आहे.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१८)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

महाभारत हे महाकाव्य महर्षी व्यासांनी ब्रह्मदेवाच्या विशेष आग्रहाने रचिले, अशी पारंपरिक श्रद्धा आहे. तोच प्रकार महर्षी वाल्मीकिंच्या रामायणाबाबतही घडला आहे, असे सांगितले जाते. वरील दोन्ही ग्रंथात भारतीय जीवन पद्धतीचाच नव्हे, तर ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या समग्र सृष्टीचा, त्यात विकसित झालेल्या 'मानव' या घटकाचा, त्याच्या जीवनाचा इतक्या सूक्ष्मतम स्तरावर आणि विविधांगांनी विचार झाला आहे की, ते वाचल्यावर, त्यावर विचार आणि मनन केल्यावर मनात 'आश्चर्य भावा'व्यतिरिक्त दुसरा कोणताच भाव निर्माण होत नाही. वरील दोन्ही ग्रंथ हे अतींद्रिय विज्ञानातून, म्हणजे ऋतंभरा प्रज्ञेतून निर्माण झाले. वेदकाळापासून 'ऋत' आणि 'सत्य' या दोन ज्ञानशाखा अस्तित्वात आहेत. आजच्या परिभाषेत 'ऋत म्हणजे कॉस्मिक लॉज, त्यालाच आपण त्रिकालाबाधित सिद्धांत असे म्हणतो आणि 'सत्यम' म्हणजे अस्तित्वात असलेले हृदयमान असलेले, वस्तुनिष्ठ असलेले अनुभवायला येणारे असे! या दोनही शाखांमधूनच अनादिकाळापासून तत्त्वज्ञान म्हणजे सृष्टीच्या निर्मितीचा शोध घेणे आणि बाह्य सृष्टीचा मुळामध्ये जाऊन तिचा शोध घेणारे विज्ञान (सायन्स) निर्माण झाले. वरील दोनही ग्रंथात परमेश्वराच्या 'त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोसि' या दोन्हीही स्वरूपाचा महाकवींनी शोध घेतला आहे. त्या दृष्टीने या महाकाव्यांचा सखोल अभ्यास आणि चिंतन होणे आवश्यक आहे. या आधीच्या लेखांमधून महाभारत आणि भारत यांचा परस्परांशी कसा 'जन्य-जनक' संबंध आहे, चक्रवती भरताचे वारसदार म्हणून येथील राहणारा हिंदू समाजच कसा येथील राष्ट्रीय समाज आहे म्हणजे हिंदुत्व हेच येथील राष्ट्रीयत्व आहे, याचा शोध घेतला. त्याचबरोबर भारत वर्षाची पहिली फाळणी ही द्वापार युगात झाली. त्यातूनच परिणामतः कुरुक्षेत्रावरील भीषण असे अण्वस्त्रयुक्त महायुद्ध घडले. त्याचे कारण दुसऱ्याचे राज्य गिळंकृत करण्यासाठी साम, दाम, दंड, कुटिल कारवाया आणि आत्यंतिक द्वेषमूलक व्यवहार करणाऱ्या 'धृतराष्ट्री' मनोवृत्तीमुळे हे महाभारत युद्ध घडले आहे. धृतराष्ट्री मनोवृत्तीचे आधुनिक काळातील प्रतीक म्हणजे पाकिस्तानी वृत्ती. जी हिंदू धर्म, हिंदू समाज, संस्कृती यांचा 'काफर' म्हणून मध्ययुगीन ऐतिहासिक काळापासून दुर्योधनालाही लाजवेल असा तीव्र, जहरी द्वेष करीत आहे, त्याचे प्रत्यंतर पहलगाम येथील यात्रेकरूंवर जो ओळख विचारून, धर्म विचारून गोळ्या झाडून ठार मारण्याचा प्रसंग घडला त्यावरून लक्षात घ्यायला हरकत नाही. त्याचबरोबर



दुर्योधनाला 'सुयोधनं' म्हणण्याचा एकतर्फी सज्जनपणा दाखवून त्या सज्जनपणाला आधुनिक परिभाषेत 'सेक्युलॅरिझम' सर्वधर्मसमभाव- तुमचे-आमचे पूर्वज एकच होते. 'हिंदू-मुस्लिम भाई भाई' वगैरे 'सॉफिस्टेकेटेड' आवरणाने ओंजारून-गोंजारून वास्तवातील कटुसत्य हे कधीही अमृत मधूर होत नसते, हा शत्रू-मित्र विवेक ज्या दिवशी हिंदू समाजाच्या प्रत्येक घटकात खऱ्या अर्थाने रुजेल, भिनेल तो खऱ्या अर्थाने हिंदुत्वाच्या जागृतीचा खरा क्षण वा प्रारंभ बिंदू ठरेल.

महाभारतात 'कृष्ण शिष्टाई' असफल झाल्यानंतरचा विदूर आणि भगवान श्रीकृष्ण यांच्यातील संवाद महर्षी व्यासांनी दिला आहे. विदूर प्रारंभापासूनच धृतराष्ट्री वृत्तीला विरोध करणारा होता (जसे आधुनिक फाळणीच्या विरोधात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, प. पू. श्री गोळवलकर गुरुजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. मुंजे ही मंडळी होती; तरी फाळणी झाली.) त्या संवादात श्रीकृष्ण विदुराला म्हणतात- ''हे महात्मन्! जे घडायचे असते ते घडतच असते. कारण 'नियतीने' ते ठरविलेच असते. कालपुरुषाला हाताशी धरून ती त्याचा परिणाम घडवून आणते. तसे धृतराष्ट्र आणि दुर्योधन यांचे निमित्त करून या आसुरी संपदेच्या, धर्मद्रोही, लोभी, कामांध सत्तापिपासू, स्त्रीभक्षी, पापी नराधमांच्या रक्ताने ही धरा न्हाऊन निघण्याचा क्षण आला आहे असे समज आणि निवांतपणे जे होईल ते पहा. हे विदुरा! हा कुरुवंशीयांचा संघर्ष नसून 'धर्म आणि अधर्म' असा लढा आहे. पांडवांच्या बाजूने धर्म आहे म्हणून मी पांडवांकडून आहे असे समज.'' (कृष्ण-शिष्टाई उद्योगपर्व)

वरील संवादाचे चिंतन केले तर असे जाणवू लागते की, भगवान श्रीकृष्णांना आधुनिक 'भारता'लाही हाच संदेश द्यायचा असेल का? नियतीने, कालपुरुषाने तर हे ठरविले नसेल? कारण महाभारताची रचना काही विशेष उद्देशाने झाली असावी असे वाटते. कारण-

महाभारताची पर्वे १८ आहेत. भगवद्गीतेचे अध्याय १८ आहेत. महाभारतीय युद्ध १८ दिवसच चालले. या युद्धात १८ अक्षौहिणी सैन्याचा सहभाग होता. भगवद्गीतेत अ. १ श्लोक क्र. ४ ते ६ मध्ये पांडवांकडील महत्त्वाच्या वीरांची गणना दिली आहे. तीदेखील १८ च आहे. भीम, अर्जुन, सात्यकि, विराट, द्रुपद, धृष्टकेतू, चेकितान, काशिराज पुरुजित् - कुन्तिभोज, शैव्य, युधामन्यु, उत्तमौजा, सौभद्र, अभिमन्यू आणि द्रौपदीचे पाच पुत्र- असे एकूण १८.

संख्याशास्त्राच्या दृष्टीने १८ ही संख्या वैशिष्ट्यपूर्ण समजली जाते. या शास्त्राप्रमाणे या संख्येचा भाग्यांक वा इन्डेक्स नंबर ९ हा येतो. त्या संबंधात 'लिंडागुडमन' ही भविष्यवेत्ती म्हणते- ''द इन्डेक्स नंबर नाईन इंडिकेटस द कम्प्लिटली चेंज अँड ट्रान्सफर्मेशन ऑफ द सेटल्ड् थिंग्ज'' या संदर्भात विचार केला तर द्विराष्ट्र सिद्धांत मांडून बॅ. जिना यांनी भारताची दुसरी फाळणी करायला भाग पाडले. सन १९४७.

लगेच टोळीवाल्यांच्या आक्रमणाने अर्धा काश्मीर हडपला. नंतर १९६५, १९७१, १९७९ अशी तीन युद्धे भारतावर लादलीत. अनेक दहशतवादी हल्ले मुंबई, दिल्ली-संसद, काश्मीर येथे चालूच आहे. नुकतेच जनरल परवेझ यांनी त्याच 'द्विराष्ट्र' सिद्धांताची मांडणी करून, आतंकवाद्यांना चिथावून हिंदूंचे शिरकाण करण्यासाठी यात्रेकरूंवर हल्ला करायला भाग पाडले. त्याचा परिणाम म्हणून कधी नव्हे तो भारत जागा झालेला दिसतो आहे. प्रतिकार नव्हे तर आक्रमणाची व्यूहरचना करतो आहे. फाळणीचा परिणाम म्हणून कुरुक्षेत्राकडे सैन्याची वाटचाल चालू आहे. महाभारतात म्हटल्याप्रमाणे 'नियतीची, कालपुरुषाची तर ही इच्छा नाही ना?' कारण, सध्याची लोकसभा ही अठरावी लोकसभा आहे.

। कालाय तस्मै नमः ।

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# काळा धूर, पांढरा धूर!


'आग लागल्याशिवाय धूर निघत नाही' अशी आपल्याकडे गावगाड्यात एक म्हण आहे. मोठं मस्त उदाहरण आहे हे सत्य मांडण्याचं! तसे बघितले तर धुराचा संबंध थेट चुलीसोबत येतो. गॅसच्या जमान्यात आता चुलीवरच्या जेवणाची क्रेझ वाढती आहे. अगदी येथे चुलीवरचे मटण आणि जेवण मिळेल, अशा मोठमोठ्या जाहिराती महामार्गावर वाचायला मिळतात. बऱ्याचदा चुलीवरचे जेवण हवे असते. परंतु, त्या चुलीतला धूर नकोसा होतो! हा धूर डोळ्यातून पाणी काढल्याशिवाय राहत नाही. सिगारेट एक जण पितो आणि त्याचा धूर शेजारी बसलेल्याच्या नाका-तोंडात जातो. सिगारेट ओढणाऱ्याचा शौक होतो आणि शेजारी परेशान! 'हम दोनो' या चित्रपटात महम्मद रफी यांच्या आवाजात देवानंदने 'मै जिंदगी गा साथ निभाता चला गया, हर फिक्र को धुव्वे में उडाता चलाता गया,' हे गाणं म्हटले आहे. चिंता धुरात उडवून दिल्याचे म्हटले आहे. धूर म्हणजे शास्त्रीय भाषेत सांगायचे झाल्यास वस्तू जळताना हवेत निर्माण होणारा सुक्ष्म कण आणि वायूचे मिश्रण. धुराचे मुख्य तीन प्रकार आहेत. सेंद्रिय, रासायनिक आणि वाहनांचा धूर. या धुराचे मनुष्याच्या आरोग्यावर आणि पर्यावरणावरही परिणामी होतात. आता तुम्ही म्हणाल, हा एवढा धूर महिमा मांडण्याचे कारण काय? सध्या भारत-पाकिस्तानात तणावाचे वातावरण आहे. आपल्या भगिनींचे सिंदूर मिटवणाऱ्या पाकाड्या दहशतवाद्यांवर भारताच्या सैनिकांनी अर्ध्या रात्री हल्ला करून त्यांचा धुव्वा उडवून दिला असताना आता पुन्हा हे काय नवीनच! तर, भारतातीलच काही अतिबुद्धिवादी (हिंदूच) जेव्हा हिंदूंना अंधश्रद्धाळू म्हणतात तेव्हा या 'धुरा'ची आठवण होते. असाच एक धूर काल ७ मे रोजी (सोनिया गांधी यांचे माहेर) इटली व्हॅटिकन सिटीमध्ये निघतो आहे. होय! आम्ही तिथी, मुहूर्त, काळ आणि वेळ पाळतो. तुम्ही कितीही अंधश्रद्धा म्हणा, आमची देवावर श्रद्धाच आहे. देशात सध्या धर्मांतरणाचा प्रकार जोरावर आहे. अतिशय गरीब आणि आदिवासींसह अन्य मागास समाजाला त्यांच्या अशिक्षित आणि गरजेचा फायदा घेत त्यांना धर्मांतरण करण्यासाठी प्रलोभन दिले जाते. अशा वेळी 'क्रॉस' पाण्यावर तरंगतो आणि तुमचा देव पाण्यात बुडतो. याचा अर्थ आमचा देव तारतो आणि तुमचा बुडवतो, असे त्यांच्यावर पैशांचा लोभात बिंबवले जाते. आमच्या देशात त्यांच्या नीतिमत्तेचा प्रचंड आदर करणारी एक पिलावळ तयार झाली आहे. तसेही भारतातील हिंदूंवर वा काही विशिष्ट जातींवर गरळ ओकणाऱ्यांना डोक्यावर घेतले जात असताना हेच ख्रिश्चन 'पांढऱ्या आणि काळ्या' धुरात अडकले आहेत. हाच धूर त्यांचा 'धर्मगुरू' झाल्याचे संकेत देतो आणि आपण संकेतांना मागासले म्हणतो. आता जाऊ आपण या धुराच्या कौतुकाकडे. ख्रिश्चन धर्मानुसार विद्यमान धर्मगुरू पोप मरण पावल्यानंतर किंवा त्याने राजीनामा दिल्यानंतरच नवीन पोपची निवड होते. पोप फ्रान्सिस यांचे २१ एप्रिल रोजी निधन झाले. काल ७ मे रोजीपासून व्हॅटिकन सिटीत गुप्त निवड प्रक्रिया सुरू झाली आहे. या निवड प्रक्रियेत धुराचेच फार महत्त्व आहे. पोपच्या निवड प्रक्रियेपूर्वीच निवडणुकीचे स्थळ असलेल्या सिस्टिन चॅपलममध्ये शेगडी बसवली जाते. त्या शेगडीवर एक चिमणी लावली जाते. मतदानाच्या दोन फेऱ्यानंतर मतपत्रिका त्या शेगडीवर जाळल्या जातात. त्या मतपत्रिकांचा धूर चिमणीतून बाहेर पडतो. बाहेर पोपच्या निवडीची वाट पाहत उभ्या असलेल्यांना हा धूर निवड प्रक्रियेचे संकेत देतो. चिमणीतून काळा धूर आला तर कोणताही निर्णय झाला नाही आणि पांढरा धूर आला तर नवीन पोपची निवड होऊन त्याचा स्वीकार झाल्याचे समजले जाते. आम्ही हिंदू देवाधर्माला धूप लावातो, यज्ञ करतो तर त्याला थोतांड म्हटले जाते. जेवणापूर्वी अग्निहोत्र करण्यावरही टीका होतात आणि त्या पांढऱ्यांचा संदेश देवाकडे पोहोचविणाऱ्याची निवड मात्र धुरावरून समजल्या जाते. तो त्यांच्या धर्माचा रिवाज आहे. त्या धर्मानुसार त्यांनी वागलेच पाहिजे. परंतु, आमच्यातील काहींना जेव्हा आम्ही ज्या धर्मात जन्म घेतला त्या धर्मापेक्षा इतर धर्म जेव्हा जवळचा वाटतो तेव्हा पांढरा व काळा धूर आठवून द्यावासा वाटतो. आमच्या धर्मगुरूसाठी मतदान वैगेरे होतच नाही. हिंदूधर्मामध्ये अनेक संप्रदाय आहेत. त्या संप्रदायातील वरिष्ठ आपल्या शिष्यांपैकी एकाची वारसदार म्हणून निवड करतात. जेव्हा शंकराचार्य, रामानुजाचार्य वा त्यांच्या समतुल्य आचार्यांचे निधन होते तेव्हा त्यांनी निवड केलेल्या शिष्याला त्यांच्या गादीवर बसवले जाते तर ख्रिश्चन धर्मात सामान्यांचा संदेश देवाकडे घेऊन जाणाऱ्या पोपची निवड केली जाते. हाच मोठा फरक आहे हिंदू आणि ख्रिचन धर्मामध्ये! धर्म कोणताच वाईट नाही. दुसऱ्या धर्माला सहज वाईट म्हणण्याची आपली संस्कृती नाही. परंतु, काहींनी आपल्याच संस्कृतीला नावं ठेवण्याचा ठेका घेतल्यागत गरळ ओकतात तेव्हा पुन्हा त्यांचा 'तरंगता क्रॉस' आणि निघणारा पांढरा 'धूर' सांगावासा वाटतो. आम्ही अंधश्रद्धाळू आणि ते विज्ञानवादी ठरवणाऱ्यांनो वाईट वाटून घेऊ नका. पण, संस्कार, संस्कृती आणि सभ्यतेवर चालत आलेला परंपरागत हिंदू धर्माचा गुरू धुरावरून समजत नाही तर त्याच्या सिद्धतेवरून समजल्या जातो. बुधवारी धूर काळा निघाला म्हणजे धर्मगुरू निवडलाच गेला नव्हता... पांढऱ्या धुराची वाट पाहत राजेहो...!

९८८१९०३७६५

## दखल

# आव्हान महापालिका निवडणुकांचे

**मोरेश्वर बडगे**



जवळपास दोन ते पाच वर्षांपासून रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यात घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाला दिले आहेत. या आदेशाने निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. नोकरशाहीच्या पंज्यातून सुटका होत आहे. एखाददुसऱ्या निवडणुकीचा हा प्रश्न नव्हता. राज्यातील तब्बल २९ महापालिका, तेवढ्याच जिल्हा परिषदा, २५७ नगर परिषदा आणि पंचायत समित्या इथल्या निवडणूक रखडल्या आहेत. एक-दोन महिने नव्हे तर काही वर्षांपासून हे सुरू होते. सुरुवातीला करूना आणि पुढे वेगवेगळ्या कारणाने न्यायालयात गेलेले मामले निवडणुका लांबवत गेले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर सत्ताबदल झाला. महाआघाडीचे सरकार आले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री बनले. त्याच काळात कोरोना संकट आले. निवडणुका साऱ्यांनाच हव्या आहेत. मात्र त्या कशा असाव्यात यावरून मतभेद आहेत. त्यातून ओबीसी आरक्षणाचा पेच आला. प्रभाग रचना कशी असावी हाही विषय आला. उद्धव सरकार अडीच वर्षे टिकले. विविध कारणांमुळे या निवडणुका लांबत गेल्या. आताही सर्वोच्च न्यायालयाचा असा आदेश येईल, याची कोणीही कल्पना केली नसेल. पुढची तारीख पडेल, पुढे उन्हाळ्याची सुटी आहे. त्यामुळे निवडणुका पुढल्या वर्षी जातील असे गृहीत धरूनच सारे राजकीय नेते चालले होते. या साऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने आश्चर्याचा झटकाच दिला, असे म्हटले पाहिजे. ओबीसी आरक्षणाचा मोठा गुंतागुंतीचा विषय सर्वोच्च न्यायालयाने एक झटक्यात मार्गी लावला. न्यायालयाने बांठिया आयोगाचा अहवाल बाजूला ठेवला. २०२२ च्या पूर्वी ओबीसींना जेवढे आरक्षण देण्यात येत होते ते कायम ठेवून निवडणुका घ्या, असे कोर्टाने म्हटले आहे. मात्र या संदर्भातील अन्य याचिकांवरील निकाल या निवडणुकांना बांधील असेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यात निवडणुका घ्यायला सांगितले असले, तरी ते वाटते तेवढे सोपे नाही. न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगापुढे अनेक प्रश्न उभे राहणार आहेत. प्रभाग रचना कशी ठेवायची? हा नाजूक विषय आहे. प्रभाग रचनेबाबत न्यायालयाच्या आदेशात स्पष्टता नाही. २०१७ नंतर प्रथमच निवडणुका होत आहेत. या पाच वर्षांत लोकसंख्या खूप वाढली आहे. या वाढलेल्या लोकसंख्येचे काय? त्यांना सोबत घ्यायचे तर तयारीला वेळ लागू शकतो. ठाकरे सरकारच्या निर्णयानुसार वाढीव प्रभाग संख्येआधारे प्रभाग रचना तयार करण्यात आली आहे. शिंदे-फडणवीस सरकारच्या निर्णयानुसार जुन्या पद्धतीने प्रभागरचना करायची असल्यास काही महिन्यांचा अवधी लागेल. महाआघाडी सरकारने वाढवलेली प्रभाग संख्या शिंदे सरकारने पूर्ववत केली होती. या निर्णयालाही न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. प्रभाग रचनेचे अधिकार कोणाचे? यावरूनही वाद आहेच. एकूणच सारा संशयकल्लोळ आहे. मात्र अडचण असेल तर माझ्याकडे येऊ शकता, असे न्यायालयाने आधीच सांगून टाकले आहे. तुम्हाला सांगतो, निवडणूक चार महिन्यात घेणे अवघड आहे. निवडणूक आयोगाला न्यायालयाकडे मुदतवाढ मागावी लागेल. खूप सारे तांत्रिक अडसर आहेत. मात्र निवडणुका झाल्या पाहिजेत या मुद्यावर न्यायालय आग्रही आहे. पाच-पाच वर्षे निवडणुका नव्हत्या. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नोकरशाहीचे राज्य होते. कोर्टाने निवडणुका घ्यायला सांगितले त्यामागे लोकप्रतिनिधींचे राज्य आणण्याचा मुख्य विचार असावा असे दिसते. न्यायालय थोडीफार मुदतवाढ देऊ शकते. पावसाळ्यानंतरच निवडणुका होतील. गणपती उठल्यानंतरच निवडणुका होऊ शकतात. दसरा-दिवाळीनंतर निवडणुका घ्या, असेही काही जणांचे म्हणणे आहे. एकूणच येणारे दिवस सणासुदीचे आहेत. त्यातला एखादा मुहूर्त आयोगाला पकडावा लागेल. मात्र ही सर्कस लहान नाही. 'एक निवडणूक, दहा भानगडी' आहे. महापालिकांपासून तो जिल्हा परिषद, नगरपालिका आणि ग्रामपंचायतीपर्यंत निवडणुका करायच्या आहेत. या साऱ्या निवडणुका एकाच दिवशी घेता येणे शक्य नाही. न्यायालय किती मुदतवाढ देतो ते पाहायचे. सध्या पाकिस्तान सीमेवर तणाव आहे. आपण युद्धपूर्व परिस्थितीतून जात आहोत. तणाव वाढला तर निवडणुका बेमुदत लांबू शकतात. या नव्या मुद्यावर लोकांनी आव्हान दिले तर न्यायालय काय भूमिका घेते, तेही पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. १५ मे पासून नवे सरन्यायाधीश भूषण गावी सरन्यायाधीशाची सूत्रे घेत आहेत. ते या घडामोडींकडे कसे पाहतात त्याचीही उत्सुकता असणार आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर महापालिका निवडणुका आल्या आहेत. एक प्रकारच्या या मिनी-विधानसभा निवडणुकाच आहेत. दोन्ही निवडणुकीत एकदम वेगवेगळे निकाल लोकांनी दिले. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकांचा काय मूड राहील, याचे सर्वच राजकीय पक्षांना टेन्शन आहे. इथे स्थानिक मुद्दे महत्त्वाचे ठरतात. मात्र, यावेळी राजकीय समीकरणं बदलली आहेत. उद्धव यांना हिंदुत्व सोडल्याची शिक्षा द्यायला मुंबईचा मतदार मैदानात उतरलेला दिसेल. अपवाद सोडले तर महायुती या निवडणुका एकत्र लढेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगेच सांगून टाकले. यावरून मुख्यमंत्र्यांचा जबरदस्त आत्मविश्वास दिसून पडतो. कुठल्याही परिस्थितीत यावेळी मुंबई महापालिका उद्धव ठाकरे यांच्या हातून हिसकायची हे भाजपाचे टार्गेट आहे. भाजपाशी पाच वर्षांपूर्वी केलेल्या दगाबाजीचा बदला घेताना फडणवीस दिसतील. त्यामुळे मुंबईची निवडणूक अतिशय चुरशीची राहणार आहे. 'मी राहीन किंवा तू राहशील' असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीत फडणवीस यांना दिले होते. तिथे तर धुव्वा उडाला. उरलेसुरले उद्धव या निवडणुकीत मुंबईच्या राजकारणातून फेकले गेलेले दिसतील. महाआघाडी केव्हाच मोडल्यात जमा आहे. मुंबईत घटस्फोटाचे कागद लिहिले जातील. काँग्रेस रिकामी झालेली दिसेल. शरद पवारांची राष्ट्रवादी पेन्शनीत गेलेली दिसेल. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येत असल्याची चर्चा नेहमीसाठी थांबलेली दिसेल. मराठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी आपण एकत्र यायला तयार असल्याची तयारी राज ठाकरे यांनी एका पॉडकास्टमध्ये दाखवली होती. राज यांच्या या टाळीला उद्धव ठाकरे यांनी सशर्त हाळी दिली. भाजपा आणि शिंदे सेनेशी संबंध तोडावे लागतील, ही उद्धव यांची अट राज ठाकरे कबूल करणे कदापि शक्य नाही. उद्धव यांनाही ते ठाऊक आहे. त्यामुळेच त्यांनी तशी अट टाकली. तुम्ही लिहून घ्या, दोन्ही भावांचे मनोमिलन या जन्मी शक्य नाही. त्यामुळे मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे अशा काही महत्त्वाच्या महापालिका निवडणुकीत चौरंगी-पंचरंगी लढती होतील. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी ही दुसरी अग्निपरीक्षा असेल. शिवसेनेच्या फुटीनंतर आपली शिवसेना हीच खरी शिवसेना आहे हे शिंदे यांना पुन्हा एकदा दाखवून द्यावे लागेल. आपण नाराज नाही हेही निकालातून सांगावे लागेल.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### भारताचे चोख प्रत्युत्तर...

'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी करून भारतीय सैन्याने पहलगाम येथे मरण पावलेल्या २६ पर्यटकांच्या हत्येचा बदला घेतला आहे. भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देणाऱ्या भारतीय सैन्याच्या या गौरवपूर्ण कामगिरीने १४० कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. भारतीय सैन्याच्या या कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान असून १४० कोटी भारतीय भारतीय सैन्य दलापुढे नतमस्तक आहेत. जो भारताकडे तिरक्या नजरेने पाहिल त्याला भारत घरात घुसून मारेल, असा इशाराच भारताने या मोहिमेद्वारे पाकिस्तानला दिला आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ॲक्शनला री-ॲक्शन मिळणारच. हा भारत २०२५ चा भारत आहे, हे भारताने पाकिस्तानला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. ही मोहीम यशस्वी करून भारतीय सैन्य दलाने आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले आहे. अर्थात भारताने व्याप्त काश्मीरवर केलेला हा पहिला हवाई हल्ला नाही. या आधी २०१६ आणि २०१९ साली भारताने असाच हवाई हल्ला करून पाकिस्तानला इशारा दिला होता. मात्र दोनदा हवाई हल्ले झाल्यानंतरदेखील पाकिस्तानची खोड मोडली नाही. पाकिस्तानने दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करणे चालूच ठेवले; त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागले. आता तरी पाकिस्तानने शहाणे व्हावे व दहशतवाद्यांना केली जाणारी लष्करी व आर्थिक मदत थांबवावी नाही तर भारत यापेक्षाही मोठी कारवाई करेल. ऑपरेशन सिंदुर यशस्वी करणाऱ्या भारताच्या सैन्यदलाला सॅल्युट! जयहिंद !!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### ईपीएस-९५ पेन्शनर्सच्या भावनांची थट्टा

ईपीएस-९५ पेन्शनर्स त्यांना मिळणाऱ्या तुटपुंज्या पेन्शनबद्दल आपली व्यथा विविध स्तरावर, अगदी केंद्रातील सत्ताधारी सरकार दरबारी मांडून थकली. नुसत्या आश्वासनाव्यतिरिक्त काहीच हाती लागले नाही. ना महागाई भत्ता, ना वैद्यकीय सवलत, ना पेन्शनमध्ये वार्षिक वृद्धी अशा विविध विवंचना सहन करीत हे पेन्शनर्स हालअपेष्टा झेलत आपले जीवन निर्वाहन करीत आहे. परंतु सोशल मीडियाचे यूट्यूब चॅनल मागील काही महिन्यांपासून या ईपीएस-९५ पेन्शनर्सना खोटी आशा दाखवत वाढीव पेन्शन ती देखील कधी पाच हजार, कधी साडेसात हजार, महागाई भत्ता, वैद्यकीय सवलत हे सर्व लवकरच सरकारद्वारे देण्यात येणार असल्याच्या छोट्या क्लिप्स दाखवत दिशाभूल करीत आहे. बरेचदा तर खुद्द वित्तमंत्री निर्मला सीतारामन व पंतप्रधानांचे छायाचित्र सोबत दाखवून जणू काही त्यांनी हा निर्णय घेतलाच आहे, हे भासवण्यात येते. वास्तविक या अशा खोट्या बातम्या म्हणा किंवा आश्वासन म्हणा, वाचून ईपीएस-९५ पेन्शनधारक लगेच उत्साहित व आनंदी होतात, परंतु सत्य परिस्थितीत लक्षात येताच त्यांचा विरस होतो व त्यांची कशी क्रूर थट्टा करण्यात येत आहे, हे ध्यानात येताच हिरमुसले होतात. ईपीएस-९५ पेन्शनर्स आधीच दुखावले असल्यामुळे त्यांच्या भावनांची क्रूर थट्टा बंद झालीच पाहिजे.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### हिंदूसूर्य महाराणा प्रताप

महाराणा प्रतापसिंहांच्या तेजाने केवळ राजपुतांनाच नव्हे, तर सारा भारत देश असा काही तेजाळला आहे की, राणा प्रतापसिंहांचे नाव आजही संपूर्ण भारतात पूज्य मानले जाते. राजस्थानच्या वीरभूमीत शिसोदिया कुलातील मेवाडचे राजा उदयसिंग यांना ९ मे १५४० रोजी पुत्रप्राप्ती झाली; तेच मेवाडचे मेरुमणी महाराणा प्रताप सिंह होय. याच मेवाडच्या सिंहाने मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी २५ वर्षे लढा दिला. या लढ्यात त्यांना पत्नीला बरोबर घेऊन मुलाबाळांसह जंगलात भटकावे लागले, तहान-भूक विसरावी लागली. मेवाडचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात तोड नाही. राजस्थानचे सारे राजमुकुट आपल्या चरणी वाकले, परंतु अजून मेवाडचा राणा प्रताप आपल्याला शरण येत नाही, या गोष्टीचे अकबराला विलक्षण वैषम्य वाटत होते. त्याने इतर राजपूत सरदारांद्वारे त्यासाठी खूप प्रयत्न केले, परंतु राणा प्रताप यांनी कोणतीही अपमानकारक तडजोड करण्याचे नाकारले, त्यामुळे लढाई अपरिहार्य ठरली. अकबराच्या आक्रमणास तोंड देण्यासाठी राणा प्रताप सिद्ध झाले. स्वाभिमानशून्य मानसिंगाच्या पंक्तीला राणाप्रताप बसले नाहीत. या अपमानाने त्याचे मन सुडाच्या भावनेने भरून गेले. संतापलेला मानसिंगाने नंतर मोठे सैन्य घेऊन अरवलीच्या पर्वतात येऊन रणावर हल्ला केला. हल्दीघाट येथे दोघांमध्ये घनघोर लढाई झाली. राणांचे सैनिक जीवावर उदार होऊन लढले पण मुघलांचे सैन्य अफाट होते. अखेर राणा प्रताप आपल्या चेतक घोड्यावर स्वार होऊन चपळाईने तेथून बाहेर पडले. चेतक घोड्याला शेकडो जखमा झाल्या होत्या. महाराणांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात शत्रू समोर आपला स्वाभिमान निलाम न करता लढाईचा मार्ग पत्करला आणि आपल्या मातृभूमीचे रक्षण केले. भारताच्या इतिहासात राम, कृष्ण व शिवाजी यांच्याप्रमाणेच महाराणा प्रतापांचे नावही अजरामर झाले आहे.

**पंकज वसंत पाटील**/९८५०४३०५७९

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### सात्विकी गड्डुम हिचे १२वी परीक्षेत उज्वल यश

**सोलापूर, दि. ८ मे-**
येथील सात्विकी गड्डुम हिने महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या १२वी परीक्षेत ९०.५०% गुण मिळवत उज्वल यश प्राप्त केले. सात्विकी ही चाटला पैठणीचे व्यंकटेश चाटला यांची नात आहे. यापुढेही शिक्षणात असेच यश मिळवण्याचा विश्वास तिने व्यक्त केला आहे. तिचा चाटला पैठणीचे व्यंकटेश चाटला, पुष्पा चाटला, लक्ष्मीकांत गड्डुम व निशा गड्डुम यांनी सत्कार करून अभिनंदन केले.



### 'ऑपरेशन सिंदूर' साठी फटाके फोडून आनंदोत्सव!

**सोलापूर, दि. ८ मे-**
पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर देत भारतीय लष्कराने पाक व्याप्त कश्मीर तसेच पाकिस्तान मधील पंजाब प्रांतात आतंकवाद्यांचे अड्डे उद्‌ध्वस्त केले. याचा आनंदोत्सव आज सौंदणे येथे भाजपाच्या कार्यकर्त्यांनी साजरा केला. भारतीय लष्कराने या स्ट्राइकला ऑपरेशन सिंदूर असे नाव दिले होते. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर संपूर्ण जगाचे लक्ष भारत काय भूमिका घेणार? कशा पद्धतीने भारत सरकार तसेच भारतीय लष्कर याचा बदला घेतील? ही उत्कंठा लागली असताना; कोणाच्याही ध्यानीमनी नसलेला मोठा नऊ ठिकाणी स्ट्राइक भारतीय लष्कराने घडवून आणलेला आहे. अवघ्या २३ मिनिटांत या स्ट्राइकने पाकिस्तानामधील आतंकवादी अड्डे बेचिराख केले, त्यात शंभर पेक्षा अधिक आतंकवादी मारले गेले यामुळें पाकिस्तान लष्कर देखील भयभीत झालेले आहे . पहलगाम येथे जे नागरिक पर्यटनासाठी गेले होते, त्या नागरिकांमधील महिला सोडून पुरुषांना धर्माच्या आधारावर ठार मारण्यात आले, त्याचाच बदला ऑपरेशन सिंदूरने घेतलेला आहे. यामुळे आज मोहोळ तालुक्यातील सौंदणे येथे फटाके फोडत भारत माता की जय, वंदे मातरम्, भारतीय सैनिकांचा विजय असो, अशी घोषणाबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी भाजपा चे माजी जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शंकरराव वाघमारे, सागर वाघमारे जिल्हा उपाध्यक्ष युवा मोर्चा भाजपा सोलापूर, सौंदणे ग्रामपंचायत सदस्य रमेश भानवसे, श्रीनाथ वाघमारे, आनंद भानवसे, अमोल नामदे, तुकाराम भानवसे, अविनाश मोकाशी, मारूती भानवसे, गोरख भानवसे, विठ्ठल वाघमारे, संजय भानवसे, सुभाष भानवसे, तानाजी गोडसे, ज्ञानेश्वर भानवसे, ज्ञानेश्वर राऊत, दिगंबर बनसोडे, धनंजय भानवसे, संतोष नामदे, सयाजी राउत, सचिन भानवसे, बंडू भानवसे, विष्णू भानवसे, नागनाथ भानवसे, सौरभ भानवसे उपस्थित होते.

### पशुसंवर्धन विभागांतर्गत विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज करावेत

**सोलापूर दि. ८ मे-**
नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गाई- म्हशींचे गट वाटप करणे, शेळी-मेंढी गट वाटप करणे, १००० मांसल कुक्कुट पक्षांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप व २५+३ तलंगा गट वाटप या योजनांसाठी ऑनलाईन पध्दतीने लाभार्थी निवड प्रक्रिया सन २०२५-२६ या वर्षात राबविली जाणार आहे. पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबींमध्ये अर्ज करावयाचा आहे त्याची निवड करण्याची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील पशुपालक/शेतकरी बांधव, सुशिक्षीत बेरोजगार युवक-युवती व महिलांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन. एल. नरळे यांनी केले आहे.

# गरीबांच्या घरांचं स्वप्न पूर्ण होणार

## पंतप्रधान आवास योजनेतील 3 अटी रद्द

## २ लाख १२ हजार मिळणार अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापुर, दि. ८ मे-**
पंतप्रधान आवास योजना ग्रामीण अंतर्गत सध्या देशभरात घरकुलासाठी पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याचे काम प्रगतीपथावर आहे .

या योजनेच्या अंतर्गत २०११ मधील सामाजिक- आर्थिक आणि जातनिहाय जनगणनेतील निकषांवर पात्रता ठरवली जात होती. यामध्ये मासिक उत्पन्नाची मर्यादा दहा हजार रुपये होती आणि अनेक सामाजिक, आर्थिक निकषांची पूर्तता आवश्यक होती. या निकषांवर पात्र ठरल्यास लाभार्थ्याला साधारणतः दोन लाख बारा हजार रुपये, तर डोंगरी भागात राहणाऱ्यांना एक लाख ३० हजार रुपये मिळत होते. आता सरकारने या अटी अधिक लवचिक केल्या असून, पात्रतेसाठी काही अटी रद्द करण्यात आल्या आहेत आणि मासिक उत्पन्नाची मर्यादा पंधरा हजार रुपये करण्यात आली आहे. उदाहरणार्थ, पूर्वी स्कूटर, दुचाकी किंवा मासेमारीची होडी असणाऱ्यांना अपात्र ठरवले जात होते, परंतु आता हे निकष रद्द करण्यात आले आहेत. पंतप्रधान आवास योजना ग्रामीण अंतर्गत सध्या देशभरात घरकुलासाठी पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सरकारने ही योजना अधिक लोकांपर्यंत पोहोचावी, विशेषतः गरजू आणि गरीब कुटुंबांना लाभ मिळावा यासाठी पात्रतेच्या अटींमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत



योजनेच्या सुरुवातीच्या टप्प्यात लाभ घेण्यासाठी १३ निकष आवश्यक होते, मात्र आता ही संख्या कमी करून दहा करण्यात आली आहे. यामुळे अनेकजण जे पूर्वी अपात्र होते, आता ते या योजनेसाठी अर्ज करू शकतात. त्याचबरोबर, मासिक उत्पन्नाची मर्यादाही वाढवण्यात आली आहे. याशिवाय, ज्या नागरिकांना पूर्वी वेळेअभावी किंवा माहितीअभावी सर्वेक्षणात सहभागी होता आले नाही, त्यांच्यासाठी सरकारने सर्वेक्षणाची अंतिम तारीख वाढवून १५ मे केली आहे. त्यामुळे आता अधिक पात्र लाभार्थ्यांना या घरकुल योजनेचा लाभ घेण्याची संधी मिळणार आहे. पूर्वी या योजनेसाठी लाभ घेण्यासाठी १३ अटी पूर्ण करणे आवश्यक होते. मात्र आता तीन अटी रद्द करण्यात आल्या आहेत.

**कोणते निकष आता रद्द करण्यात आले ?**

- मासेमारीसाठी होडी असणे किंवा दुचाकी वाहन असणे
- वीज कनेक्शनची अनुपस्थिती
- घरात गॅस चूल नसणे

**नव्या निकषांमुळे काय बदल झाले ?**

- उत्पन्नाची मर्यादा दरमहा १५ हजार रुपये केली आहे
- वाहन किंवा नाव असणे आता अपात्र ठरण्याचे कारण नाही
- अधिक गरजू लोक योजनेत समाविष्ट होणार
- सामाजिक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अधिक संधी



### जुळे सोलापूर येथील एचएसआर पाण्याच्या टाकीची साफसफाई सुरु

**सोलापूर, दि. ८ मे-**
महापालिका आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे जुळे सोलापूर येथील एचएसआर पाण्याची टाकी साफसफाईचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाची पाहणी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली. काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, सतीश एकबोटे, सिद्धेश्वर उस्तरगी, श्रीशैल बाबानगरे, मक्तेदार श्रीकांत सोनी उपस्थित होते. सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्र येथे पाण्यावर रासायनिक प्रक्रिया करून शुद्ध पाणी जुळे सोलापूर एचएसआर येथील जमिनीवरील टाकीत साठवण केली जाते. या टाकीची क्षमता ही २७.५ एमएलडी इतकी आहे. या टाकीची वेळोवेळी महापालिकेकडून साफसफाई केली जाते. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे या टाकीच्या साफसफाईचे काम हाती घेण्यात आले असून आज महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी जुळे सोलापूर एचएसआर टाकी येथे सुरु असलेल्या साफसफाई कामाची पाहणी केली. तसेच काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.



### सोलापुरात राष्ट्रप्रेमींनी केला जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मे-**
पहेलगाम येथे भ्याड अतिरेकी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत भारतीय हवाई दलाने यशस्वी एअर स्ट्राईक करून, पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतल्याचा जल्लोष देशप्रेमी अभिषेक सोनावणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सात रस्ता येथे पेढे वाटून साजरा केला.

भारतमाता कि जय वंदेमातरम् या घोषणांनी सातरस्त्याचा परिसर दुमदुमून गेला.

यावेळी हिंदू धर्मरक्षक शिवराज गायकवाड, देशप्रेमी अभिषेक सोनावणे,राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे कार्याध्यक्ष संजीव मोरे, पैलवान ज्योतिसिंग मन्सावाले याकोब नवगिरे,मधुकरबनसोडे, सुरेश फरड, सुनील काडे,भीमराज गोन्याल, प्रकाश कुनशीकर, इम्मॅन्युएल सातालोलू, संदेश जमादार आदी उपस्थित होते.

# सोलापुरात शनिवारी राष्ट्रीय लोक अदालत

## महापालिकेने केली सुमारे १ हजार मिळकतदारांची प्रकरणे दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्यामार्फत शनिवार दि. १० मे २०२५ रोजी सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय येथे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून सुमारे १ हजार मिळकतदारांची प्रकरणे तडजोडीसाठी दाखल करण्यात आली आहेत, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्यामार्फत दि. १० मे २०२५ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर येथे राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोक अदालतीमध्ये महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून सुमारे १ हजार मिळकतदारांची प्रकरणे तडजोडीसाठी दाखल करण्यात आली आहेत. दाखल प्रकरणनिहाय जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे सचिव यांच्या मार्फत संबंधित मिळकतदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.लोक अदालतमध्ये मिळकतदारांच्या थकबाकीतील नोटीस फि, वॉरंट फि व शास्तीची जी रक्कम आहे, त्यामधील ५० टक्के रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ८ कराधान, नियम ५१ मधील तरतुदीनुसार सुट देण्यात येणार आहे. जास्तीत जास्त मिळकतदारांनी या सवलतीचा लाभ आयोजित लोक अदालतच्या माध्यमातून घ्यावा, असे आवाहन सोलापूर महापालिकेकडून करण्यात आले आहे. ज्या मिळकतदारांना नोटीसा प्राप्त झाल्या नाहीत असे मिळकतदार तसेच यापुर्वी मागील लोक अदालतमध्ये ज्यांना नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत मात्र त्यांना त्यावेळी थकबाकी भरता आलेली नाही अशा सर्व मिळकतदारांना तसेच ज्यांना नोटीसा प्राप्त नाहीत परंतू थकबाकी भरावयाची आहे अशा सर्व मिळकतदारांनीही यावेळी १० मे रोजी मिळकत कर विभागाकडील संबंधित कर निरिक्षक यांना संपर्क साधून ५० टक्के शास्ती माफीचा लाभ घेऊ शकतात. चालू आर्थिक वर्षाच्या मालमत्ता करास ६ टक्के सुटीसह थकबाकीवरील शास्तीमध्ये देण्यात येत असलेल्या ५० टक्के सुटीचा लाभ घ्यावा

**शनिवारी मिळकत कर भरणा केंद्र सुरू राहणार**

शनिवार दि.१० मे रोजी सुट्टी दिवशीही हुतात्मा स्मृती मंदिर येथील मिळकत कर भरणा केंद्र चालू राहणार आहे. याची सर्व मिळकतदारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

### पथदर्शी कृषी पर्यटन केंद्र उभारणीसाठी आज तालुका पातळीवर चर्चासत्र

**सोलापूर दि.८ मे-** जिल्ह्यतील स्थानिक संस्थांच्या, विशेषत- शेतकरी उत्पादक कंपन्या, बचत गट, उत्पादक गट इत्यादींच्या सहकार्याने पाच पथदर्शी कृषी पर्यटन केंद्रे उभारण्याचे प्रस्तावित आहे. या उपक्रमासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू आहे.यासाठी चर्चासत्र ९ मे २०२५ रोजी गुरूवारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी येथे सकाळी १०.३० वाजता, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अक्कलकोट येथे दुपारी ३.३० वाजता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या चर्चासत्रात इच्छुकांनी उपस्थित राहावे.


**जाहीर प्रसिध्दीकरण**
सिव्हील किरकोळ अर्ज क्र.९३२/२०२५
नि.५

**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधिश सो, यांचे कोर्टात (DT-2)**

१) **श्रीमती गितांजली गणेश बुच्चम**
वय: ३५ वर्षे, धंदा घरकाम,
२) **कु. रिदम गणेश बुच्चम**
वय : ०६ वर्षे, धंदा शिक्षण,
दोघे रा. इंदिरा नगर, उत्कर्ष नगर, विजापूर रोड, सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र शासन** --- **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी सोलापूर येथील जिल्हा न्यायालयात अर्जदार नं. १ व २ याच्या नावावर असलेल्या जिल्हा व जिल्हा परिषद सोलापूर सब जिल्हा परिषद अक्कलकोट पैकी कसबे मौजे अक्कलकोट ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील जिरायत शेतजमीन मिळकत गट नं.९६ यांसी एकूण क्षेत्र ३.५३ आर, यांसी आकार ५ रु. ७१ पैसे, सामाईक क्षेत्रात असून, अर्जदार नं.१ व २ यांच्या येणारे हिश्याची शेतजमीन क्षेत्र ० हे. २१ आर यापैकी ०० हे. ०१ आर इतकी शेतजमीन यांसी चतुःसिमा : पुर्वेस : अक्कलकोट किणी जुना रस्ता, पश्चिमेस : गट नं. ९६ पैकी, दक्षिणेस : गट नं. ९७, उत्तरेस : गट नं. ९६ पैकी ० हे. २० आर शिल्लक जमीन. या जमीनी अज्ञान मुलांच्या कायदेशीर गरजा भागविण्याकरीता व भविष्याकरीता विक्री करण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना विक्री करण्यास परवानगी देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली दि. १७/०६/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी. आज दि.०९/०५/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**हुकुमावरून**
**जिल्हा अधिक्षक**
**सोलापूर**



**जाहीर प्रसिध्दीकरण**
दि. कि. अर्ज नं.१४/२०२५
नि.७

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे कोर्टात**

**चन्नम्मा शांतप्पा बिराजदार वगैरे** --- **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** --- **सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं.१४/२०२५ हा दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसा दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केला असून अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ५ यांचे वडील शांतप्पा सिध्दमलप्पा बिराजदार हे मौजे उडगी येथे मयत झाले आहेत. अर्जदार हेच कै. शांतप्पा सिध्दमलप्पा बिराजदार यांचे कायदेशीर वारस असल्याने तसा वारसा दाखला मिळणेकामी अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे कै. शांतप्पा सिध्दमलप्पा बिराजदार यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक २६/६/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल. हे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता.०८/५/२०२५

आज रोजी मे कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले.

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी फौजदारी न्यायालय**
**अक्कलकोट**



**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील लोकांस व वित्त संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या घरजागेचे मालक राजेंद्र हणमंतप्पा बाके, रा. अक्कलकोट यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीपैकी दक्षिण दिशेची त्यांच्या हिश्यास वाटपाने आलेली घरजागा ही आमचे अशील विनोदिनी श्रीकांत वळसंगे रा. अक्कलकोट यांना खरेदी देण्याचे ठरविले आहे. सदर घर जागा ही आमचे अशिलांनी कायम खुष खरेदी घेण्याचे ठरविले असून त्यापोटी काही इसारा रक्कम देखील दिलेली आहे. सदर घरजागेचे वर नमूद मालकांनी सदरील घरजागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची ग्वाही आमचे अशिलांना दिलेली आहे.

तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या घरजागेबाबत कोणाचाही कसलाही हक्क, अथवा हितसंबंध उदा. खरेदी, साठेखत, गहाणखत, दान, बक्षीस, पोटगी अंगवस्त्र, दावा, अपील अथवा अन्य कोणताही हक्क अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमचे अशिलांची खात्री करावी. वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदरची घरजागा ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून व ज्यांचा कोणाचा हक्क आहे, त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची सक्तरित्या नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ता.०८/०५/२०२५ परिशिष्ठ : जि. सोलापूर, पैकी ता. अक्कलकोट, मौजे अक्कलकोट येथील सि. स. नं. १८८८/ब यांसी एकूण क्षेत्र १४९.६० चौ.मी. पैकी दक्षिणेकडील क्षेत्र ५८.५० चौ.मी. यांसी चतुःसिमा : पूर्वेस : रस्ता, पश्चिमेस : बागेवाडीकर यांची घरजागा, दक्षिणेस : रस्ता, उत्तरेस : सि. स. नं. १८८८/अ.

**सही/-**
**ॲड. उडचाण एस. एम.**
**ॲडव्होकेटस्**
**ऑफीस : फत्तेसिंह चौक, अक्कलकोट**
**मो. नं.: ९८८१४८४७२०**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-टेंडर मागवत आहेत. **निविदा सूचना क्रमांकः** 10-2025-एसआरडीईएनसी. **कामाचे नाव :** एसआरडीईएन/सी/एसयूआर विभागांतर्गत विविध ठिकाणी 52 किलो आणि 60 किलो रेलसह एमएफडब्ल्यूपी द्वारे फ्लॅश पण वेल्डिंगची अंमलबजावणी. **कामाची अंदाजे किंमतः** रु. 3,17,82,878.77 **बकाया रक्कमः** रु.3,08,900.00 **काम पूर्ण करण्याचा कालावधी :** 12 महिने **देखभाल कालावधी :** शून्य. **www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ :** 02.06.2025 ते 15.00 पर्यंत. **www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ :** 02.06.2025 ते 15.30 दुपारी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुध्दीकरण लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाकारांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटवर वारंवार भेट देण्याचा सल्ला दिला जातो. वेबसाइट : **www.ireps.gov.in.**

**डीआरएम (वर्क्स), सोलापूर**

धोकादायक आणि विस्फोटक सामानासह यात्रा करणे दंडनीय अपराध आहे SLP-47



**महावितरण**
**ई-निविदा सूचना**

महावितरण, ग्रामीण विभाग, सोलापूर अंतर्गत वीज साहित्याची वाहतूक कामाकरिता, निविदा क्र. EE/SUR/R/T-01/2025-26 (रु. २० लाख), महावितरणच्या नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांकडून ई निविदा मागविण्यात येत आहे. निविदा विक्री दि. ०९.०५.२०२५ ते दि. १६.०५.२०२५ पर्यंत, निविदा सादर करण्याची अंतिम दि. १७.०५.२०२५ दु. ०२.०० वाजे पर्यंत. इतर सर्व माहिती https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेत स्थळावर दि.१७.०५.२०२५ पर्यंत उपलब्ध आहे. सदरील निविदा स्वीकारणे, नाकारणे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीधारकाने राखून ठेवलेले आहेत.

**PRO/BMTZ/ 017 /2025-26**
**कार्यकारी अभियंता, महावितरण, ग्रामीण विभाग, सोलापूर**



**ग्रामपंचायत कार्यालय, अंजनगाव (खे.)**
**ता. माढा, ज. सोलापूर**

ग्रा. पं. अंजनगांव (खे.) ता. माढा यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत. लेखाशिर्ष १५ वा वित्त आयोग

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | बयाणा रक्कम | फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | गावात पा.पु.साधनांची दुरुस्ती करणे | २,३९,८९९/- | २४००/- | २०० | २ महिने | सु.बे. |
| २. | मागासवर्गीय वस्तीत पा.पु. बोअर घेणे. | १,५२,८१०/- | १५२०/- | २०० | २ महिने | सु.बे. |
| ३. | भूमिगत गटार करणे | १,५२,४२४/- | १५२०/- | २०० | २ महिने | सु.बे. |
| ४. | तुकाई सभा मंडप सुशोभीकरण करणे | १,४९,८४७/- | १५००/- | २०० | २ महिने | सु.बे. |
| ५. | गावांतर्गत काँक्रिट रस्ता करणे | १,९३,७७८/- | १९३०/- | २०० | २ महिने | सु.बे. |
| ६. | गावांतर्गत काँक्रिट रस्ता करण | १,९९,८९९/- | २०००/- | २०० | २ महिने | सु.बे. |
| ७. | सार्व. शौचालय बांधणे | २,९९,४८०/- | ३०००/- | २०० | २ महिने | सु.बे. |

**टिप :** १. कोऱ्या निविदा मिळण्याचा कालावधी - ०९/०५/२०२५ रोजी स. १०.०० पासून
२. निविदा स्विकारणे दि.१५/०५/२०२५ पर्यंत स. १०.०० ते ५.०० ग्रा.पं. कार्यालय
३. निविदा उघडण्याचा दि.१६/०५/२०२५ रोजी सकाळी १२.०० वा.
४. निविदा अटी व शर्ती ग्रा. पं. कार्यालयात पाहावयास मिळतील.
५. निविदा मंजूर/नामंजूर/रद्द करण्याचा अधिकार सरपंच यांना राखून ठेवला आहे.

**सही/-**
**सरपंच**
**सौ. अरुणा प्रदीप चौगुले**
**ग्रामपंचायत अंजनगाव, (खे.) ता. माढा**

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत अंजनगाव, (खे.)**
**ता. माढा, जि. सोलापूर**






लेखक, दिग्दर्शक **संजय जमखंडी** नेपथ्य **संदेश बेंद्रे** संगीत **समीर म्हात्रे** प्रकाश **अमोघ फडके**
सहनिर्माती **शिल्पा तुळसकर** निर्माते **भरत नारायणदास ठक्कर, प्रविण भोसले**
सूत्रधार- **दीपक गोडबोले** संपर्क- 9323116345, 9820319448 विशेष आभार- **आशुतोष भालचंद्र घोरपडे**
**क्षितीश दाते, चिन्मय पटवर्धन, महेश सुभेदार, दिनेश सिंह, शिल्पा तुळसकर आणि ऋषिकेश जोशी**

**उद्या**
**शनि. १० मे**
**सायं.७ वा.**
**हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर**
**तिकीट विक्री सकाळ संध्याकाळ सुरु**
**ऑनलाईन बुकिंग**
bookmyshow
**संपर्क : गुरु वठारे**
**9011474400**



**SHRI MAHAVIR URBAN CO OP BANK LTD., SOLAPUR**
Head Office: 60/61, East Mangalwar Peth, Solapur 413002 PH: (0217) 2622933/44

**DEMAND NOTICE UNDER SECTION 13(2) OF SARFAESI ACT 2002**

Whereas you the below mentioned Borrower, Guarantor's and Mortgagors have availed loan from Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur, by mortgaging your immovable properties. Consequent to default committed by you all, your loan account has been classified as Non Performing Asset, whereas Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur being a secured creditor under the Act, and in exercise of the powers conferred under section 13 (2) of the said Act read with rule 2 of Security Interest (Enforcement) Rules 2002, issued Demand Notice calling upon the Borrowers/Guarantor's/Mortgagors as mentioned in column No.2 to repay the amount mentioned in the notices with future interest thereon within 60 days from the date of the notice, but the notice of Guarantor No.1 has been returned unserved for some reason thus this notice as below.

| Sr. No. | Name of Borrower/ Guarantor/ Mortgagor | Loan Account No. & Loan Amount | Details of the Security to be enforced | Date of NPA & Demand Notice date | Amount Due in Rs. as on 30/04/2025 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Borrower :** **Rakesh Ramling Kilche Prop : Rakesh Ramling Kilche** **R/o:** Plot No.87, Market Yard, Tuljapur Road, Barshi 413401. **R/o :** Wani Plot, Near Cancer Hospital, Barshi 413401. **Guarantor :** **1) Bafana Ashok Bhivarlal** **R/o :** 1551, Subhash Nagar, Barshi 413401. **2) Khade Bhimashankar Ranganath** **R/o :** 2541, StationRoad, Barshi 413401. | **Loan Account No.** 0060032020000007 **Loan Amount (Rs.)** 3,00,00,000/- (Rs. Three Crore only) | District and Sub district Solapur, Taluka Barshi, Non Agricultural Land At Jamgaon (Aa), bearing Gat No. 62 its Total area 05 H. 00 R, Assessment Rate 04 Ru. 75Paise, out of it Area 00 H. 77.5 R its Assessment Rate 00 Ru. 60 Paise having boundaries as follows : East : Land of Mukate out ofSaid Gat No., West: Land ofPoonam Mukate out ofSaid Gat No., North : Gat No.75 & 76, South : Barshi Latur Bypass Road | **Date of NPA :** 30/06/2022 **Demand Notice Date :** 02/05/2025 | **Rs. 4,72,72,255.80** (Rs. Four Crore Seventy Two Lakh Seventy Two Thousand TwoHundred Fifty Five and Eighty Paise Only) Plus future interest and other expenses thereon which is found due on 30/04/2025 |

Notice is therefore given to the Borrower/Guarantor & Mortgagor as mentioned in Column No.2, calling upon them to make payment of the aggregate amount as shown in column No.6, against the respective Borrower within 60 days of Publication of this notice as the said amount is found payable in relation to the respective loan account as on the date shown in Column No.6. It is made clear that if the aggregate amount together with future interest and other amounts which may become payable till the date of payment is not paid, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur shall be constrained to take appropriate action for enforcement of security interest upon properties as described in Column No.4. Please note that this publication is made without prejudice to such rights and remedies as are available to Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur against the Borrower/ Guarantor's/Mortgagors of the said financials under the law, you are further requested to note that as per section 13(13) of the said act, you are restrained/prohibited from disposing of or dealing with the above security or transferring by way of sale, lease or otherwise of the secured asset without prior consent of Secured Creditor.

**Date: 08/05/2025**
**Place: Solapur**

SEAL

**Sd/-**
**Authorised Officer**
**Shri. Mahavir Urban Co op Bank Ltd., Solapur**



## महत्त्वाचे

### शांभवी क्षीरसागरला नेमबाजीत सुवर्ण



**नवी दिल्ली :** पुण्याच्या शांभवी क्षीरसागर हिने सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत नेमबाजीतील १० मीटर एअर रायफलमध्ये महाराष्ट्राला सुवर्णपदक जिंकून दिले. गतस्पर्धेत रिकाम्या हाताने परतलेल्या शांभवीने यावेळी मात्र, सुवर्णवेध साधला. शांभवी क्षीरसागरने यावेळी अतिशय शांत चित्ताने खेळ केला. संपूर्ण स्पर्धेत परफेक्ट टेन लावणारी ती एकमेव नेमबाज ठरली. शांभवीने सर्वाधिक २५१.३ गुणांसह सुवर्णपदकावर मोहर उमटवली. पंजाबच्या लावण्या रावत हिनेही शांभवीला तुल्यबळ लढत दिली. मात्र, २४९.६ गुणांसह तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. कर्नाटकची हृदया कोंडूर २२८.८ गुणांसह कांस्यपदकाची मानकरी ठरली. शांभवी क्षीरसागर ही पुण्यातील खेळाडू असून, ती फर्ग्युसन महाविद्यालयात शिकते. गतवेळी चेन्नईतील खेलो इंडिया स्पर्धेत ती अपयशी ठरली होती. आधी कोल्हापूरमध्ये सराव करायची मात्र, आता वर्षभरापासून ती पुण्यात सराव करते. मागील दोन महिन्यांपासून शांभवीने दिल्लीत सराव केला. अखेर यंदाच्या खेलो इंडिया सुवर्ण पदकाच्या रूपाने तिला फळ मिळाले. दीक्षांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शांभवीने हे सोनेरी यश संपादन केले.

# प्ले-ऑफमध्ये स्थान निश्चित हेच बंगळुरूचे लक्ष्य

◆ **लखनौ, ८ मे**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी येथे लखनौ सुपर जायण्ट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. एकीकडे आरसीबी प्ले-ऑफ पात्रता निश्चित करण्याचा प्रयत्न करेल, तर संघर्षरत लखनौ सुपर जायण्ट्स स्पर्धेत जिवंत राहण्याचे लक्ष्य ठेवेल.

आयपीएल गुणतालिकेत सध्या आरसीबी १६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर लखनौचा संघ १० गुणांसह सातव्या स्थानावर आहे.

स्पर्धा जसजशी अंतिम टप्प्याकडे वळत आहे, तसतसा लखनौ संघाची घसरण होत आहे. लखनौने गत पाच सामन्यांपैकी चार सामने गमावले आहेत व उर्वरित तीन सामने जिंकल्यासच त्यांना केवळ १६ गुण मिळू शकतात. प्ले-ऑफ शर्यतीत १८ गुण हा एक अधिक सुरक्षित आकडा आहे आणि आरसीबी गत सहा सामन्यांपैकी पाच जिंकल्यानंतर तेथे पोहोचण्यासाठी स्वतःला मागे टाकेल.



रजत पाटीदार ऋषभ पंत

आयपीएल लिलावात सर्वाधिक मानधन घेणारा खेळाडू ठरलेल्या ऋषभ पंतला आतापर्यंत विसरता येण्यासारखा हंगाम मिळाला आहे. त्याने वेगवेगळ्या स्थानांवर फलंदाजी करण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु सातत्य त्याला मिळाले नाही. त्याचा ९९.९२ चा स्ट्राईक रेट या हंगामात त्याच्या संघर्षांची साक्ष देतो.

लखनौ आपल्या पहिल्या तीन फलंदाजांवर खूप अवलंबून आहे, यात मिशेल मार्श, एडन मार्कराम आणि निकोलस पूरन यासारख्या खेळाडूंचा समावेश आहे, परंतु स्पर्धेत मुसंडी मारायची असेल, तर त्यात बदल होणे आवश्यक आहे.

स्वप्न अजूनही जिवंत आहे. जर आम्हाला पुढील तीन सामने जिंकायचे असतील तर आपण ते काम निश्चितच फत्ते करू शकतो, मात्र त्याकरिता अव्वल फळीतील फलंदाजांना उत्तम कामगिरी करावी लागेल, असे पंत धर्मशाळेत पंजाब किंग्जकडून झालेल्या पराभवानंतर म्हणाला.

लखनौला गोलंदाजीतही सुधारणा करावी लागणार आहे. दुखापतग्रस्त वेगवान गोलंदाज मयंक यादव पुनरागमनानंतर महागडा ठरला आहे. संघाला क्षेत्ररक्षण व झेल घेण्यातही उत्तम कामगिरी करावी लागणार आहे.

दुसरीकडे, एका अविश्वसनीय जेतेपदाचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (आरसीबी) आयपीएलच्या इतिहासातील आपल्या सर्वात व्यावसायिक मोहिमांपैकी एकाचा आनंद घेतला आहे.

विराट कोहलीने ११ डावांमध्ये सात अर्धशतके झळकावून सातत्यपूर्ण धावा काढण्याची परंपरा कायम राखली आहे. अलीकडे रजत पाटीदार आणि रोमारियो शेफर्डसारखे खेळाडूंनी डेथ ओव्हर्समध्ये चांगली फलंदाजी केली आहे. जखमी देवदत्त पडिक्कलच्या जागी मयंक अग्रवाल संघात सहभागी झाला आहे.

कृणाल पांड्या व सुयश शर्मा ही फिरकी जोडी खूप प्रभावी ठरली आहे, तर जोश हेझलवूड व यश दयालने वेगवान गोलंदाजीमध्ये कठीण षटकांमध्ये सहज गोलंदाजी केली आहे. आरसीबीच्या या आघाडीला रोखण्यासाठी लखनौ सुपर जायण्ट्सला काहीतरी खास करावे लागेल. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**लखनौ सुपर जायण्ट्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**स्थळ** : भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी स्टेडियम, लखनौ
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# पाकिस्तानचे स्टेडियम उद्ध्वस्त, पीएसएल सामना रद्द

◆ **इस्लामाबाद, ८ मे**




जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला. यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील ९ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले.

यानंतर भारत व पाकिस्तानमधील संबंध तणावाच्या शिखरावर आहेत. पाकिस्तानने भारतातील १५ शहरांवर क्षेपणास्त्र हल्ले केले, परंतु भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हवेतच पाकिस्तानी क्षेपणास्त्र हल्ले निष्क्रिय केले. आता भारताने पाकिस्तानच्या रावळपिंडी स्टेडियमवर हल्ला करून ते स्टेडियम उद्ध्वस्त केले आहे.

भारताने रावळपिंडी स्टेडियमवर ड्रोनने हल्ला केला. पाकिस्तान सुपर लीग (पीएसएल) २०२५ सध्या पाकिस्तानमध्ये आयोजित केली जात असून तिथे ८ मे रोजी रावळपिंडीच्या मैदानावर पेशावर झल्मी आणि कराची किंग्ज यांच्यात सामना होणार होता. पण आता भारताने ड्रोन हल्ल्याद्वारे पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले आहे आणि स्टेडियम उडवून दिले आहे. या कारणास्तव, आज रात्री येथे होणारा सामना रद्द करण्यात आला आहे.

**आता सर्व सामने कराचीमध्ये होऊ शकतात**

पाकिस्तान क्रिकेट मंडळ आता रावळपिंडीमधील सामने कराचीमध्ये आयोजित करू शकते. याशिवाय, पाकिस्तान सुपर लीग २०२५ चे सामने परदेशी भूमीवर सुद्धा आयोजित केले जाऊ शकतात. ड्रोन हल्ल्यानंतर परिस्थिती पूर्णपणे बदलली असल्याने लीग सामने नियोजित वेळेनुसार होतील असे पीसीबीने यापूर्वी म्हटले होते. (वृत्तसंस्था)

## पंजाब, मुंबई सामना अहमदाबादला हलवण्याची शक्यता

◆ **नवी दिल्ली, ८ मे**

आगामी ११ मे रोजी पंजाब किंग्ज व मुंबई इंडियन्स यांच्यादरम्यानचा आयपीएल सामना धर्मशाळेहून अहमदाबादला हलवला जाण्याची शक्यता आहे. भारत-पाकिस्तान सीमेवरील तणाव वाढल्यामुळे शेवटच्या क्षणी हा बदल करण्यात आला आहे.

मुंबई व पंजाब किंग्जदरम्यानचा हा या वर्षातील शेवटचा सामना धर्मशाळेत होणार होता. पंजाब किंग्जचे हे दुसरे गृहस्थळ आहे. गत रविवारी, धर्मशाळेत झालेल्या हंगामातील त्यांच्या पहिल्या सामन्यात त्यांनी लखनौ सुपर जायण्ट्सला आरामात हरवले आणि आज सायंकाळी ते दिल्ली कॅपिटल्ससोबत एका महत्त्वाच्या सामन्यात खेळणार आहेत.

मुंबई इंडियन्स संघ सुरुवातीला गुरुवारी धर्मशाळेत येणार होते, परंतु आयपीएलने सामना हलवण्याबाबत चर्चा करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांची प्रवास योजना रखडली.

गुजरात क्रिकेट संघटनेने पंजाब-मुंबई सामना आयोजित करण्याची आयपीएलची विनंती स्वीकारली आहे. गुजरात संघटनेचे सचिव अनिल पटेल म्हणाले की ते आयपीएलकडून अंतिम मंजुरीची वाट पाहत आहेत, परंतु मुंबई बुधवारी सायंकाळी अहमदाबादमध्ये उतरणार असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. (वृत्तसंस्था)

## रहाणेला अजूनही केकेआरच्या प्लेऑफ पात्रतेची आशा

**कोलकाता, ८ मे**

चेन्नई सुपर किंग्जकडून झालेल्या पराभवानंतर कोलकाता नाईट रायडर्स इंडियन प्रीमियर लीगमधून बाहेर पडण्याच्या उंबरठ्यावर आहे, परंतु कर्णधार अजिंक्य रहाणेला अजूनही प्लेऑफ पात्रतेची आशा आहे.

केवळ दोन सामने शिल्लक असताना केकेआरला जास्तीत जास्त १५ गुण मिळू शकतात तर प्लेऑफ पात्रतेसाठी सुरक्षित संख्या १८ आहे. मला वाटते १५ गुणांसह, आपण अजूनही पात्र होऊ शकतो. आपल्याला अजूनही सकारात्मक विचार करावा लागेल. एक हैदराबादविरुद्ध व नंतर बंगळुरूविरुद्ध असे आपले दोन सामने शिल्लक आहेत. आपण पुढील दोन सामने कसे जिंकू शकतो याचा विचार करावा लागेल. आम्ही खूप चांगले क्रिकेट खेळत आहोत, रहाणे म्हणाला. गत तीन सामन्यात आम्ही उत्तम खेळलो, परंतु योजनेनुसार खेळ झाला नाही. आता पुन्हा एकदा एक संघ म्हणून खेळणार आहोत, असेही तो म्हणाला. नेट रन रेटचा तिरंगी सामना रंगणार केकेआरच्या पात्रता फेरीच्या आशा मुंबई इंडियन्सने उर्वरित दोन्ही सामने गमावून १४ गुणांवर राहावे यावर अवलंबून असतील.

मुंबई इंडियन्सचा एक सामना दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध (सध्या १३ गुणांवर) असल्याने, त्या निकालामुळे दिल्ली कॅपिटल्स १५ पर्यंत वाढेल, ज्यामुळे केकेआर व दिल्ली कॅपिटल्स यांच्यात अंतिम प्लेऑफ स्थानासाठी संभाव्य नेट रन रेट लढाई सुरू होईल. पर्यायी परिस्थितीत पंजाब किंग्ज आपले उर्वरित तिन्ही सामने गमावू शकतो. अशा परिस्थितीत मुंबई इंडियन्स १५ गुणांच्या पुढे जाऊ शकतो.

# सोलापूरचा हिंगोलीवर डावाने विजय

### राज्य निमंत्रित १६ वर्षांखालील क्रिकेट

### उद्या छत्रपती संभाजीनगरबरोबर लढत

### दर्शील फाळकेचा अष्टपैलू खेळ तर सोहम कुलकर्णीचे ६ बळी

**सोलापूर, दि. ८ मे-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या १६ वर्षांखालील निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत दर्शील फाळकेचा (९ बळी व ५५ धावा) अष्टपैलू खेळ आणि सोहम कुलकर्णीच्या ६ बळीच्या जोरावर सोलापूरने हिंगोलीवर एक डाव राखून ९७ धावांनी दणदणीत विजय मिळवित सात गुण वसूल केले. या सामन्यासह गुणतक्त्यात सोलापूर संघ १५



सोहम कुलकर्णी दर्शील फाळके

गुण प्राप्त करून प्रथम क्रमांकावर आहे. सोलापूरचा पुढील सामना १० व ११ मे रोजी छत्रपती संभाजीनगरबरोबर होईल.

छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेतील दोन दिवसाच्या सामन्यात पहिल्या दिवशी हिंगोली संघाच्या ८ बाद १०३ धावा असताना जोरात झालेल्या पावसाने दिवसभराचा खेळ होऊ शकला नाही. दुसऱ्या दिवशी हिंगोलीने सर्व बाद १०८ धावा केल्या. यात हिंगोलीकडून सोहम सगर याने ४६ धावा केल्या. सोलापूरकडून दर्शील फाळके याने २६ धावांत ६ बळी तर सोहम कुलकर्णी याने ३० धावात ३ बळी टिपले. श्रवण माळी याने २२ धावात १ गडी बाद केला. सोलापूरने पहिला डाव ३ बाद २९० धावांवर घोषित केला. यात सोलापूरकडून दर्शील फाळके याने ५५ व संदेश गाडे याने ५९, कर्णधार विरांश वर्मा ४० व अभिजीत सरवदे याने नाबाद २४ धावा केल्या. पहिल्या डावात सोलापूरने हिंगोलीवर १३९ धावांची आघाडी घेतली.

हिंगोलीचा दुसरा डाव सोलापूरने ८५ धावांत गुंडाळला. हिंगोलीकडून सोहम सगर याने ३८ धावा केल्या. सोलापूरकडून सोहम कुलकर्णी याने २३ धावात, दर्शील फाळके याने २८ धावांत तर सार्थक कन्ना याने ८ धावांत प्रत्येकी ३ बळी टिपले. श्रवण माळी याने २२ धावांत १ गडी बाद केला.

# मॉडेल अकादमी, सोलापूर स्पोर्टसचे शानदार विजय

### उदगीरी करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट

**सोलापूर, दि. ८ मे-**

उदगीरी करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत गुरूवारी मॉडेल क्रिकेट अकादमी व सोलापूर स्पोर्टसने शानदार विजय मिळविले मास्टर्स अकादमी आयोजित ही स्पर्धा दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अकादमीने साऊथ सोलापूला ३३ धावांनी हरविले. तडफदार अर्धशतक झळकाविणारा कार्तिक पाटोळे सामनावीर ठरला. त्यास राजू बंदपट्टे व आतीश शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

दुसऱ्या सामन्यात सोलापूर स्पोर्टस्ने श्री. साई समर्थ क्रीडा भारती क्रिकेट अकादमीवर ९ गडी राखून दणदणीत विजय मिळविला. अष्टपैलू कामगिरी करणारा गोंविदराज पुजाल सामनम्याचा मानकरी ठरला. त्यास गुरुराज खुणे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.



यावेळी चंद्रशेखर उदगिरी व राजेश येमुल यांची उपस्थिती होती.

**संक्षिप्त धावफलक**

**मॉडेल अकादमी** : ३० षटकात ७ बाद २०७ ( कार्तिक पाटोळे ६७, अभिषेक देशमुख ५१, रातिश जत ४-५१, विरेंद्र माने २-४१) वि.वि. **साऊथ सोलापूर** : २९.१ षटकात सर्व बाद १४७ (ध्रुव ६६, गौरव गाडेकर २-११, अर्जुन काळे २-३१)

**श्री. साई समर्थ क्रीडा भारती क्रिकेट अकादमी** : २६.४ षटकात सर्वबाद ११० ( हर्ष जगताप ३१, गोंविदराज पुंजाल ३-९) पराभूत विरुद्ध **सोलापूर स्पोर्टस्** : ११.३ षटकात १ बाद १११ (गोंविदराज पुंजाल नाबाद ४८, अप्पु स्वामी नाबाद ४५)



प्रशांत लोंढे चारूदत्त जगताप

## जिल्हा नेटबॉल संघटना अध्यक्षपदी प्राचार्य प्रशांत लोंढे, सचिव चारुदत्त जगताप

**सोलापूर, दि. ८ मे-**

शहर व जिल्हा ॲम्युचर नेटबॉल संघटनेच्या अध्यक्षपदी रॉजर्स स्कूलचे प्राचार्य प्रशांत लोंढे व सचिवपदी सांगोला विद्या मंदीरचे चारुदत्त जगताप यांची निवड झाली.संघटनेची वार्षिक सर्व साधारण सभा रॉजर्स स्कूलमध्ये झाली. त्यात २०२५ ते २०२८ करिता कार्यकारिणीची निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. अश्विनी जाधव यांनी पाहिले. **अन्य पदाधिकारी असे :** उपाध्यक्ष: प्रकाश भुतडा, खुद्दूस शेख, प्रा. सचिन गायकवाड. सहसचिव : जुबेर शेख, तलहा शेख, खजिनदार: अ. माजीदखान पठाण, सदस्य: विठ्ठल कुंभार, वसीम शेख, इक्बाल दलाल, अजित पाटील, स्वाती मॅगेरी, नदीम शेख, अब्दुल्ला चौधरी.

# शासनाच्या सोलापुरातील मोफत प्रशिक्षण शिबिराचा बोजवारा

### शिबीरे विविध जिल्हा संघटनेची, लेबल मात्र क्रीडा कार्यालयाचे

### एकही शासकीय प्रशिक्षक नाही, परंतु त्यांच्यावर नियंत्रण करणारा अधिकारी कार्यरत

### खो-खो व कबड्डीची शिबिरे सुरूच झाली नाहीत

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**

**सोलापूर, दि. ८ मे-**

जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या मोफत उन्हाळी प्रशिक्षण शिबिरास शहरातील विविध ठिकाणी पाच मे पासून सुरुवात झाली आहे. सध्या कार्यालयाकडे एकही शासकीय प्रशिक्षक नाही. परंतु त्याच्यावर नियंत्रण ठेवणारा मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी कार्यरत आहे. तो अधिकारी स्वतः ही प्रशिक्षण केंद्र चालविणार? का कोणावर नियंत्रण ठेवणार? हा प्रश्न अनुत्तरीत आहे.

विविध जिल्हा क्रीडा संघटनेच्या सहकार्याने २० मे पर्यंत विविध जिल्हा संघटनेच्या खेळाडूंचा सराव चालणाऱ्या ठिकाणीच ही शिबिरे सुरु झाली आहेत. विविध जिल्हा क्रीडा संघटनेचा अथवा त्या क्लबचा सराव. परंतु त्यावर लेबल मात्र, जिल्हा क्रीडा कार्यालयाचे, अशी स्थिती क्रीडा कार्यालयाची झाली आहे. एकूणच शासनाचा उपक्रम पार पाडायचा म्हणून ही शिबिरे सुरू झाली आहेत का? का केवळ खर्ची टाकण्यासाठी? असा प्रश्न क्रीडाप्रेमीत आहे. ज्या त्या जिल्हा संघटनेने अथवा क्लबने आपापल्या सोयीच्या ठिकाणी पाच मे पासून ही शिबिरे सकाळी ६.३० ते ८.३० व सायंकाळी ४.३० ते ६.३० या वेळेत सुरू केली आहेत. शासनाचे जे प्रशिक्षक ज्या जिल्ह्यात कार्यरत आहेत त्या खेळाची जिल्हा प्रशिक्षण केंद्रे असतात. त्या खेळांच्या शिबिराबरोबरच अन्य खेळांची १४ वर्षाखालील गटातील विद्यार्थ्यांची ही शिबिरे आयोजित करण्याच्या राज्य शासनाच्या क्रीडा खात्याच्या सूचना आहेत. यातून त्या प्रशिक्षण केंद्रास कायमस्वरूपी उदयोन्मुख खेळाडू मिळतात.



**हॉकीचे प्रशिक्षक वेतन सोलापूरचे घेतात, काम पुण्याचे करतात**

सोलापुरात गणेश पवार ॲथलेटिक्स व वैशाली सूळ हॉकी या दोन खेळाचे प्रशिक्षक कार्यरत होते. परंतु यातील पवार यांची पदोन्नतीवर तुळजापूर तालुका क्रीडा अधिकारी म्हणून तर सूळ या डेप्युटेशनवर पुणे येथे गेल्यामुळे जिल्हा क्रीडा कार्यालयात सद्यस्थितीत एकही शासकीय प्रशिक्षक नाही. सूळ या वेतन सोलापूरचे घेतात. परंतु काम मात्र पुण्याचे करतात. अशी स्थिती असेल तर सोलापुरातून खेळाडू कसे घडणार? त्यामुळे सोलापूरला शासकीय प्रशिक्षक मिळण्यासाठी विविध क्रीडा संघटकानी लोकप्रतिनिधीमार्फत प्रयत्न करणे गरजेचे आहे

**प्रत्यक्षात सुरू असलेल्या शिबिरांचे ठिकाण व प्रशिक्षक**

**मैदानी :** नेहरूनगर शासकीय मैदान (सूर्याजी लिंगडे) व शहर पोलीस मुख्यालय मैदान (दशरथ गुरव), **धनुर्विद्या :** जिल्हा क्रीडा संकुल (दीपक चिकणे), **व्हॉलिबॉल :** ह. दे. प्रशाला (अनिल गिराम). **हॉकी :** एम ए पानगल (जरार कुरेशी), **तलवारबाजी :** शिवाजी रात्र प्रशाला (पवन भोसले). **कुस्ती :** श्रीकृष्ण केंद्र (भरत मेकाले). **फुटबॉल :** वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय (किरण चौगुले).

**खेळाडू कोट्यातून नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष**

मोठ्या थाटात नेहरूनगर शासकीय मैदानावर उद्घाटन झालेल्या या क्रीडांगणावर ॲथलेटिक्स, खोखो व कबड्डीचे प्रशिक्षण शिबिर नेहरूनगर शासकीय मैदान सुरू आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार व मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड हे सांगतात. परंतु खोखो व कबड्डीचे शिबिरे प्रत्यक्षात सुरू नाहीत. खो खोसाठी जिल्हा क्रीडा कार्यालयातील तालुका क्रीडाधिकारी व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या सुप्रिया गाढवे व नुकतीच सरळ सेवेतून नियुक्ती केलेली राष्ट्रीय खेळाडू मयुरी पवार यांचे मार्गदर्शन सुरू असल्याचा त्यांचा दावा आहे. परंतु या दोघीही मैदानावर येत नाहीत. रोज मैदानावर शिबिरासाठी खेळाडू येतात आणि चौकशी करून जातात. त्यांना सांगायला पण कोणी नाही.

## महत्वाचे...



### लाँड्रीचालक संतोष चन्ने यांचा प्रामाणिकपणा; गिऱ्हाईकाचे ५० हजार रुपये केले परत

**सांगोला, दि.८ मे-**

गिऱ्हाईकाने धुण्यासाठी दिलेल्या कपड्यात चुकून आलेले ५० हजार रुपये सांगोला येथील लाँड्रीचालक संतोष चन्ने यांनी प्रामाणिकपणा दाखवत परत केले. या प्रामाणिकपणाबद्दल चन्ने यांचा संबंधित गिर्हाईकाने सत्कार करून आभार व्यक्त केले. याबाबत अधिक माहिती अशी, वाकी घेरडी, ता.सांगोला येथील रहिवासी असलेले संतोष चन्ने यांची सांगोला शहरात कचेरी रोडवरील मदने मेडिकल जवळ श्रीनाथ लॉन्ड्री आहे. आपला व्यवसाय करून मंगळवारी रात्री घरी जाताना आलेगाव, ता.सांगोला येथील भारत दिवसे यांचे कपडे भट्टीसाठी घेऊन आपल्या गावी गेले होते. कपडे धुण्यासाठी घेतले असता त्यांना दिवसे यांच्या खिशात ५० हजार रुपयाची रक्कम त्यांना मिळून आली. बुधवारी चन्ने यांनी दिवसे यांना फोन करून ५० हजार रुपये आपल्या कपड्यात मिळाल्याचे सांगितले. सायंकाळी दिवसे यांनी ही रक्कम परत मिळाल्याबद्दल चन्ने यांचा फेटा, श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी उमेश वाळके, सुनील लवटे, सुरेश लवटे, डॉ.पुण्यवंत निमग्रे यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होता.

### १२ मे रोजी नवोदितांचे कवी संमेलन

**अकलूज दि.८ मे -**

मराठा सेवा संघाचे राज्य अधिवेशन अकलूज जिल्हा सोलापूर येथे १०,११ व १२ मे २०२५ या कालावधीत होत आहे. या संमेलनात १२ मे रोजी सकाळी साडेसहा वाजता नवोदिकांचे सूर्योदय कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. शंकरराव मोहिते स्मृति सभागृह शंकर नगर, अकलूज येथे हे कवी संमेलन होणार असून ज्या नवोदित कवींना या कवी संमेलनात सहभागी व्हायचे असेल त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९८ २२ ५७ ९५ ७५ या क्रमांकावर संपर्क साधावा.



### मोडनिंब येथे श्री वेताळ देवस्थान यात्रेच्या तयारीचा आढावा

**मोडनिंब, दि.८ मे-**

मोडनिंब (ता.माढा) येथील श्री वेताळ देवस्थान यात्रेच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक ग्रामपंचायत कार्यालयात गुरुवारी पार पडली. या बैठकीस टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार उपस्थित होते.बैठकीत यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची त्यांनी माहिती दिली. सार्वजनिक शांतता राखण्यासाठी ग्रामस्थांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही पोलीस निरीक्षक पवार यांनी यावेळी केले.या बैठकीत वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण, आरोग्य सुविधा, आदी महत्त्वाच्या बाबींवर सविस्तर चर्चा झाली. यात्रेच्या पूर्वतयारीबाबत आढावा घेण्यात आला.यावेळी माजी सरपंच कैलास तोडकरी, श्री वेताळ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष कुरण गिड्डे, नागनाथ ओहोळ, प्रकाश गिड्डे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील,सदाशिव पाटोळे, उपसरपंच अमित कोळी,उपाध्यक्ष संभाजी लादे, सचिव विजय खेलबुडे, मोडनिंब प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रथमेश पवार, हनुमंत कुंभार, चंद्रकांत गिड्डे, शिवाजी गोरे, राजेश निंबाळकर, एकनाथ सुर्वे,जयवंत ओहोळ, प्रकाश डोंगरे, हनुमंत पाटोळे, संतोष पाटील, दिपक सुर्वे, राहुल पाटील, किरण खडके, ऋषिकेश कोठावळे, पृथ्वीराज पाटील, प्रमोद गाडे,बालाजी वाघमारे, ऋषिकेश पाटील, आप्पा पाटील, अतुल गाडे, अमोल पवार, रत्नदीप गुरव यासह पोलिस हवालदार आतार, पोलिस हवालदार देवकर, पोलिस हवालदार वाघमोडे, पोलिस कॉन्स्टेबल इंगोले,गोपाळ शिंदे, बापू दगडे यांच्यासह ग्रामस्थ, नागरिक,पोलिस कर्मचारी आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### सुमन गरड



**मोहोळ, दि. ८ मे-**

येथील सुमन गणपत गरड (वय ८८) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### विलास गरड



**मोहोळ, दि. ८ मे-**

येथील एसटी महामंडळातील निवृत्त चालक विलास महादेव गरड (वय ७०) यांचे हृदय विकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

### साईनाथ गायकवाड



**सोलापूर, दि. ८ मे-**

लष्कर मातंग समाजाचे प्रमुख सल्लागार व क्रांतीवीर लहुजी वस्ताद तरुण मंडळाचे माजी अध्यक्ष साईनाथ (महाराज) बाबुराव गायकवाड (वय ६५) यांचे मंगळवार ६ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. काँग्रेसचे उपाध्यक्ष लखन गायकवाड यांचे ते मोठे बंधू होत.

# कॉरिडोरला विरोध करण्याचा पर्याय सर्व्हेक्षणात द्यावा

**अन्यथा नागरिक आपली माहिती सर्व्हेक्षणात देणार नाहीत**

**बुधवारच्या बैठकीतील निर्णय**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. ८ मे -**

संभाव्य कॉरिडोर बाधितांकडून दिलेल्या माहितीचा जिल्हा प्रशासन आणि शासनाकडून गैरवापर केला जात आहे. त्यामुळे सर्व्हेच्या प्रश्नांमध्ये कॉरिडोरला विरोध करण्याचा संभाव्य बाधित नागरिकांसाठी जोपर्यंत पर्याय उपलब्ध होत नाही तोपर्यंत शासनाकडून होणाऱ्या सर्व्हेला कोणीही कसलीही माहिती देणार नाही असे कॉरिडोर बाधित नागरिकांच्या बैठकीत सर्वानुमते ठरविण्यात आल्याची माहिती कॉरिडोर विरोधी तीर्थक्षेत्र बचाव कृती समितीचे प्रमुख अभयसिंह कुलकर्णी (इचगावकर) यांनी दिली.



**विरोधाचा पर्याय उपलब्ध करुन द्यावा**

जो पर्यंत सर्व्हेक्षणात विचारलेल्या प्रश्नात कॉरिडोरला विरोध करण्याचा पर्याय उपलब्ध होत नाही तो पर्यंत शासनाकडून होणाऱ्या सर्व्हेला कोणताही संभाव्य कॉरिडोर बाधित नागरिक आपली कसलीही माहिती देणार नाही असे येथील होळकर वाड्या मध्ये बुधवारी रात्री झालेल्या बैठकी मध्ये सर्वानुमते ठरविण्यात आल्याचे हिंदूमहासभेचे नेते तथा तीर्थक्षेत्र बचाव कृति समितीचे प्रमुख अभयसिंह कुलकर्णी (इचगावकर) सांगितले.

याबाबत माहिती देताना इंचगावकर यांनी सांगितले की, बुधवारी (ता.७) येथील होळकर वाड्यात एक बैठक पार पडली. या बैठकीस माजी खासदार सुब्रम्हण्यम स्वामींचे सहकारी आणि मुंबई उच्च न्यायालयातील विधिज्ञ मनोहर शेट्टी, हिंदूत्ववादी नेते तथा महंत रघुनाथ महाराज देवबाप्पा उर्फ फरशीवाले बाबा, विश्वहिंदू परिषदेचे नेते माधव महाराज राठी उपस्थित होते. दरम्यान मागील काही दिवसांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी ज्या कॉरिडोर बाधित नागरिकांशी संवाद साधला यामध्ये ९५ टक्के लोकांनी कॉरिडोरला विरोध दर्शविला असून सुध्दा ८० टक्के नागरिक कॉरिडोरबाबत सकारात्मक असल्याचा दावा स्वत: जिल्हाधिकाऱ्यांकडून केला जात आहे. कॉरिडोरबाधित नागरिकांकडून जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या माहितीचा जिल्हा प्रशासन आणि शासनाकडून गैरवापर केला जात आहे. कॉरिडोर बाधित नागरिकांच्या सर्व्हेक्षणाला गुरुवारी (ता.८) सुरुवात झाली असून या बैठकीत संभाव्य कॉरिडोर बाधित कोणत्याही नागरिकांकडून सर्व्हेक्षणात आपली कोणतीही माहिती देऊ नये असे सर्वानुमते ठरविण्यात आल्याचे देखील इंचगावकर यांनी सांगितले. याबरोबरच पंढरपूरातील कॉरिडोरमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून प्रसंगी राज्य शासनाशी न्यायालयीन लढाई लढण्यासाठी माजी खासदार सुब्रम्हण्यम स्वामी हे आता थेट मैदानात उतरले आहेत. स्वामींचे सहकारी अँड. मनोहर शेट्टी यांनी देखील या बैठकीत मार्गदर्शन केले असून मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखलवर चर्चा झाल्याचे श्री. इचगावकर यांनी सांगितले.



## स्पीकर लावून कॉरिडोर सर्व्हेक्षणाला नागरिकांचा विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपुर, दि. ८ मे -**

येथे कॉरिडॉर करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील विद्यार्थी होम टू होम जाऊन सर्वे करीत आहेत. मात्र या सर्वेला मंदिर परिसरातील नागरिकांनी विरोध दर्शविला असून स्पीकर लावून कॉरिडॉर गो बॅग अशा सूचना दिल्या जात आहेत.

पंढरपुरात येणाऱ्या नागरिकांना सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाने पंढरपुरात कोरिडोर करण्याचा निर्णय घेतला आहे. चौफाळा ते महाद्वार घाट पर्यंत पहिल्या टप्प्यात कॉरिडॉर करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी गेल्या आठवड्यात या परिसरातील ६०० नागरिकांच्या बैठका घेऊन त्यांना कॉरिडॉर बाबत माहिती देऊन नुकसान भरपाईसाठी सर्व्हेक्षण किती महत्त्वाचे आहे याची माहिती दिली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मंदिर परिसरात होम टू होम जाऊन सर्व्हेक्षण करण्यास सुरुवात केली आहे. मात्र याला काही नागरिकांनी विरोध दर्शविला असून स्पीकर लावून कॉरिडोर गो बॅक अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे पुन्हा कॉरिडॉर वादात सापडला असल्याचे दिसून येत आहे. आता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद कोणती भूमिका घेणार याकडे पंढरपूरवासियांचे लक्ष लागले आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूरात तीन बैठका घेतल्यानंतर कॉरिडॉरला सकारात्मक प्रतिसाद मिळाला होता. यानंतर पुन्हा मंदिर परिसरातील नागरिकांनी बैठका घेतल्या व या बैठकीत कॉरिडॉरला विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार नागरिकाकडून कॉरिडॉरला विरोध होत आहे.

## पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक योजनांचा लाभ घ्या

**डॉ. शिंदे यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.८ मे-**

पशुसंवर्धन विभागाअंतर्गत २०२५-२०२६ करिता विविध योजना सुरु करण्यात आल्या असून या वैयक्तिक योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रवीण शिंदे यांनी केले आहे.



पशुसंवर्धन विभाग अंतर्गत जिल्हा परिषद सेस सन २०२५-२०२६ या वर्षासाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय दुधाळ गाई, म्हशीचे वाटप, राज्यास्तरीय १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरु करणे, जिल्हास्तरीय योजना तलंगा. गट वाटप करणे, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय शेळी, मेंढी वाटप, जिल्हास्तरीय योजना एकदिवशीय सुधारित पक्षांच्या पिल्लाचे गट वाटप करणे ,या योजना सुरु आहेत. अर्ज करणाऱ्यांनी http;//ah.mahabms.com या संकेत स्थळावर अर्ज दाखल करावेत. आवशक कागदपत्रे : फोटो ओळखपत्र, अपंग प्रमाणपत्र (लागू असल्यास), दारिद्र्य रेषेचा दाखला (लागू असल्यास), ७/१२ व ८ अ उतारा, ग्रामपंचायत नमुना ८, जातीचा दाखला (लागू असल्यास), रेशन कार्ड, अपत्य दाखला, बचत गट प्रमाणपत्र (लागू असल्यास), रोजगार कार्ड (लागू असल्यास), प्रशिक्षण (गोपालन वा शेळी पालन) (लागू असल्यास) या कागदपत्रासह सदर योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने दि. ३ मे ते २ जून पर्यंत स्विकारण्यात येणार असून या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## विजेच्या प्रलंबित प्रश्नासंदर्भात कासेगाव ग्रामस्थांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**कासेगाव, दि.८ मे -**

आज कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील विजेच्या प्रलंबित प्रश्नांच्या संदर्भात महावितरणचे उपअभियंता दवंडे यांना सरपंच यशपाल वाडकर तसेच ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व शेतकरी यांनी निवेदन दिले.



एअर बंचचे अपूर्ण काम पूर्ण करणे, कासेगाव गंगेवाडी फिडरवर पाणीपुरवठा विहिरीसाठी स्वतंत्र लाईन टाकणे, शेत वस्तीवरील घरांसाठी सिंगल फेज लाईन देणे, जलजीवन योजनेतून मंजूर असलेल्या डी पी चे इस्टिमेट करून देणे, माननीय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी शिफारस केलेले नवीन डीपी मंजूर करणे आदी विविध विषयावर सविस्तर चर्चा केली. मा. दवंडे साहेब यांनी वरील विषय तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. यावेळी सरपंचे यशपाल वाडकर, ग्रामपंचायत सदस्य संभाजी चौगुले, लक्ष्मण वाडकर, जालिंदर गायकवाड, केदार ढेकळे, लक्ष्मण जाधव, भरत चौगुले, शाहू हेडे, गणेश काकडे, संतोष चौगुले, दाजी चौगुले, मधुकर हेडे, राजाराम चौगुले, राम माने, नितीन माने, सदाशिव खंडागळे, सुनील चौगुले, अंकुश काकडे, शंकर काकडे, ऋषिकेश जोशी, राम माने, महेश येणगुरे, रशीद तांबोळी, नेताजी माने, गडदे, राम हक्के, सोपान काकडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## पिलीव येथील फुटलेल्या निरा उजव्या कालव्याचे काम युद्धपातळीवर

**तभा वृतसेवा**
**पिलीव दि ८ मे -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील नीरा उजवा कालव्याला आठमोरींजवळ भगदाड पडून पाणी ओढ्यात वाहून गेले होते. त्यामुळे पंढरपूर, सांगोला तसेच माळशिरस चा काही भागाकडे शेतीसाठी जाणारे पाणी सध्या बंद आहे. त्यासंदर्भात जलसंपदा विभागाच्यावतीने तातडीने दखल घेऊन दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर सुरू केले आहे.




या संदर्भात खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देवून अधिकारी यांना तातडीने काम करण्यात यावे अशी सूचना केली. त्याचप्रमाणे आमदार उत्तमराव जानकर यांनी जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना फोनव्दारे सुचना केल्या आहेत. तर माजी आमदार राम सातपुते यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून काम तातडीने करण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे अशी सूचना केली. उपविभागीय अभियंता अनंता पासलकर, फलटण विभागाचे कार्यकारी अभियंता शिवाजी जाधव, वेळापूरचे शाखा अभियंता दिनेश राऊत हे काम करुन घेत आहेत. यावेळी कार्यकारी अभियंता शिवाजीराव जाधव यांनी सांगितले की, २४ तास काम चालू ठेवून येत्या १० दिवसात सदरचे दुरुस्तीचे मजबूतीकरणाचे काम पूर्ण होईल व त्यानंतर सांगोला व पंढरपूर विभागातील उर्वरित शेतकरी व पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तन सोडण्यात येणार आहे. सध्या एकूण चार धरणात पुरेसा पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे हा हंगाम पार पडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



## पाकिस्तानवरील हल्ल्याचा सांगोल्यात विजय उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.८ मे-**

भारतीय सैन्याने दि.७ मे रोजी पाकिस्तानमधील ९ दहशतवादी ठिकाणांवर केलेल्या यशस्वी कारवाईचा विजय उत्सव बुधवारी संध्याकाळी सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उत्सवाचे नेतृत्व माजी सैनिकांनी केले असून, नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

याप्रसंगी माजी सैनिक संघटनेच्या वतीने मिठाई वाटण्यात आली. तसेच फटाके व आतिषबाजी करण्यात आली. यावेळी देशभक्तिपर गीते, भारतमाता की जय, जय जवान, आणि वंदे मातरम् च्या घोषणांनी देशभक्तीचा झंकार उमटवला. दहशतवादाविरोधात भारतीय सैन्याने उचललेल्या ठोस पावलाचे सर्वत्र कौतुक होत आहे. भारतीयाच्या आत्मविश्वासाचा विजय आहे.

## कॉरिडॉरचे १२ पथकाद्वारे प्राथमिक सर्व्हेक्षण

**६30 जणांची घेणार माहिती**

**पथकास योग्य माहिती देण्याचे प्रशासनाचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ मे -**

पंढरपुरात येणाऱ्या भाविक व स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा देण्यासाठी पंढरपूर विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. यासाठी १२ पथकाव्दारे मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्यात येत आहे. संबधित मालमत्ताधारकांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या पथकास योग्य माहिती देवून सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.



पंढरपूर येथील विकास आराखड्याबाबत स्थानिक नागरिक, व्यापारी विक्रेते, महाराज मंडळी यांच्याशी प्राथमिक चर्चा करून समस्या जाणून घेण्यासाठी केबीपी कॉलेज, पंढरपूर येथे १ मे २ मे रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी चर्चा केली होती.त्याअनुषंगाने प्राथमिक सर्व्हे गुरुवार (दि.८ मे) पासून सुरु झाला आहे. सदर सर्व्हे १२ पथकाव्दारे करण्यात येत असून, या पथकात केबीपी कॉलजचे वरीष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी, पंढरपूर नगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी यांचा समावेश आहे. सदरचे सर्व्हेक्षण प्राथमिक असून, ६३० मालमत्ताधारकांचा सर्व्हे करण्यात येणार आहे. सर्व्हेक्षणामुळे बाधित नागरिकांचे सामाजिक, आर्थिक परिणामांची माहिती गोळा होणार असल्याने, विकास आराखड्याची व्याप्ती लक्षात घेवून संबधितांना विश्वासात घेवून द्यावयाची भरपाई व पुनर्वसन याबाबत प्रस्ताव तयार करण्यात येणार येईल. बाधितांची कमीत कमी जागा घेऊन जास्तीत जास्त लाभ कसा देता येईल याबाबतही प्रयत्न करण्यात येणार आहे.

**सर्व्हेमध्ये नागरिकांकडून ही माहिती घेतली जाणार**

पंढरपूर विकास आराखड्यातील बाधितांची सर्व्हे पथकाकडून संबधितमालमत्ता धारकांचे नांव, वय, जातीचा प्रवर्ग, व्यवसाय, जागेचे क्षेत्रफळ, नगर भूमापन क्रमांक, मिळकत पत्र, भाडेकरुचे नांव, कुळ,बाधित जागेचे मंदिरापासून अंदाजे अंतर, महत्वाच्या रस्तत्यापासून असलेले अंतर,बाधित जागेची दर्शनी बाजू, बांधकामाचे वर्णन व प्रकार, जागा कोणत्या कारणासाठी वापरात आहे. व्यवसायासाठी असाणाऱ्या जागेचा कधीपासून वापर करण्यात येत आहे. प्रमुख चार वाऱ्यांमध्ये व्यावसायिक वापरांतून होणारे अंदाजे उत्पन्न, संपादनामुळे बाधित होणारे उत्पन्न, पुनर्वसनाचा लाभ अपेक्षित आहे का? पुनर्वसनासाठी पसंतीचे ठिकाणे, मालमत्तेच्या अनुषंगाने मालक आणि भाडेकरु तसेच कूळ यांच्यामध्ये जागेबाबत वाद आहे का? मालमत्तेवर कर्ज गहाणखत बोजा, पुर्नवसन दरम्यान तात्पुरत्या घरांची गरज तसेच पुनर्वसन प्रक्रियेबाबत सुचना व अभिप्राय आदीबाबत माहिती सर्व्हेक्षण पथकाकडून गोळा करण्यात येणार आहे.



# श्री भगवंत प्रकटोत्सव दिन विशेष

सोलापूर तरुण भारत
पुरवणी संकलन : अरुण बळप, बार्शी.
शुक्रवार, ९ मे २०२५



# भक्तराज राजा अंबरीष महात्म्य



भक्तराज राजा अंबरीष यांच्या भक्तीला वश होऊन श्री भगवंतांना पृथ्वीवर प्रगट व्हावे लागले. अंबरीषाचे मूळराज्य साकेत प्रदेशात होते. अंबरीषाच्या राज्या शेजारी जे राज्य होते तेथे एक राजा राज्य करत होता. तो म्हणजे अंबरीषाचा पुतण्या. पण चुलता-पुतण्यात जमीन अस्मानाचा फरक होता. वैभव प्राप्त झाले आहे ते जनसेवेसाठी असे अंबरीषाला वाटत असे तर वैभवाचा लाभ घेण्यासाठी या वंशात आपला जन्म झाला असे वाटत असे. त्याच्या हातून जनतेवर जुलूम होत होता. त्यामुळे अंबरीष राजा व त्याचा पुतण्या यांच्यात युध्द होऊन पुतण्या ठार मारला गेला व त्यामुळे आपल्या हातून पाप घडले असे अंबरीषाला वाटू लागले. मन स्वास्थ्यासाठी तो तीर्थयात्रा करू लागला. त्यावेळी नारदांची भेट होऊन मन:शांतीसाठी अंबरीषाने एकादशीचे व्रत करावे असे सांगितले.

अविरतपणे व्रत केल्याने राजाचे पुण्य वाढू लागले. पुण्य वाढल्याने इंद्राला आपले इंद्रपद जाईल अशी भिती वाटू लागली. म्हणून इंद्राने दूर्वास ऋषीला अंबरीषाकडे पाठवले. कारण सेवेत काही चूक झाली तर दूर्वास शाप देणार हे नक्की.

एके दिवशी ऋषी आले. राजाने त्यांचे स्वागत केले. केलेल्या स्वागताने दूर्वास खूश झाले म्हणून राजाने त्यांना विनंती केली की, उपवास सोडण्यासाठी आपल्यासह भोजनाचा लाभ व्हावा. ऋषींनी ते मान्य केले व ते सरोवरावर स्नान करण्यासाठी गेले. स्नान करण्यात ऋषी देहभान विसरले. ऋषी येण्याची राजा वाट पहात होता. जसा जसा ऋषींना उशीर होत होता तसतसा राजा अस्वस्थ होत होता. इकडे आड तिकडे विहिर अशी राजाची अवस्था झाली होती. एकादशीचा उपवास सोडण्यासाठी भोजन करणे आवश्यक होते. भोजन न करावे तर व्रत भंग होते व व्रत भंग होऊ नये म्हणून भोजन करावे तर एका ब्राह्मणाला भोजनास बोलावून त्यांच्या शिवाय भोजन करावे तर ब्राह्मणाचा अपमान होत होता. काय करावे हे सुचत नव्हते. तेव्हा ब्राह्मणांनी असे सूचवले की, भगवंत चरणाचे तिर्थ घेऊन उपवास सोडावा. त्या प्रमाणे तिर्थ घेऊन पारणे केले व दूर्वासांची तो वाट पाहू लागला.

दूर्वास आल्यानंतर संकल्प सोडायचा व भोजनास प्रारंभ करायचा तेवढ्यात ऋषींना जाणवले की राजाचे भोजन झाले. मला भोजनाला आमंत्रित करून माझ्याकरता न थांबता राजाने भोजन केल्याने माझा राजाने अपमान केला. रागाच्या भरात दूर्वासांनी कृत्तीकर निर्माण केली. तिला राजाला ठार मारण्याची आज्ञा केली. कृत्तीका काही कृती करणार तेवढ्यात भगवंत प्रगट झाले व त्यांनी कृत्तीकाला ठार मारले. त्यानंतर ते सुदर्शन चक्र आपल्याकडे येत ओ असे जाणवताच जीवाच्या भितीने दूर्वास ब्रह्मदेव व शंकराकडे गेले व आपला जीव वाचवावा अशी प्रार्थना केली.

दोघांनीही दूर्वासांना श्रीहरिकडे जाण्यास सांगितले. श्रीहरिला प्रार्थना करताच भगवंतांनी सांगितले, मी भक्ताच्या भक्तीच्या अधिन आहे. तोच भक्त तुम्हाला वाचवू शकतो. शेवटी अंबरीषाने सुदर्शन चक्राला विनंती करुन दूर्वासांना जीवनदान दिले. असा भगवंत सर्वांवर कृपा करो ही भगवंताच्या चरणी प्रार्थना.

- हभप हरीभाऊ करंदीकर





# श्री रेणुकामाता मल्टिस्टेट

को-ऑप अर्बन क्रेडीट सोसा., लि. अहिल्यानगर

✻ मुख्य कार्यालय ✻

रेणुकाभवन, सर्व्हे नं. ३५/२, २ब, पुष्पक हॉटेल जवळ, एकविरा चौक, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर

✻ शुभेच्छुक ✻

डॉ. प्रशांत चंद्रकांत भालेराव

संस्थापक, चेअरमन

शाखा : मल्लाप्पा धनशेट्टी रोड, सह्याद्री खानावळ समोर, समर्थ कलेक्शनच्या वर, बार्शी

संपर्क शाखा व्यवस्थापक- ७४४७४१७३९२



श्री भगवंत प्रकटोत्सव दिनास व भक्तांस हार्दिक शुभेच्छा






स्वप्न कोणतेही असो, ते पूर्ण करण्यासाठी कोणाची तरी साथ हवी असते आणि ती मिळाल्याशिवाय स्वप्न पुर्ण होत नाहीत. अशीच आपणास आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही 'स्नेहश्री मल्टीस्टेट'ची साथ देण्यासाठी तत्पर आहोत. सभासदांना बचतीची सवय लावणे व त्यातून त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणे हेच आमचे मुख्य उदिष्ट आहे.

| ठेवींवरील आकर्षक व्याज | |
|---|---|
| ४६ दिवस ते ३ महिने | ०९% |
| ०४ महिने ते ६ महिने | १०% |
| ०७ महिने ते १२ महिने | १२% |
| १३ महिने ते २४ महिने | १२.५% |
| २५ महिने ते पुढील कालावधींसाठी | १२% |
| ज्येष्ठ नागरिक | १% जास्त |

# स्नेहश्री मल्टीस्टेट

को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पुणे

Reg. No. MSCS/CR/1241/2015

शाखा : बार्शी, मिरगणे कॉम्प्लेक्स, तेल गिरणी चौक, बार्शी, ता. बार्शी

जि. सोलापूर फोन :- ०२१८४-२२२२२५


## वैशाखी द्वादशी.... प्रगटले देव!

साधन द्वादशी,व्रत हे अद्भुत!
राजा आचरित, अंबरीश!
आली व्रतभंगा,दुर्वासाची स्वारी!
कृत्या राजावरी,सोडलीसे!
रक्षिण्यास भक्ता,येत जगजेठी
पुष्पावती तटी, बार्शी क्षेत्री!
दुर्वासाच्या मागे, लागे सुदर्शन!
शेवटी शरण,आले मुनी!
उत्रेश्वरापाशी, चक्र झाले शांत!
तिथे चक्रतीर्थ, प्रगटले!
अंबरीशासाठी, दहा अवतार!
घेई शारंगधर, आवडीने!
सत्ययुगातली, कथा ही प्राचीन!
क्षेत्र पुरातन, पुण्यभूमी!
शिव-शक्ती यांचे,साकार अद्वैत!
पाठीवरी येथ, लक्ष्मी माता!
भक्त-भगवंत, त्यांचेही अद्वैत!
देवासवे स्थित,अंबरीश!
शैव वैष्णवांचा, संगम अद्भुत!
शिरी शोभा देत, शिवलिंग!
परिसरामध्ये, बारा शिवस्थाने!
एकतेचे गाणे, झंकारते!
हिंदू-शीख ऐक्य,त्याचा येथ धागा!
परमानंद जोगा, समाधीस्थ!
एकादशी दिनी,जावे पंढरीसी!
द्वादशीस बार्शी, रिवाज हा!
वैशाखी द्वादशी,प्रगटले देव!
झाले बार्शी गाव,तीर्थक्षेत्र!

- मुकुंदराज पं. कुलकर्णी, बार्शी.

## उन्हाळा

रंग हिरवा गेलाय
माळ ओसाड झालाय
भुई करपली सारी
ऋतू उन्हाळा आलाय

वाढे सुर्याचाच पारा
अंगी घामाच्याच धारा
कुठे पसार झालाय
झाडा फांदीतून वारा

रवी ओकतोय आग
तव्यासम तापे भुई
पायी चटक्यांचे डाग
देहा धरणी ही देई

घसा पडतो कोरडा
जीव होई लाहीलाही
होता तनी पाणी कमी
देह गळाटून जाई

होता उन्हाचा कहर
शोधी सावली थंडावा
दिसे सावली ही गार
घेती सारेच विसावा

म्हणे यासी रे उन्हाळा
अंगी पोळती रे झळा
गेला सुकुनी रे मळा
पसरली अवकळा

- युवराज गोवर्धन जगताप
काटेगाव, ता. बार्शी


श्री भगवंत प्रकटोत्सव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !



॥ शुभेच्छुक ॥

श्री. नंदकुमार मुरलीधर बडवे

श्री. मनोज मुरलीधर बडवे

भगवंत देवस्थान बडवे समिती, बार्शी.

भगवंत देवस्थान दागिणे व्यवस्थापन समिती, बार्शी.


# माझं विद्यापीठ, बाप, आई व संस्काराची खाण

## या कवितांनी जागविलं आई-वडिलांचे नातं

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.८ मे -**

मानवी जीवन हे भूतलावरील मोठी देणगी आहे. या देणगीला सार्थ ठरविणारे आई-वडिलांचे पवित्र नाते आहे. मानवी भाव-भावनांना ते नातं पावन करते. आयुष्यभर पुरणारी जन्माची शिदोरी आई असते आणि ही शिदोरी टिकून ठेवण्यासाठी बापाची पाटी असते. प्राध्यापक डॉ. राहुल पालके यांनी आई-वडिलांची महती काव्यबद्ध करून त्यांच्याप्रती स्नेहभाव व्यक्त केलेला आहे.

माझं विद्यापीठ, बाप, आई व संस्काराची खाण या कवितांम धून त्यांच्या आई व वडील यांच्याप्रती भावना व्यक्त होतात. नऊ महिने आपल्या मुलाला सांभाळणारी आहे हे खरीच या पृथ्वीतरावरील नवलाई आहे. मुलांच्या जडणघडणीत बाप एखाद्या वटवृक्षासारखा सदैव उभा असतो. त्यामुळेच मुलांचा स्नेहभाव व्यक्त होत असतो. संस्काराची खाण या कवितेत ते म्हणतात,

ना हातात पेन ...ना हातात पेन्सिल ना कसली घाई ...ना हातात शाई ...माझे विद्यापीठ माझी आई ...आईच्या भावना व तिचा सहवास कशा पद्धतीने असतो या संदर्भात ते बोलतात, ती असते तेव्हा

रिमझिम पावसाची सर ...अलगद बरसत असते ...आईचा विश्व व्यापक असते.



आभाळाचं काळीज आणि ईश्वराचं देणं आई या शब्दात वसलेले असते अशा मार्मिक व हृदयस्पर्शी भावना ते व्यक्त करतात. आईप्रमाणेच वडिलांची भूमिकाही कुटुंबाला घडविण्यात खूप मोठी असते. खांद्यावर ओझं... हातात पिशवीचं गाठोडं ...विचाराचं हे इंधन ...न संपणारं धन असतं ... प्रा. पालके वडिलांना अनौपचारिक विद्यापीठ संबोधतात. बाप हे बोलकं पुस्तक आहे.

वास्तवाचं भान ठेवून ते संस्काराचं काम करत असतं.म इं विद्यापीठ या कवितेत ते म्हणतात, हळव्या संवेदनाना त्याचं शब्दबळ अपार लाभलेलं असतं ...आई-वडिलांच्या संस्कारातून जग जिंकण्याची भूमिका ते मांडतात व त्यांच्यातच सर्वव्याप्त आहे असा विश्वास ते स्पष्ट करतात.जेंव्हा गंगामातेचं तीर्थ तिच्या डोळ्यात दिसत असतं ...अन् काशीचं दर्शन ...म ायेच्या कुशीत घडत असतं... अशाप्रकारे आई-वडिलांचं पवित्र नातं काव्यरूपातून व्यक्त करत ते भारतीय संस्कृतीचे दर्शन वाचकांना घडवतात.



# शिव बसव मिरवणूक जल्लोषात, अघोरी नृत्याने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.८ मे -**

मित्रप्रेम युवा ग्रुपच्यावतीने म हात्मा बसवेश्वर महाराज व छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित शिव -बसव मिरवणूक बार्शी येथे जल्लोष पूर्ण वातावरणात पार पडली.

आ. दिलीप सोपल, खा ओमराजे निंबाळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन आडवा रस्ता येथून मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आला. यावेळी पोलीस उपाधीक्षक जालिंदर नालकुल, कीर्तनकार शिवलीला पाटील, माजी नगरध्यक्ष विश्वास बारबोले, योगेश सोपल, गणेश जाधव, सौ. मंगल शेळवणे, दगडू मांगडे, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब आडके, संदीप बारंगुळे, दत्ता शिंदे, राजाभाऊ रसाळ, पो. नि. बालाजी कुकडे आदी उपस्थित होते. राहिमतपूर येथील अघोरीं नृत्य पथक, शिवलीला पाटील वारकरी संस्थेचे मुलीचे टाळ पथक, वीर फकिरा लेझीम पथक, ढोल पथक, आकर्षक बाहुल्या पथक, डी जे पथक आदींचा मिरवणुकीत सहभाग होता. अघोरीं नृत्य पथकाच्या कलानी बार्शीकरांची मने जिंकली, पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी नागेश अक्कलकोटे यांच्या मार्गदर्शनाखाली शशिकांत दसंगे, विठ्ठल गुडे, अनिल चाबुकस्वार, जालिंदर देवकर, प्रफुल्ल केसकर, गणेश निंबार्गी, प्रवीण घोटाळे, आण्णा घोटाळे, प्रशांत दसंगे, कल्पित आगळे, विष्णू देवकर यांनी परिश्रम घेतले.


बार्शी येथील श्री भगवंत प्रकटोत्सव दिनास हार्दिक शुभेच्छा !



शुभेच्छुक : एक हितचिंतक


# जिजाऊ गुरुकुल खांडवीला राज्यस्तरीय आदर्श संस्थाचालक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.८ मे**

राजर्षी शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित श्रीपतपिंपरी संचलित जिजाऊ गुरुकुल सैनिकी पॅटर्न निवासी शाळा व कॉलेज खांडवी, ता. बार्शी या संस्थेस 'एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना' महाराष्ट्र राज्याचा आदर्श संस्था पुरस्कार प्राप्त झाला.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे यांना आदर्श संस्थाचालक या पुरस्काराने



सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सोहळा हुतात्मा स्मृती मंदिर,सोलापूर येथे एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष माननीय बापूसाहेब अडसूळ यांनी आयोजित केला होता. यावेळी सन्मान स्वीकारताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिव वर्षा घाडगे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री श्री. योगेश कदम, मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे महाराष्ट्र राज्य प्रमुख मंगेशजी चिवटे, जिल्हाचे शिवसेना प्रमुख मनिष काळजे , प्रा.डॉ. बापूसाहेब अडसूळ सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार प्रदान करतेवेळी सोलापूर शिवसेना अध्यक्ष मनीष काळजे, सुभाष माने त्याचबरोबर अमोल सुरवसे विचारपीठावर उपस्थित होते. हा गौरवशाली पुरस्कार केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे



# बार्शीत राष्ट्रसेविका समितीचा शिक्षा वर्ग संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ८ मे**

राष्ट्रसेविका समिती, पश्चिम महाराष्ट्र प्रांत, जिल्हा सोलापूर प्रारंभिक शिक्षा वर्ग दि. १ ते ५ मे या कालावधीत श्रीमती प्रयाग कराड विश्वशांती हायस्कूल एम आयटी, लोकमान्य मिल कंपाऊंड, बार्शी येथे संपन्न झाला.

या शिक्षा वर्गामध्ये एकूण ५६ शिक्षार्थींनी सहभाग घेतला. यामध्ये मुलींचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून योगासने, व्यायाम प्रकार, खेळ तसेच स्तोत्र, प्रार्थना, वेगवेगळ्या कार्यशाळा आणि बौद्धिक आयोजित करण्यात आले होते. वर्गाधिकारी म्हणून सुरेखा नाडगौडा यांनी कामकाज पाहिले. तसेच समारोपाच्या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ. सौ.निवेदिता कुलकर्णी, प्रमुख वक्त्या सोलापूर जिल्हा बौद्धिक प्रमुख सविता लळीत यांनी उद्बोधन केले. तसेच पुणे विभाग प्रमुख गायत्री सुमंत आणि जिल्हा कार्यवाहिका देवयानी देशमुख यावेळी उपस्थित होत्या.

# 'हीच तर फॅमिलीची गंमत आहे'

# भगवंत महोत्सवात या नाटकाने हास्याचा महापूर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ८ मे**

भगवंत महोत्सवाच्या चौथ्या दिवशी बार्शीच्या सांस्कृतिक क्षेत्रात हास्याचा एक अविस्मरणीय सोहळा अनुभवायला मिळाला. 'हीच तर फॅमिलीची गंमत आहे' या विनोदी नाटकाने प्रेक्षकांना खळखळून हसवले आणि रंगमंचावर हास्याची कारंजी उडवली. संपूर्ण भगवंत मैदान हास्याच्या लाटांनी भरुन गेले होते.

या नाटकाची गोष्ट शेजारी राहणाऱ्या दोन कुटुंबांच्या गोंधळाभोवती फिरते. पहिल्या कुटुंबातील तीन भावंडे अगदी वेगवेगळ्या अडचणींनी ग्रस्त असतात - एकाला ऐकू येत नाही, दुसऱ्याला दोन शब्दांपेक्षा जास्त बोलता येत नाही आणि तिसऱ्याला रात्री दिसत नाही. या विचित्र परिस्थितीत या भावंडांना सांभाळणाऱ्या 'दादा'ची भूमिका सागर कारंडे यांनी अतिशय प्रभावीपणे निभावली. त्यांच्या पत्नीच्या भूमिकेत शलाका पवार यांचा सहज सुंदर अभिनय विशेष भाव खाऊन गेला. या कुटुंबाचं जगणं बघणाऱ्याला त्रासदायक वाटण्याऐवजी, ते सतत हास्याच्या कारंज्यांमध्ये रंगून गेलं.दुसऱ्या





बाजूला, या कुटुंबाच्या शेजारी राहायला आलेल्या नारायण संतोष पवार यांचा विसरभोळा स्वभाव, त्यांची पत्नी लक्ष्मी आणि रात्रीच दिसणारी सुनयना यांच्यासोबतचा गोंधळ अधिकच मजेशीर ठरतो. या दिलखुलास कुटुंबांच्या एकमेकांशी होणाऱ्या गाठीभेटी, संवाद आणि गैरसमज नाटकात धमाल प्रसंगांची मालिका उभी केली. नाटकातील प्रत्येक प्रसंग, प्रत्येक संवाद प्रेक्षकांच्या हास्याची लाट निम र्णि करत होता. प्रेक्षक क्षणाक्षणाला हसत होते आणि अनेकांना अश्रू येईपर्यंत हसण्याचा अनुभव आला. विशेषतः नयन आणि सुनयनाचं लग्न ठरवण्यासाठी दोन्ही कुटुंबांमध्ये होणारे संवाद आणि विसंवाद हे नाटकाला अधिक रंगतदार बनवतात. यात सागर कारंडे यांनी 'दादा'ची व्यक्तिरेखा धमाल साकारली असून, त्यांची अभिनयशैली आणि टाइमिंग प्रेक्षकांना खळखळून हसवले. त्यांच्या पत्नीनेही आपल्या अभिनयाने कमालीचं हास्य निर्माण केलं आहे.'हीच तर फॅमिलीची गंमत आहे' हे नाटक केवळ मनोरंजना पुरते न राहता आपल्या समाजातील विविध व्यक्तींच्या स्वभाव वैशिष्ट्यांवर आरसा दाखवते. कौटुंबिक नातेसंबंध, समजूतदारपणा, एकम ेकांच्या त्रुटी स्वीकारण्याची तयारी आणि हास्याच्या माध्यमातून आनंदी जीवन जगण्याचा संदेश नाटकाने प्रभावीपणे दिला.संपूर्ण भगवंत महोत्सवात हास्याचा जो महापूर या नाटकाने आणला, तो नक्कीच लक्षात राहण्यासारखा ठरला. हे नाटक केवळ एक कलाकृती नव्हे, तर जीवनाकडे पाहण्याचा एक सकारात्मक दृष्टिकोनही आहे. प्रेक्षकांनी या नाटकाचे मनापासून कौतुक केले आणि अशा दर्जेदार नाट्यप्रयोगांची पुन्हा एकदा अपेक्षा व्यक्त केली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)



# श्री भगवंत प्रकटोत्सव दिन विशेष

सोलापूर तरुण भारत
पुरवणी संकलन : अरुण बळप, बार्शी.
शुक्रवार, ९ मे २०२५


## श्री भगवंत सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, बार्शी.

✲ उपलब्ध सुविधा ✲

### न्युरोसर्जरी विभाग

- अद्ययावत मोड्यूलर ऑपरेशन थिएटर (OT) with Laminar air flow
- Leica Microscope
- Neuro & Ortho Navigation System
- Stryker Endoscopy (Brain & Spine)
- Dedicated 25 Bedded Trama & stroke ICU
- Keyhole Brain & Spine Surgery
- NCV EEG

### ऑर्थोपेडीक विभाग


- Joint Replacement शस्त्रक्रिया (कृत्रिम सांधेरोपण शस्त्रक्रिया)
- Arthroscopy सांध्याच्या दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- गुडघ्यामधील व खांद्यामधील लिगामेंट दुर्बिणीच्या सहाय्याने बदलने व दुरुस्ती करणे (की-होल सर्जरी)
- कॉम्प्लेक्स ट्रॉमा व फ्रॅक्चर मॅनेजमेंट
- लहान मुलांचे हाडांचे व्यंगोपचार

### आयुर्वेद विभाग
(महिला व लहान मुलांसाठी)

- महिलांसाठी : मुळव्याध, भगंदर, मालबध्द स्थुलता, सौंदर्यविषयक तक्रारी, वातविक आहार मार्गदर्शन
- लहान मुलांसाठी : सुवर्णप्राशन संस्कार (0 ते 16) (प्रत्येक पुष्य नक्षत्रावर दु. 12 रोगप्रतिकारक शक्ती, स्मरणशक्ती, मेंदूचे विकार, सर्वांगीण विकास
- विशिष्ठ उपचार (पंचकर्म) : आयुर्वेदिक मसाज व स्टीम (स्नेहन - स्वेदन), वमन विरेचन, नस्य, शिरोधारा, शिरोबस्ती, कटीबस्ती, अग्निकर्म, विध्दकर्म, रक्तमोक्ष मन्याबस्ती, जानुबस्ती




आमचे अत्याधुनिक तंत्रज्ञान


Siemens magnetom sempra MRI


GE 32 slice CT Scan


Neuro & Ortho navigation system


Leica F40 Microscope

**डॉ. अमित पडवळ**
MS, Mch (Neurosurgery)
Brain and Spine Surgeon

**डॉ. सुमित पडवळ**
MBBS, D Ortho.,
Joint Replacement
& Arthroscopy surgeon

गट नं. 634, भगवंत कॉलनी, शिवशक्ती मैदानाच्या पाठीमागे, बार्शी, सोलापूर ✆ 70579 93 990, 77208 58586

## चाटे क्लासेस

इ. ५ वी ते इ. १० वी रेग्युलर बॅचेससाठी...

## मोफत व्हॅकेशन

✲ इ. ५ वी ते ८ वी बेसीक फाऊंडेशन कोर्स
✲ इ. ५ वी व ८ वी स्वतंत्र स्कॉलरशिप बॅच
✲ इ. ९ वी व १० वी स्पेशल व्हॅकेशन बॅच

इ. ५ वी ते १० वी
**व्हॅकेशन बॅच**
प्रवेश सुरु

AC क्लासरुम मध्ये प्रोजेक्टरव्दारे अध्यापनाची सोय
क्लासचा संपूर्ण परिसर CCTV च्या निगराणीखाली
विद्यार्थ्यांची परिपूर्ण तयारी करुन प्रगतीची हमी देणारा एकमेव क्लास



✲ आमची वैशिष्ट्ये ✲
✲ विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीचा पालकांना SMS
✲ प्रत्येक विषयाला तज्ञ व अनुभवी स्वतंत्र शिक्षक
✲ विविध स्पर्धापरीक्षांचे आयोजन व मार्गदर्शन
✲ प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष
✲ पालकांशी नियमित संपर्क व समन्वय
✲ इ. ५ वी पासूनच CET ची तयारी

मर्यादित विद्यार्थी संख्या असल्यामुळे आपला प्रवेश आजच निश्चित करा

Chate — The Symbol of Merit
म.गांधी शॉपिंग सेंटर, महाव्दार चौक, बार्शी.
Mo. 8421455800 / 7020060802

श्री भगवंत प्रकटोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

## ठेवी 86 कोटी

Reg. No. MSCS/CR/1188/2015
QRO — ISO 9001:2015
प्रमाणित जिल्ह्यातील पहिली मल्टीस्टेट
IFSC CODE : ICIC0000104

अल्पावधीतच विश्वासास पात्र ठरलेली संस्था...

पिग्मी ठेव ग्राहकांसाठी दैनंदिन शिल्लक रकमेची SMS सेवा देणारी एकमेव संस्था

नवीन शाखा मंजूरी :
मुंबई, पुणे, छ.संभाजीनगर, पंढरपूर, धाराशिव, तुळजापूर, विजापूर

One Stop Banking, Non-stop Service

| ठेवींवर आकर्षक व्याजदर | |
|---|---|
| १ ते ३ महिने | 7% |
| ३ महिने ते ६ महिने | 8% |
| ६ महिने ते १२ महिने | 9% |
| १३ महिने ते २ वर्ष | 10% |
| २ वर्षापुढे | 11% |
| ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिक इ. | 1% |
| आवर्तक ठेव (१ वर्ष) | 10% |
| सेव्हींग्ज ठेव | 4% |

दामदुप्पट ठेव ७२ महिने

Sachin Offset

## श्री भगवंत मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि., बार्शी.

मुख्य कार्यालय : निकीता हॉटेल शेजारी, कुर्डूवाडी रोड, पाटील प्लॉट, बार्शी.
Mob.08805375959, E-mail: sbmbarshi@gmail.com

मुख्य शाखा : बार्शी Mob. 9881926296 | पांगरी Mob. 8380805959 | वैराग Mob. 8805325959 | परांडा Mob. 9552065959

संचालक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. संतोष रावसाहेब ठोंबरे | चेअरमन | | |
| श्री. शहाजी हरिदास फुरडे-पाटील | व्हा.चेअरमन | प्रा. सतिश दिनकरराव देवकर | संचालक |
| श्री. प्रदीप सुभाष औसेकर | सचिव | श्री. आबासाहेब विष्णू लोंढे | संचालक |
| श्री. विलास कृष्णा निंबाळकर | संचालक | सौ. माधुरी संतोष ठोंबरे | संचालिका |
| सौ. सविता अविनाश सोलवट | संचालिका | श्री. मिलिंद सिद्राम कांबळे | मुख्य कार्यकारी अधिकारी |

उपलब्ध सुविधा
✲ मासिक व्याज प्राप्ती योजना
✲ एस.एम.एस. बँकिंग सुविधा
✲ सर्व प्रकारचे तारण कर्ज
✲ RTGS & NEFT सुविधा.
✲ QR CODE सुविधा.



४३ वर्षे सतत सभासद व ग्राहकांच्या विश्वासाला जपणारी पतसंस्था

## श्री भगवंत सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित, बार्शी.

२६३२, रुई ओळ, बार्शी, जि. सोलापूर

| ठेवीचे व्याज दर | |
|---|---|
| ✲ ४६ दिवस ते ९० दिवस | ४% |
| ✲ ९१ दिवस ते ३६४ दिवस | ६% |
| ✲ १ वर्ष ते २ वर्षाचे आत | ९% |
| ✲ २ वर्षे ते ५ वर्षे | ९.५% |
| ✲ (ज्येष्ठ नागरिक १ वर्षाचे पुढे अर्धा टक्का जादा) | |
| ✲ मासिक मुदत ठेव किमान ३ वर्षे | |
| ✲ बचत रोखा (दामदुप्पट) ८४ महिने | |

कर्जाचे दर
✲ सोनेतारण कर्ज १४%
✲ इतर कर्ज १५%
✲ ठेव तारण कर्जे तारण ठेव व्याजदरापेक्षा २% जादा

✲ वैशिष्ट्ये :-
✲ विविध प्रकारच्या कर्ज योजना.
✲ लॉकरची सोय.
✲ सोने तारण / वेअरहाऊस तारण त्वरीत उपलब्ध.
✲ संपूर्ण संगणकीकृत कामकाज.
✲ विनम्र व तत्पर सेवा.

✲ संचालक मंडळ ✲

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. श्री. बी. वाय. यादव (अध्यक्ष) | ॲड. श्री. अ.अ. तांबोळी (उपाध्यक्ष) | | श्री. गो. म. लोहे (संचालक) |
| श्री. भा. वि. बडवे (संचालक) | श्री. स. पां. राऊत (संचालक) | श्री. नं. ना. देशमुख (संचालक) | श्री. भा.द. नाईकवाडी (संचालक) |
| श्री.डॉ. कृ.द. मस्तुद (संचालक) | श्री. सु. बा. खाडे (संचालक) | श्रीमती वै.वि. टिळक (संचालिका) | सौ. र. क. घावटे (संचालिका) |
| | | | श्री. अ. रा. बनसोडे (सरव्यवस्थापक) |

सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद




श्री भगवंत प्रकटोत्सव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

Mo. 9657693995
8208902214

**श्री. कुलदीप संजय क्षीरसागर**
बी.एस.एल.,एल.एल.बी.
ॲडव्होकेट
३९४५, भवानी पेठ, सोलापूर रोड, बार्शी, जि. सोलापूर - ४१३४०१
ऑफिस वेळ : सकाळी १० ते ११ व सायं. ७ ते ९




श्री भगवंत प्रकटोत्सव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

Mo. 9767833939

**ॲड. अमोल नरहरी अलाट**
M.A.,LL.B.
(लायब्ररी चेअरमन, बार्शी वकील संघ, बार्शी)
अतिरिक्त व सत्र न्यायालय, बार्शी, जि. सोलापूर



श्री भगवंत प्रकटोत्सव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !




**श्री. राहुल सुभाष काळे**
(स्टॅम्प रायटर)
Mob. 9763466381 / 9284504920
Email : rahulkale861@gmail.com
ऑफिस : गाळा नं. १५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर, बार्शी.
घरचा पत्ता : कुलदैवत, ९३६/२, आदर्शनगर, नागणे प्लॉट, परंडा रोड, बार्शी.

श्री भगवंत प्रकटोत्सव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !




**प्रशांत विश्वासराव शेटे**
बी.कॉम.,जी.डी.सी. ॲण्ड ए., डी.सी.पी.एल., एल.एल.बी.
ॲडव्होकेट
कार्यालय व निवास
'राजगड' नर्सिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल मार्ग, म. बसवेश्वर कॉलनी, आगळगांव रोड, बार्शी-४१३४०१ जि.सोलापूर
भ्रमणध्वनी : ९८२२११४६६८ व्हॉट्सअॅप : ८६९८०८५०००

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १११०

**नविये आवडीचेनि भरें । कामुक निज वनिता विसरे ।
मग पाडेवीण अनुसरे । भ्रमला जैसा ।।**

युध्दभूमीत आपल्या शत्रुंशी लढण्यास आलेल्या अर्जुनाने जेव्हा आपल्यासमोरील सर्व शत्रुंना न्याहाळले, तेव्हा त्याच्या लक्षात आले की, हे तर आपले सर्व बंधु, गुरु, सगेसोयरे आहेत. शत्रुंच्या ठिकाणी आप्तेष्ट पाहिल्याने त्याची मूळ वीरवृत्ती जणू लोपच पावली. अन्यायाविरुध्द लढण्याचा त्याचा जो मूळ स्वभाव आहे तो विसरुन गेला आणि शत्रुंच्या प्रेमात पडला. मोहग्रस्त झालेल्या अर्जुनाचे ज्ञानेश्वर माऊलींनी अत्यंत सुंदर प्रकारे वर्णन केले आहे. माऊलींनी स्पष्टीकरणात्मक अनेक दृष्टात दिले आहेत. मानवी जीवनाला नेहमी लागू पडणारा दृष्टांत दिला आहे. माऊली तर ब्रम्हचारी होते, तरी पण संसारातील अनुभवी व्यक्ती प्रमाणे त्यांनी अनेक दृष्टांत दिले आहेत, याचे आश्चर्य वाटते. शत्रूंच्या प्रेमात पडून आपल्या मुळ वृत्तीला अर्जुन विसरला. नवयौवनाचा बहर असलेल्या नव्या स्त्रीच्या प्रेमात



पडलेला लंपट पुरुष स्वत:च्या सौदंर्यवाण, गुणसंपन्न पत्नीला विसरतो आणि परस्त्रीच्या प्रेमात वेडा होऊन वागतो. माऊलींचा हा दृष्टांत मानवी जीवनाला बरेंच काही देऊन जातो. दुस-या स्त्रीच्या प्रेमात पडल्याने अनेकांचे संसार उध्दवस्त झाल्याचे आपण पहातो. अशा लंपटपणामुळे स्वत:चाही व समोरच्याचाही संसार उध्दवस्त होतो. आपल्या पत्नीची निवड पुरुष स्वत: करतो नि मग लग्नानंतर त्याला दुसरी स्त्री आवडू लागते, यांत पत्नीचा काय दोष ! हे सत्य असले तरीही समाजात अशी अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. माणूस स्वार्थ, मोह, काम आदी पोटी आंधळा होतो व आपला आणि समोरच्याचा संसार अंधारात लोटतो.

स्वत:ची पत्नी सोडुन माणूस जेव्हा एखादया परस्त्रीच्या प्रेमात पडतो तेव्हा ती स्त्री सांगेल ते ऐकण्याची त्याची मानसिकता असते. तिच्या सांगेल त्या ऐकण्याने तो भ्रमिष्ट होतो. पत्नीला वाटेल तसे छळतो. पत्नीत दोष पाहायला सुरुवात करतो. समोरच्या स्त्रीमध्ये फक्त गुण पाहू लागतो. त्यामुळे संसारात पती-पत्नीच्या प्रेमात मोठी दरी निर्माण होते आणि त्याचा परिणाम सुखी संसार उध्दवस्त होण्यावर होतो. पुरुषाच्या या स्वभावाचा परिणाम त्याच्या मुलाबाळावर तर होतोच पण कळत नकळत त्याचा विपरित परिणाम समाजावरही होतो. माऊलींनी अर्जुनाला माध्यम करुन हा दृष्टांत समाजातील स्त्रीलंपट व्यक्तींना सुधारण्यासाठी दिला आहे. माऊलींच्या या दृष्टांताचे जर काळजीपुर्वक अवलोकन केले तर समाजात घडत असलेल्या अशा अनेक वाईट घटनांना आपोआप आळा बसुन माऊलींच्या दृष्टीकोनातील सुखी संसार आपणाला पाहायला मिळू लागतील. आपण कोणत्याही परिस्थितीत असे चुकीचे पाऊल टाकणार नाही, याची खात्री ज्याने त्याने केली पाहिजे. आपल्यामुळे एखादया स्त्रीच्या जीवनात संकट येणार नाही, आपल्यामुळे कोणालाही चुकीच्या मार्गावर जावे लागणार नाही, याची काळजी आपण घ्यायला हवी. आपल्याप्रमाणे इतरांचे जीवनही महत्त्वपूर्ण आहे, हे सदैव लक्षात असावे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - |
| दि. ९ मे २०२५ | शुभ दिवस, |
| विक्रम संवत् २०८१ | महाराणा प्रताप जयंती, |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वादशी (१४.५५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - हस्त (२४.०८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वज्र (२६.५७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (२८.१२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आर्थिक फायदा झाल्याने आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**वृषभ :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल. नोकरीत बडती मिळण्याची शक्यता. प्रवासाचा योग आहे.

**वृश्चिक :** धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

**धनु :** कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल. सद्गुरुची आराधनाने मन शांत होईल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल.

**मकर :** घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कुंभ :** उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन :** आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल.

# सायबर गुन्हेगारांना रोखण्यासाठी जनजागृती करा : गृहराज्यमंत्री कदम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**

सायबर गुन्हेगारांकडून होत असलेल्या फसवणुकीच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होताना दिसते. वाढत जाणारी सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी राज्य सरकारकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी लोकांमध्ये जनजागृती होणे गरजेचे असल्याने यावर जनजागरण करण्याच्या सूचना पोलीस प्रशासनाला दिल्या आहेत , अशी माहिती राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले.



बुधवारी राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम हे सोलापूर दौ-यावर आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले ऑनलाईन गुन्ह्याच्या वाढत्या प्रमाणाला रोखण्याची गरज आहे. गतवर्षी सोलापुरात २२ कोटींची आर्थिक फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. शहर सायबर पोलीस ठाण्याकडून सायबर गुन्हे उघडकीस आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. परंतु त्यांच्या जोडीला आता मुख्यमंत्र्यांच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र सायबर प्रोजेक्ट येत्या एक ते दीड महिन्यात पूर्ण होतोय. त्याचा सायबर क्राईमचे प्रमाण रोखण्यासाठी फायदा होईल. यामध्ये ए आय वापर करण्यात येणार आहे. असेही त्यांनी सांगितले.

### अन्न औषध विभागात मनुष्यबळाची भरती

अन्न औषध विभागामध्ये मन्युष्यबळाची कमतरता आहे. सोलापुरात एकही ड्रग्ज इन्स्पेक्टर नाही. याबद्दल लवकरच कार्यवाही होईल. या विभागात मनुष्यबळ वाढविण्यासाठी भरती पक्रिया राबवून ती पूर्ण केली जाईल. ज्यामुळे अन्न व औषधांवरील भेसळीला चाप बसेल असे कदम यांनी सांगितले.

### गुटख्याच्या चोरट्या वाहतुकीवर कारवाई

जिल्ह्याच्या नजीक कर्नाटक राज्य आहे. यामुळे सीमावर्ती भागातून गुटख्याची चोरटी वाहतूक होत असल्याचे अनेक प्रकार निदर्शनाला येत आहेत. ही वाहतूक रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याच्या सूचना केल्या आहेत. कोणाचीही गय न केली जाणार नाही. त्यांच्यावर कठोर कारवाईचे आदेश देण्यात आल्याचे कदम यांनी सांगितले.

### मार्केट यार्डात चौकीचा प्रस्ताव

मार्केट यार्डात शेतीमाल विक्रीसाठी सोलापूर जिल्ह्यासह कर्नाटक तसेच अन्य राज्यातून शेतकरी येतात. तेथे अनेक गैरप्रकार होत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याठिकाणी एक अद्यावर पोलीस चौकी तयार करण्याचा प्रस्ताव मिळाला असून त्याबाबत लवकरच निर्ण्य घेण्यात येईल असे गृहराज्यमंत्री कदम यांनी सांगितले.

### नवीन पोलीस ठाणे; सरकार सकारात्मक

शहराचा वाढता विस्तार पाहता आणखी पोलीस ठाण्यांची व मनुष्यबळाची गरज निर्माण झाली आहे. यापूर्वी सोलापुरात नवीन पोलीस ठाण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. तो प्रस्ताव मी आजच पाहिला असून यावर नव्याने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना आपण केल्या आहेत. त्याला शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद दिला जाईल, असेही गृहराज्यमंत्री कदम यांनी सांगितले.

## जिल्हा न्यायालयीन सहकारी पतसंस्थेची १०० टक्के वसुली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**

सोलापूर जिल्हा न्यायालयीन सहकारी पतसंस्थेची शतकोत्तर १०१ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा जिल्हा न्यायालय येथील आवारात पतसंस्थेचे विद्यमान चेअरमन संजय मॅकलवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. पतसंस्थेची वसुली १०० टक्के होत असल्याने व एन.पी शून्य टक्के असल्याने सालाबादप्रमाणे यंदाही पतसंस्थेचे लेखा परीक्षण अहवालात अ वर्ग प्राप्त झाल्याचे संस्थेचे चेअरमन यांनी सांगितले. यावेळी व्हाईस चेअरमन संजय कारले, सदस्या समीनापरवीन शेख, सुधीर क्षीरसागर, प्रसाद चुंगे, मुकुंद ढोबळे, शामराव वलेकर, अजित पगड्याल, ज्ञानेश्वर लिंबोळे, नबीलाल शेख, बलभीम पोतराज, लेखापाल किर्तीकुमार पदमा उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन शाम वलेकर यांनी केले.



## श्री सिध्देश्वर मंदिर प्रवेशद्वारा समोरील शौचालय हटवा

**भाजपा युवा मोर्चाचे आयुक्तांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**

ग्रामदैवत श्री. शिवयोगी सिध्देश्वर देवस्थानच्या ईशान्य दिशेकडील विष्णु घाट मुख्य प्रवेशव्दार लगत असलेले सार्वजनिक शौचालय पाडण्यात यावे, या मागणीचे निवेदन भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना देण्यात आले.



या शौचालयामुळे परिसरात दुर्गंधी पसरलेली असते. मुख्यव्दारालगत हे शौचालय आहे. विष्णु घाट येथे सोलापुरातील मानाच्या आजोबा गणपतीचे विर्सजन केले जाते.

तलावात या सुलभ शौचालयाचे घाण पाणी मिश्रीत होत आहे. त्यामुळे तलावाचे पावित्र्य भंग होत आहे, असा आरोप करत शौचालयास शहरातील सामान्य नागरीकांचा विरोध असून हे शौचालय तात्काळ पाडून ते इतरत्र स्थलातंर करण्यात यावे अन्यथा भविष्यात भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाकडून तीव्र अंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख, नागेश भोगडे, वैभव हत्तुरे, सरचिटणीस रवी कोटमळे, अजित गादेकर, सिद्धार्थ मंजेली, नागेश येळमेळी, शिवराज झुंजे, प्रेम भोगडे, नरेंद्र पिसे, राहुल घोडके, शिवशरण साखरे, अक्षय अंजीखाने, हरिप्रसाद बंडेवार, शशी अन्नलदास भार्गव बच्चू उपस्थित होते.



## महात्मा गांधी प्राणी संग्रहालयासाठी एनटीपीसी करणार सहकार्य

✓ **महाप्रबंधक बीजेसी शास्त्री यांनी दिली प्राणी संग्रहालयास भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**

एनटीपीसीचे महाप्रबंधक बीजेसी शास्त्री यांनी महात्मा गांधी प्राणी संग्रहालयास भेट देऊन पाहणी केली. यावेळी एनटीपीसीच्या सी.एस आर फंडमधून महात्मा गांधी प्राणी संग्रहालयासाठी सहकार्य करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी एनटीपीसी थर्मल प्लांटला दिली होती. त्यावेळी देगाव येथील ७५ एम एल डी मलनिसारण केंद्र व महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे सी.एस आर फ़ंड मधून मदत करण्यासंदर्भात पत्र दिले होते. त्या अनुषंगाने आज एनटीपीसीचे महाप्रबंधक बीजेसी शास्त्री, कार्यकारी संचालक यांनी आज महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे भेट दिली. यावेळी डॉ.सतीश चौगुले यांनी संपूर्ण माहिती दिली. यावेळी एनटीपीसीचे मनोरंजन सारंगी, रफिक उल इस्लाम, अमित सिंग, महापालिकेचे सहायक आयुक्त गिरीष पंडित, नगर अभियंता सारिका आकूलवार,अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी उपस्थित होते.

## कृषी पर्यटन केंद्र संचालक समिती अध्यक्षपदी आवताडे



✓ **उपाध्यक्षपदी पाटील**
✓ **राज्यातील पहिली समिती स्थापनेचा मान सोलापूरला**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या मान्यतेने, जिल्ह्यातील विविध कृषी पर्यटन केंद्रांच्या संचालकांनी एकत्र येऊन, सोलापूर जिल्हा कृषी पर्यटन केंद्र संचालकांची समिती स्थापन केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी लहु आवताडे, उपाध्यक्षपदी पुष्कराज पाटील तर सचिवपदी परमेश्वर शरणार्थी यांची निवड करण्यात आली.

पुणे विभागीय कार्यालय, मुंबई मुख्यालय, सोलापूरचे जिल्हा पर्यटन अधिकारी व अन्य शासकीय अधिकाऱ्यांचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभले. या उपक्रमात राजूकाका भंडारकवठेकर (अभिषेक मळा, पाकणी), लहू अवताडे (सिनाई ॲग्रो टुरिझम, कामती), पुष्कराज पाटील (आर्या रिट्रीट, पोखरापूर), परमेश्वर शरणार्थी (कल्याण ॲग्रो टुरिझम), सुरेश बापू गायकवाड (अस्मिता ॲग्रो टुरिझम), कपिल बजाज (पिकनिक पॉईंट), अमर कालेकर (लीला ॲग्रो टुरिझम) तसेच इतर अनेक संचालक आणि प्राईम कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यातील ही पहिली अशी समिती आहे, जी कृषी पर्यटन वाढीसाठी एकत्र येऊन सक्रियपणे पुढे जात आहे. ही समिती सोलापूर जिल्ह्याला पर्यटन नकाशावर वेगळ्या ओळखीने पुढे नेईल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला आहे.



## शिक्षिका ज्ञानेश्वरी शिंदेंना नारीशक्ती पुरस्कार

✓ **सर फाउंडेशन व महाराष्ट्र टीचर फोरमकडून झाला सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तामलवाडी, ता. तुळजापूर येथील सहशिक्षिका ज्ञानेश्वरी शिंदे यांना स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशन यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय नारीशक्ती पुरस्कार २०२५ सोलापूर येथील रंगभवन सभागृहात एका गौरवशाली सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रिसिजनच्या अध्यक्षा सुहासिनी शहा तर प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूरचे शिक्षणाधिकारी कादर शेख, माजी प्रशासकीय अधिकारी डॉ. सुजाता लोहकरे, डॉ. शशिकांत शिंदे, सिद्धाराम माशाळे, हेमा शिंदे, बाळासाहेब वाघ, गुणवंत चव्हाण या मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. शिंदे यांनी केवळ शालेय अभ्यासक्रमाचे अध्यापन न करता विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्यांची जाणीव निर्माण करणारे विविध उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या अध्यापनशैलीत नाविन्यपूर्णता आणि प्रयोगशीलता यांचा समावेश असून, त्यांनी स्वनिर्मित व्हिडिओंचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक रंजक आणि समजण्यास सोपे केले आहे. तसेच, टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याचे उपक्रम, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देणारे ठरले आहेत.

पीएम इ विद्या अंतर्गत व्हिडिओ निर्मितीमध्ये आदर्श पाठ सादर केले आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाचा योग्य वापर, प्रयोगशीलता व आत्मविश्वास वाढीस लागला आहे. या पुरस्काराबद्दल गटशिक्षणाधिकारी अर्जुन जाधव, केंद्रप्रमुख शारदा चव्हाण, मुख्याध्यापक सोमदेव गोरे, महादेव वाघमारे, स्मिता पाटोळे, प्रणिता कांबळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळा

**सोलापूर, दि. ८ मे-**

पुणे येथील बाणेर येथे किर्लोस्कर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमधील विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळा नुकताच पार पडला. गुरुवर्य आणि कुटुंबीयांसमक्ष विद्यार्थ्यांना पदवी बहाल करण्यात आली.हा क्षण प्रत्येकासाठी अविस्मरणीय ठरला. पदवीदान सोहळा यशस्वीरित्या पार पडल्याने संस्थेने सर्वांचे आभार मानले. पदवीदान सोहळ्याला पिनकॉल इंडस्ट्रीजचे अध्यक्ष, ईका मोबिलिटीचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. सुधीर मेहता हे प्रमुख पाहुणे होते. याप्रसंगी किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लिमिटेडचे अध्यक्ष आणि संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष अतुल सी. किर्लोस्कर, गर्वर्निंग काऊन्सिलच्या उपाध्यक्षा सौ. अदिती किर्लोस्कर आणि किर्लोस्कर व्यवस्थापन संस्थेच्या पुणे येथील संचालिका डॉ. टी.जी. विजया आदी मान्यवरही उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्ष अतुल सी. किर्लोस्कर यांनी देशातील व्यवसाय उद्योग क्षेत्राविषयी आपले विचार मांडले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

## शहरातील मोकाट कुत्र्यांच्या नसबंदी शस्त्रक्रियाची दैनंदिन संख्या वाढवा

**कुत्रा निर्बीजीकरण, लसीकरण केंद्रास महापालिका आयुक्तांची भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मे-**

महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी जुना पुना नाका येथील महापालिकेच्या कुत्रा निर्बीजीकरण व लसीकरण केंद्रास भेट दिली. या केंद्रातील नसबंदी शस्त्रक्रियाची दैनंदिन संख्या वाढवण्याच्या दृष्टीने केंद्रातील पिंजऱ्यांची क्षमता वाढवावी यासह विविध सूचना महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अधिकारी आणि संस्था चालक यांना दिल्या.




यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, पशु शल्य चिकित्सक डॉ. सतीश चौगुले, भरत शिंदे, नवसमाज निर्माण बहुउद्देशीय संस्था, नंदुरबारचे प्रकल्प संचालक गौतम शिरसाट व संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.यावेळी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी कुत्रा निर्बीजीकरण व लसीकरण केंद्रामधील प्रक्रियेसाठी पकडण्यात आलेल्या भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या देखभालीबाबत तसेच दैनंदिन कामकाजाची माहिती घेतली. संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी भटक्या कुत्र्यांना पकडण्याचे प्रात्यक्षिक दाखवले.

आयुक्तांनी संस्थेच्या पशुवैद्यकाद्वारे करण्यात येत असलेल्या कुत्र्याची नसबंदी शस्त्रक्रिया समक्ष पाहणी करत त्याबाबत माहिती घेतली. या केंद्रातील नसबंदी शस्त्रक्रियाची दैनंदिन संख्या वाढवण्याच्या दृष्टीने केंद्रातील पिंजऱ्यांची क्षमता वाढविण्याबाबत आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी उपस्थित अधिकारी व संस्था चालक यांना सूचना दिल्या. शासनाच्या नियमानुसार शास्त्रोक्त पद्धतीने शहरातील भटक्या व मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणण्याबद्दल नियोजन करून काम करण्याबाबतही सूचना दिल्या.

## बाजार समितीच्या निवडणुकीत ३३ उमेदवारांवर ओढवली नामुष्की

✓ **डिपॉझिट झाले जप्त;**
✓ **उर्वरित ३१२ जणांचे डिपॉझिट परत करणे सुरु**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मे-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये जवळपास ४८९ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी अनेकांनी उमेदवारी अर्ज वेळेत माघार घेतला होता तर उर्वरित निवडणूक लढविलेल्या जवळपास ३३ जणांचे जवळपास १ लाख १३ हजार रुपयांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. तर उर्वरित ३१२ उमेदवारांची अनामत रक्कम परत करण्याची कार्यवाही सुरु झाली आहे.

त्यामुळे संबधितांनी अनामत रक्कमेचा धनादेश जिल्हा उपनिंबधक कार्यालयातून घेवून जावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांनी केले आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत सर्वसाधारण प्रवर्गातून निवडणूक लढविण्यासाठी पाच हजार तर राखीव मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी एक हजार रुपयांची अनामत रक्कम भरणे आवश्यक होते.

**संबधित उमेदवारांनी अनामत रक्कमेचा धनादेश परत घेऊन जाण्याचे निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांचे आवाहन...**

त्यानुसार बाजार समितीसाठी जवळपास ४८९ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापोटी निवडणूक कार्यालयाकडे साधारणपणे १७लाख १ हजार रुपयांची अनामत रक्कम जमा झाली होती. यापैकी अनेक उमेदवारांनी वेळेपूर्वीच आपला अर्ज माघार घेतला होता. त्यामुळे त्यांना ती रक्कम परत देणे अपेक्षित आहे. ज्यांनी ही निवडणूक लढविली मात्र निवडणूकीत त्यांना अपेक्षित मते मिळाली नाहीत, त्यांची रक्कम मात्र जप्त केली जाते. त्यानुसार ३३ उमेदवारांची १ लाख १३ हजार रुपयांची रक्कम जप्त झाली आहे. तर उर्वरित ३१२ जणांची जवळपास १५ लाख १३ हजार रुपयांची रक्कम परत करण्याचे काम सुरु झाले आहे. त्यामुळे संबधितांनी जिल्हा उपनिबंधक कार्यालयातून ही रक्कम परत घेवून जाण्याचे आवाहन केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### पिलीवची शरण्या खलीपे ठरली सिल्वर मेडलची मानकरी

**पिलीव, दि ८ मे -**

पिलीव (ता. माळशिरस) येथील केंद्र शाळेत शिकणारी शरण्या सुरज खलीपे हिने प्रसन्न ऑलिंपियाड नवोदय फाऊंडेशन मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवत सिल्वर मेडल प्राप्त केले आहे. शरण्या ही नुकतीच इयत्ता दुसरीमध्ये प्रत्येक विषयात अ श्रेणी मिळवून उत्तीर्ण झाली आहे. इयत्ता दुसरीच्या जिल्हा यादीमध्ये तिने चौथा क्रमांक मिळवून पिलीव गावच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला आहे. शरण्याच्या या यशाबद्दल तिचे पिलीवसह परिसरातून कौतुक होत असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शरण्याच्या या दैदीप्यमान यशाबद्दल तिचे वडील सुरज बाळकृष्ण खलीपे यांनी शरण्याच्या या यशाचे सर्व श्रेय हे तिच्या वर्गशिक्षिका वैशाली भागवत यांना असल्याचे सांगितले. ते म्हणाले, शरण्या या नावाचा मराठी अर्थ जो आश्रय देतो किंवा जो संरक्षण करतो असा होतो. त्यामुळे शरण्याही भविष्यात मोठी अधिकारी बनेल व गोरगरीब, वंचित, शोषित, पीडित, अन्यायग्रस्तांना न्याय देऊन आश्रय देईल यात तीळमात्र शंका नाही.



### १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**मंगळवेढा दि.८ मे-**

: मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीला माझे तुझ्यावर खूप-खूप प्रेम आहे असे म्हणून तिचा पाठलाग करुन तिच्यावर जबरी अत्याचार केल्याप्रकरणी मयूर राक्षे याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी तथा अल्पवयीन मुलीस दि.१३ मार्च ते ५ मे च्या आठ वाजेपर्यंतच्या कालावधीत माझे तुझ्यावर प्रेम आहे असे म्हणून वारंवार मोबाईलवर मेसेज पाठवून पाठलाग केला. तसेच गावातील मोकळ्या शिवारात नेवून पिडीता नकार देत असताना तिचे चुंबन घेत जबरदस्तीने तिचेवर आत्याचार केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक लातुरकर हे करीत आहेत.

### महिलेस चावा घेऊन केले जखमी; चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि.८ मे -**

ब्रम्हपुरी येथे घरजागेत पत्राशेड मारण्याच्या कारणावरुन एका महिलेस काठीने बेदम मारहाण करुन चावा घेतल्या प्रकरणी सुभाष पाराध्ये,रणजीत पाराध्ये, रोहित पाराध्ये,अभिजीत पाराध्ये या चौघाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी सुरेखा पाराध्ये (वय ४३, रा. ब्रम्हपुरी) ही मजूरी करीत असून दि.२३ एप्रिल रोजी दुपारी १.३० वाजता फिर्यादी ही तिच्या घरासमोर बसलेली असताना आरोपीने येवून येथील गावठाण जमिनीतील हिस्यापैकी काही भागावर पत्राशेड करण्याकरिता पोल रोवत असताना सदरची जागा आमची आहे. तुम्ही पत्राशेड अगर पोल मारु नका असे फिर्यादी म्हणताच आरोपीने शिवीगाळ करुन तुला जीवंत सोडणार नाही अशी धमकी देवून काठीने मारहाण करीत डाव्या हाताच्या मनगटाला चावा घेवून जखमी केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास बोराळे बीटचे पोलीस करीत आहेत.



### आदर्श पब्लिक स्कूलला राज्यस्तरीय आदर्श संस्था पुरस्कार

**कुर्डूवाडी, दि.८ मे-**

कुर्डूवाडी येथील आदिशक्ती शिक्षण संस्था वेताळवाडी संचलित आदर्श पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या संस्थेस 'एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना' महाराष्ट्र राज्याचा आदर्श संस्था पुरस्कार प्राप्त झाला त्याचबरोबर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे यांना आदर्श संस्थाचालक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सोहळा हुतात्मा स्मृती मंदिर,सोलापूर येथे एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष बापूसाहेब अडसूळ यांनी आयोजित केला होता. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे, जेष्ठ संचालिका आशाताई सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे व संचालिका वर्षाताई सुरवसे, सर्व विभागप्रमुख, शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना गृहराज्यमंत्री श्री. योगेश कदम, मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे महाराष्ट्र राज्य प्रमुख मंगेश चिवटे, जिल्हा शिवसेना प्रमुख मनिष काळजे, प्रा.डॉ. बापूसाहेब अडसूळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा गौरवशाली पुरस्कार केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे.

### पालखी मार्ग रुंदीकरणाची लहुजी शक्ती सेनेची मागणी

**अक्कलकोट, दि. ८ मे-**

लहुजी शक्ती सेना सोलापुर जिल्हा संपर्क प्रमुख वसंत देडे यांनी तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील पालखी मार्ग तातडीने रुंदीकरण करावे अशी मागणी मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस व सार्वजनिक बांधकाम मंत्री शंभुराजे देसाई यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. राज्यातील एक प्रमुख तीर्थस्थळ अशी ख्याती अक्कलकोटची झाली आहे. येथील अशिया खंडातील सर्वात मोठे शस्त्र संग्रहालय, ऐतिहासिक नवीन जुना राजवाडा, शिवपुरी, यज्ञस्तंभ, अग्निहोत्र प्रसार प्रचार, अन्नछत्र मंडळातील शिवस्मारक, गडकिल्ले, बालोद्यान, अजरामर धातुशिल्प, शिवसृष्टी दालन पाहण्याकरिता सहली पर्यटक वाढले आहेत. तीर्थक्षेत्री एवढा मोठा ओघ वाढूनही तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिर परिसर, गुरु मंदिर बुधवार पेठ, समाधी मठ मंदिर परिसरातील एकाही रस्त्याचे रुंदीकरण झालेले नाही. अरुंद रस्त्यामुळे दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हा रस्ता तातडीने रुंदीकरण करावा अशी लेखी मागणी निवेदनाद्वारे लहुजी शक्ती सेना जिल्हा संपर्क प्रमुख वसंत देडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सार्वजनिक बांधकाममंत्री शंभुराजे देसाई यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारा केली आहे .

# संत नामदेव संजीवन समाधी सोहळा भव्य होणार

## ॲड. महेश ढवळे : पंढरपुरात शिंपी समाज बैठकीत निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.८ मे-**

भागवत धर्म व वारकरी संप्रदायाचे आद्य प्रचारक संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा ६७५ वा संजीवन समाधी सोहळा २३ जुलै रोजी आहे. या सोहळ्यात राज्सातील शिंपी समाजाच्या सर्व पोटजातीच्या दानशूर व्यक्तीसह समाजबांधवांनी तन, मन, धनाने सहभागी होवून हा सोहळा भव्य दिव्य करावा असे आवाहन अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांनी केले.

संत नामदेव महाराजांच्या ६७५ व्या संजिवन समाधी सोहळ्याचे नियोजन करण्यासाठी समस्त शिंपी समाजाची महत्वपूर्ण बैठक रविवार दि. ४ मे रोजी प्रदक्षिणा मार्गावरील संत नामदेव महाराज मंदिरात (जन्मस्थान) संत नामदेव महाराजांचे १६ वे वंशभ ह.भ.प. माधव महाराज नामदास यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ह.भ.प. मुकुंद महाराज नामदास, ज्ञानेश्वर महाराज नामदास, निवृत्ती महाराज नामदास, केदार महाराज नामदास, केशवराज, राष्ट्रीय सचिव रुपेश खांडके, पंढरपूरचे अध्यक्ष गणेश उंडाळे, उपाध्यक्ष संजय जवंजाळ, सचिव विलास पोरे, विश्वस्त महेश गानमोटे, सोलापूरचे धनंजय जवंजाळ, महेश रेळेकर, ॲड. अजय तल्लार, मनोज भांडारकर, नंदकुमार कोसमतवार, अनिल गचके, पालखी सोहळा पत्रकार संघाचे संस्थापक सुर्यकांत भिसे, खेमराज नामा, पुणे विभाग प्रमुख सागर मांडरे, कोकण विभाग प्रमुख विजय माळवदे, महिला प्रदेशाध्यक्षा रेखाताई मळोतकर, महिला कार्यकारणी प्रमुख शीतल माळवदे, माजी अध्यक्ष चंद्रकांत निकते आदी उपस्थित होते. यावेळी ६७५ वा संजीवन समाधी सोहळ्याचे यशस्वी नियोजन करण्यासाठी विविध कमिट्यांची घोषणा करण्यात आली. यामध्ये मागदर्शन करताना ॲड.ढवळे म्हणाले, क्षत्रिय एकसंघाने वेळोवेळी पाठपुरावा केल्याने पंढरपुरात संत नामदेव महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे रेल्वेची जागा राज्य शासनाने स्मारकासाठी निश्चित केली आहे. स्मारकाचा अंतिम आराखडा तयार करण्यात आला असून लवकरच स्मारकाचे काम सुरु होणार असल्याचे त्यांनी सांगितले. सोहळ्याच्या नियोजनासाठी विविध कमिट्यांची घोषणा करण्यात आली असून यासाठी समाजातील युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. संत नामदेव महाराजांचा समाधी सोहळा शासनस्तरावर साजरा होण्यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचेही सांगितले. संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या ६७५ वा संजीवन समाधी सोहळा यावर्षी जुलै महिन्यात असून दि.२३ व २४ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये समस्त नामदास महाराज परिवार, पंढरपूर शिंपी समाज, अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघ, श्री केशवराज संस्थान, संत नामदेव महाराज वारकरी-फडकरी संघटना, संत नामदेव युवक संघटना, महिला भजनी मंडळ तसेच महाराष्ट्रातील समस्त शिंपी समाज, व सहयोगी संस्थांच्या अनमोल सहकार्याने हा संजीवन समाधी सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

सदर बैठकीस महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यातून शिंपी समाजाचे पदाधिकारी व समाज बांधव, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन राजेश धोकटे यांनी केले. पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष प्रथमेश परांडकर, युवक संघटनेचे अध्यक्ष पै. शैलेश धट, केशवराज संस्थेचे सदस्य जयवंत कांबळे, पत्रकार प्रशांत माळवदे, निलेश धोकटे, प्रशांत काकडे, दत्ता चांडोले अक्षय महिंद्रकर, कृष्णा जवंजाळ, अनिल धट, सचिन बुरांडे, माऊली निकते, प्रकाश मेटकर आदींनी परिश्रम घेतले.



### २३ जुलै रोजीच समाधी सोहळा

यावर्षी दिनदर्शिकेमध्ये मंगळवार दि. २२ जुलै रोजी संत नामदेव महाराजांच्या समाधी सोहळ्याचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार द्वादशी दिवशी क्षीरापतीचा कार्यक्रम झाल्याशिवाय समाधी सोहळा साजरा केला जात नाही. त्यामुळे सोमवार दि.२१ रोजी एकादशी दिवशी दिंडीची नगर प्रदक्षिणा, मंगळवार दि. २२ रोजी द्वादशी दिवशी क्षीरापतीचा कार्यक्रम झाल्यानंतर बुधवार दि.२३ जुलै रोजी संत नामदेव महाराजांचा ६७५ वा संजीवन समाधी सोहळा समस्त नामदास महाराज फडाच्यावतीने पंढरपुरात साजरा करण्यात येणार आहे. तेव्हा समस्त शिंपी समाज बांधव व संत नामदेव भक्तांनी बुधवार दि. २३ जुलै रोजी समाधी सोहळा साजरा करावा असे आवाहन ह.भ.प. निवृत्ती महाराज नामदास यांनी केले आहे.

# मंगळवेढ्याजवळ कारचा अपघात

## नशीब बलवत्तर म्हणून वाचले पती-पत्नी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.८ मे -**

सोलापूर-कोल्हापूर या राष्ट्रीय महामार्गावर हैद्राबाद येथील एक कुटूंब महालक्ष्मीच्या दर्शनासाठी कारमधून जात असताना कारच्या आडवे कुत्रे आल्याने कारने तीन ते चार वेळा पलटी मारुन रोडच्या खाली गेल्याची घटना घडली असून ही घटना सुगरण हॉटेल जवळ नुकतीच घडली. दरम्यान या अपघातामध्ये लक्ष्मीच्या दर्शनासाठी निघालेले पती-पत्नी बालंबाल बचावले आहेत.

या घटनेची हकीकत अशी,यातील खबर देणारे रवीकुमार दिनवही (वय- ५६ वर्षे) हे वित्त मंत्रालयात नोकरीस असून सध्या ते हैद्राबाद येथे निवासी आहेत. दि.२ रोजी सकाळी ६.४५ वाजता ते व त्यांच्या पत्नी जयश्री असे दोघेजण कार (टी.एस.०८ एफ. डी.१८१८) गाडीने कोल्हापूर येथील महालक्ष्मी दर्शनासाठी जात असताना सोलापूर-कोल्हापूर या राष्ट्रीय महामर्गावरील मंगळवेढा जवळ असलेल्या सुगरण हॉटेल जवळ रोडवर एक कुत्रा अचानक आडवा आला. त्यास वाचविण्याच्या प्रयत्नात कारगाडीने डावे बाजूस शेतामध्ये जावून पलटी होवून कारच्या बॉडीचे आर्थिक नुकसान झाले. या गाडीने तीन ते चार वेळा पलटी मारल्याने महामार्गावरुन जाणाऱ्या लोकांनी धावत येवून त्या पती-पत्नीस बाहेर काढले.



तसेच इंचगाव टोलनाका येथे कॉल करुन ॲब्ल्यूलन्स व कर्मचारी बोलावून कार रोडवर आणली. दरम्यान कारने चार पलट्या मारुनही पती-पत्नी नशीबाने त्यांना कोणतीही दु:खापत झाली नसल्याने सदर कार चालकाने देवाचे आभार मानले. याची खबर कार चालक यांनी पोलीसात दिली आहे. या अपघाताचा अधिक तपास मंगळवेढा शहरचे पोलीस नाईक कृष्णा जाधव हे करीत आहेत.

# पंढरपूरात अवैध वाळू वाहतूकीवर कारवाई

## तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दोन वाहने केली जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.८ मे -**

अवैध वाळू उपसा व वाहतूकीविरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूलच्या पथकाने भीमा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे दोन वाहने जप्त केल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. दरम्यान ५ मे रोजी पहाटे गोपाळपूर भीमा नदी पात्रामध्ये अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या टाटा कंपनीचे विना नंबरचा एक पिकअप व ७ मे रोजी दुपारी गोपाळपूर-मुंढेवाडी रस्त्यावर वाहतुक करताना अशोक लेलंड कंपनीचा पिकअप वाहन (क्रमांक एम एच-१२-जीटी-८७१५ ) अशी दोन वाहने पकडण्यात आली असून, सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे लावण्यात आली आहेत.

या कारवाईमध्ये कासेगाव मंडल अधिकारी पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी साईनाथ अडगटाळे सहभागी झाले होते.



# सेवा पुस्तक शिबीराबद्दल गटशिक्षणाधिकाऱ्यांचा सत्कार



## प्रशासनाच्या चांगल्या कामाबद्दल कौतुकाची थाप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि ८ मे-**

शिक्षकांच्या सेवापुस्तकातील महत्त्वाच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी दि. २ ते ७ मे अखेर सेवा पुस्तक शिबीर (Service Book Camp) लावल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांचा अक्कलकोट शिक्षक संघांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी गटशिक्षणाधिकारी आरबाळे यांना विशेष सहकार्य करणारे विस्ताराधिकारी सोमशेखर स्वामी, बापुराव चव्हाण, आयुबखान मर्डी यांच्यासह केंद्रप्रमुख सुरेश शटगार, कृष्णात मोरे, वरिष्ठ सहाय्यक संतोष शेतसंदी, साधन व्यक्ती गोविंद राठोड, शरद कुंभार, आझम पटेल, बाळकृष्ण म्हेत्रे, प्रेम राठोड, बसवराज सक्करगी, तुकाराम कोळी, सतीश पाटील, महांतेश भंडारकवठे, महांतेश कर, गणेश नागणसुरे, गणेश ओहोळ या शिक्षक बांधवांनी परिश्रम घेऊन शिक्षकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावला याबद्दल सर्व मान्यवरांचा शिक्षक संघाकडून जिल्हाध्यक्ष विरभद्र यादवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना वीरभद्र यादवाड यांनी प्रशासनाचे तोंडभरून कौतुक केले.गटशिक्षणाधिकारी आरबाळे यांनी टीमवर्कमुळे अशा गोष्टी सहज शक्य होतात. आपले प्रशासकीय कार्य प्रामाणिकतेने व तालुक्याची शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी प्रसंगी कठोरतेने काम करत राहणार असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष बाळकृष्ण म्हेत्रे, तालुकाध्यक्ष बसवराज खिलारी, सरचिटणीस सतीश पाटील, उपाध्यक्ष बीटी बागवान, कोषाध्यक्ष भिमशा चौगुले, तालुका संघटक श्रीशैल बिराजदार, श्रीशैल दोडमनी, अंकुश माळी यांच्यासह अनेक शिक्षक बंधु भगिनी उपस्थित होते.



# टेंभुर्णीत पोलिसांकडून अवैध धंद्यासह अतिक्रमणावर कारवाई

## पोलीस निरिक्षक नारायण पवार यांचा जनजागृतीवर भर

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ८ मे -**

टेंभुर्णी हद्दीतील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करतानाच शहरांतील कायदा व सुव्यवस्थेबद्दल जनजागृती करून नंतर कायद्याचा बडगा उगारणार असल्याचे प्रतिपादन टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी केले.

टेंभुर्णी पोलीसांनी येथे रस्त्यावरील व्यावसायिक तसेच पुणे-सोलापूर हायवेवर दुर्गंधी व घाण निर्माण करणारे विक्रेते यांच्यावर प्राथमिक कारवाई करून त्यांना दंडात्मक कारवाईने आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिली. त्यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक पवार यांनी टेंभुर्णी शहरातील बाजारपेठेत त्याचबरोबर जुन्या पुणे सोलापूर हायवेवर वाहतुकीस अडथळा निर्माण करू नये असे आवाहन केले. दरम्यान पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या नेतृत्वाखाली टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी शहरातून रूट मार्च करून या बेसिस्त वाहनधारकांवर हातगाडी व फळ विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई केली. त्यामुळे टेंभुर्णी भागामध्ये एकच खळबळ उडाली. आता टेंभुर्णी शहराला शिस्त लावणाऱ्या पोलीसिंगला सुरुवात झाल्यामुळे टेंभुर्णी शहरवासीयांमधून व सर्वसामान्य नागरिकांमधून याबाबतीत टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे कौतुक होत आहे.

# लेकीचं झाड अभियानास राज्यस्तरीय नेचर केअर पर्यावरण पुरस्कार

## रोख २१ हजार रुपयांचे बक्षिस आणि सन्मानपत्र प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.८ मे-**

गेल्या तीस वर्षांपासून नेचर केअर फर्टिलाईझर्स कंपनीच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीधोरण राबवून शेतकरी राजाबरोबर सर्व भारतीयांना उत्तम प्रतीचे कसदार अन्न खायला मिळावे या हेतूने काम करणाऱ्या नेचर केअरतर्फे प्रतिवर्षाप्रमाणे महाराष्ट्रातून पर्यावरणरक्षण, वृक्षलागवड आणि संगोपनासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना नेचर केअर सन्मानपत्र आणि रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात येते.त्या अनुषंगानेच करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीमच्यावतीने लावण्यात आलेली लेकीची झाडे आणि जागर टीमच्या माध्यमातून स्वच्छतेच्या कामासाठी या टीमचा रोख एकवीस हजार रुपये व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. पुरस्कार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सेंद्रिय शेती कृषीभूषण राजेंद्र भट यांचे शुभहस्ते आणि अभिनेत्री सायली संजीव, नेचर केअरचे प्रमुख जयंत बर्वे, जयदेव बर्वे, कामाक्षी बर्वे यांचे प्रमुख उपस्थितीत करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीमचे संकल्पक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी विश्वजीत शिंदे, बापू खारे, चेतन पुरवत, नागेश खारे, शिवम रणे, हरिश्चंद्र वास्ते, पांडुरंग काटवटे, विशाल बोधे, सुधीर मगदूम, राजू शेळके यांच्यावतीने स्वीकारला. यावेळी राजेंद्र भट, सायली संजीव यांनी झाडे लावून ती जगवली पाहिजेत. सध्याचे तापमान कमी करायचं असेल तर झाडे लावली पाहिजेत. आज या पुरस्कारामुळे महाराष्ट्रभर काम करणाऱ्या वृक्षप्रेमींच संमेलनच जमलेले आहे आणि या सर्वांच्या आचारविचाराची देवाणघेवाण होते आहे. सध्याच्या केमीकलच्या शेतीचा मानवी शरीरावर भयानक परिणाम होणार आहे. त्यामुळे भविष्यकाळात सेंद्रिय शेती धोरण अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचे मनोगत व्यक्त केले. यावेळी महाराष्ट्रातील अनेक वृक्षप्रेमी संस्थामधील वृक्षप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढील काळात आता उपस्थित वृक्षप्रेमी आणखी जोमाने काम करतील. अनुभवाची हीच शिदोरी घेऊन पुढील वाटचालीसाठी प्रेरणा मिळणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नेचर केअर फर्टिलाईझर्स कंपनीच्या सर्व कर्मचारी यांनी अधिक परिश्रम घेतले.



## श्री अंबरीषवरद भगवंत प्रकटोत्सव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

Email-ID- am_barshi@msamb.com
फोन-(०२१८४) २२२९७६/२२२३५३

# कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी

जि. सोलापूर - ४१३४०१

दक्षिणोत्तर भारताच्या लहान-मोठ्या पेठांशी सचोटीने व्यापार करणारी व मराठवाड्याच्या प्रवेशद्वाराशी विनटलेली, शेतकरी व व्यापारी यांची एकमेव विश्वासपात्र पेठ म्हणजेच कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शीचे पंडित जवाहरलाल नेहरु प्रिन्सिपल मार्केट यार्ड, बार्शी.

### * बाजार समितीची वैशिष्ट्ये *

* सर्व सोयींयुक्त प्रशस्त धान्य बाजार * शेतमालाची उघड लिलाव पध्दतीने विक्री व त्वरीत चुकारा * ६० मे. टन क्षमतेचा भुईकाटा * जनावर बाजार * फळे, भाजीपाला मार्केट * कडबा मार्केट * शॉपिंग सेंटर * कोल्ड स्टोअरेज * मालाचे योग्य वजन होण्यासाठी परवानाधारक तोलार * सुलभ शौचालय * जनावरासाठी निवारा शेड * ई-नाम योजना * शेतमाल तारण योजना * हमीभाव खरेदी केंद्र * गांडूळ खत प्रकल्प * धान्य चाळणी यंत्र व गोदाम * सौर ऊर्जा प्रकल्प * शेतकरी निवास * विविध औषधी वनस्पतीची लागवड व संवर्धन * संपूर्ण बाजार आवारामध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे



श्री. तुकाराम अंबादास जगदाळे
सचिव



श्री. विजय विठ्ठल राऊत
मुख्य प्रशासक

### * अशासकीय प्रशासकीय मंडळ *

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. शाहूराजे संतोष निंबाळकर | २) | ओंकार नानासाहेब धायगुडे |
| ३) | मा. जिल्हा उपनिबंधक सह. संस्था, सोलापूर | ४) | मा. सहाय्यक निबंधक सह. संस्था, बार्शी |

---

श्री भगवंत प्रसन्न



श्री अंबरीषवरद भगवंत प्रकटोत्सव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !



प्रोप्रा. रमेश (बापू) माने
ए क्लास गव्ह. लायसन्स इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर
मो. 7769098777

## हेमंत इलेक्ट्रिकल्स, बार्शी (M.C. No. 18421)

Specialist In : H.T. / L. T. Line Work & Material Suppliers ▪ Cable Work ▪ S. V. Lights ▪ S/stn Work ▪ Domestic & Industrial Wiring ▪ Panel Work ▪ Transformer Repair ▪ 33/12/11 RV HT Cable Jointing Kit

ऑफिस : तुळशीराम रोड, सांगली बँकेजवळ, बार्शी, जि. सोलापूर

## मे. श्री. येडेश्वरी इलेक्ट्रिकल्स अँन्ड इंजिनिअर्स बार्शी (M.C. No. 37637)

श्री भगवंत सुशिक्षित बेरोजगारांची स्वयंरोजगार सेवा व उद्योग सहकारी संस्था मर्यादित, बार्शी.

---



## भगवंत प्रकट दिनाच्या हार्दीक शुभेच्छा..!

स्थापना : १९९६
रजि.नं. SUR/BSI/RSR/(R)727/96/Date : 21/3/1996
विना सहकार नही उद्धार
एकमेका साह्य करु ! अवघे धरु सुपंथ !!

संस्थापक,चेअरमन

कै. देवीदास (बापू) बारंगुळे

# कालभैरव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, बार्शी.

हेड ऑफिस : संकेश्वर बोळ, कृष्णा कॉम्प्लेक्सशेजारी, बार्शी मो.९५७९३४९४१५
शाखा : ६४६, कुर्डूवाडी रोड, शिवाजी नगर, मलकापूर ट्रान्सपोर्टच्यावर, बार्शी मो.९५७९३६४५३१

### आकर्षक ठेव योजना

| अ.नं. | ठेवीची मुदत | व्याज दर |
|---|---|---|
| १ | ४६ दिवस ते ९० दिवस मुदत ठेव | ६% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस मुदत ठेव | ७% |
| ३ | १८१ दिवस ते १ वर्षे पुर्ण मुदत ठेव | ८% |
| ४ | १ वर्ष पुर्ण ते २ वर्षापर्यंत | ९% |
| ५ | २ वर्ष पुर्ण ते ३ वर्षापर्यंत | ९.५०% |
| ६ | ३ वर्ष पूर्ण व पुढे | १०% |

### आर.डी.(R.D.) ठेव योजना

| अ.नं. | आर.डी.(रिकरिंग ठेव)ची मुदत | व्याज दर |
|---|---|---|
| १ | १ वर्षे मुदत पुर्ण | ८% |
| २ | २ वर्षे मुदत पुर्ण | ९% |
| ३ | ३ वर्षे मुदत पुर्ण | १०% |
| ४ | ४ वर्षे मुदत पुर्ण | ११% |

कालभैरव सुकन्या ठेव योजना खास मुलींच्या उच्च शिक्षणासाठी/लग्नासाठी

### कालभैरव लखपती ठेव योजना

| | | |
|---|---|---|
| दरमहा ५०० रु. भरा | मुदत १२० महिने(१० वर्ष) | रु. १,००,०००/- मिळवा. |
| दरमहा १००० रु. भरा | मुदत ४७ महिने(६ वर्ष २ महिने) | रु. १,००,०००/- मिळवा. |
| दरमहा २५०० रु. भरा | मुदत ३५ महिने(२ वर्ष ११ महिने) | रु. १,००,०००/- मिळवा. |
| एकरकमी रु. १५ हजार भरा | २० वर्षानंतर | रु. १,०१,०००/- मिळवा. |

दामदुप्पट ठेव ८६ महिने पूर्ण

सर्व मुदत ठेवीवर ज्येष्ठ नागरीक व महिला सभासदांना 0.५ टक्के जादा व्याज दर देण्यात येईल.

विविध आकर्षक ठेव योजना

पगार तारण कर्ज, वैयक्तिक कर्ज, जागा तारण कर्ज, वाहन तारण कर्ज, सोनेतारण कर्ज, ओव्हर ड्राफ (OD) तारण कर्ज

लॉकर सुविधा उपलब्ध

श्री. मंगेश देवीदास बारंगुळे
चेअरमन

श्री. श्रीधर बाबूराव चव्हाण
व्हा. चेअरमन

---

### श्री भगवंत प्रकटोत्सव दिनास हार्दिक शुभेच्छा !

* शुभेच्छुक *

श्री. संतोष दगडू घोलप
श्री. नागेश दगडू घोलप
श्री. गणेश दगडू घोलप
श्री. गोविंद दगडू घोलप



**व घोलप परिवार**

मंगळवार पेठ, बार्शी, जि. सोलापूर

---

### श्री भगवंत प्रगटोत्सव दिनास व भक्तांस हार्दिक शुभेच्छा..!



शुभेच्छुक : **अजय तिवारी** सामाजिक कार्यकर्ते बार्शी

---

### श्री भगवंत प्रकट दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

श्री नागनाथ बहुउद्देशिय शिक्षण संस्था संचलित,

## माऊली प्री इंग्लीश मिडियम स्कुल
## माऊली सेमी इंग्लीश मिडियम स्कुल

दत्त नगर,न.पा.शाळा नं.३ च्या पाठीमागे,बार्शी.

प्ले ग्रुप,नर्सरी,ज्यु.केजी व सि.केजीसाठी प्रवेश

प्रवेश सुरु..!

| वर्ग | वय |
|---|---|
| Play Group | अडीच वर्षे |
| Nursery | ३ वर्षे |
| Jr. KG | ४ वर्षे |
| Sr. KG | ५ वर्षे |

सेमी इंग्लीश माध्यम

इयत्ता १ ली

Syllabus Based on CBSE Pattern
Mo. 84 85 81 12 12 Mo. 70 57 58 35 25

---

श्री भगवंत प्रकटोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा !



## चंद्रकांत यशवंत बुडूख
## दिलीप चंद्रकांत बुडूख
## ॲण्ड सन्स

सोन्या चांदीचे व्यापारी

हळद गल्ली, बार्शी-४१३४०१ (जि.सोलापूर)
☎: २२३२६७, नि.२२४१०६

---

### श्री भगवंत प्रकटोत्सव दिनास हार्दिक शुभेच्छा !





## ॲड. निखिल तानाजी पाटील

दिव्यरत्न रेसिडेन्सी, बी-००१,
शिवशक्ती मैदानाजवळ बार्शी, जि. सोलापूर
मो. ९७६३६२७६५५

---

### श्री भगवंत प्रकटोत्सव दिनास हार्दिक शुभेच्छा !





## श्री. युवराज गोवर्धन जगताप

Mo. 8275171227

अध्यक्ष:- महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक सेना बार्शी
तालुका व शहरअध्यक्ष :- सावित्रीबाई फुले खाजगी प्राथमिक शिक्षक सेवक सहकारी पतसंस्था मर्या.
बार्शी शहरविभागीय उपाध्यक्ष :- काव्यप्रेमी शिक्षक मंच सोलापूर (पुणे विभाग)

---

### श्री भगवंत प्रकटोत्सव दिनास हार्दिक शुभेच्छा !

CA INDIA
caabhishekgudage@gmail.com
PUNE & BARSHI

CA Abhishek B. Gudage
CA Komal A. Gudage
8999287143, 7767094271

## बालाजी एन्टरप्राईजेस





महात्मा गांधी शॉपिंग सेंटर, बार्शी.
प्रोप्रा. भीमाशंकर गुदगे मो. ९८२२०९७१०

---

## श्री अंबरीषवरद भगवंत प्रकटोत्सव दिनाच्या



हार्दिक शुभेच्छा

सहकार महर्षी



कै.तात्यासाहेब देशमुख

।। विना सहकार नाही उद्धार ।।

सहकार क्षेत्रातील ७६ वर्षातील विश्वसनीय वाटचाल
नोंदणी क्र. व स्थापना - सी ११६९ दि. ८/३/१९४९

# श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि. बार्शी

२६३५, रुई ओळ, बार्शी जि. सोलापूर फोन : ०२१८४-२२२३१४

ठळक वैशिष्ट्ये :

१. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. डिलरशीप १९६५ पासून
२. बार्शी पेट्रोल पंप स्थापना सन १९६७ (५५ वर्षाची विश्वसनीय परंपरा)
३. रास्तभाव धान्य दुकान स्थापना १९७० पासून
४. जामगांव पेट्रोल पंप स्थापना २००७ (१५ वर्षाची विश्वसनीय परंपरा)
५. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. (वाहतुक कॉन्ट्रॅक्टर सन २००७ पासून)
६. शासकीय व निमशासकीय योजना तालुक्यात विश्वासाने राबविणारी संस्था
७. कमर्शियल इंडेन गॅस विक्री केंद्र २०१८ पासून नियोजित जामगाव CNG पंप

श्री. आनंद मो. कुलकर्णी - चेअरमन
श्री. उमेश शि. ठोंबरे- व्हा.चेअरमन
श्री. डॉ. बी. वाय. यादव - संचालक
श्री. नंदकिशोर ना. देशमुख- संचालक
श्री. रामचंद्र भ. गौरकर - संचालक
श्री . शब्बीर अ. तांबोळी - संचालक
ॲड. राहुल अरुण देशमुख - संचालक
श्री. दिपक दत्तात्रय धेंडुळे - संचालक
सौ. माधुरी सु. गोलकोंडा - संचालक
सौ. भावना भा. नाईकवाडी - संचालक

श्री. रविंद्र मा. माचवे - व्यवस्थापक

**सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद**


---

### श्री भगवंत प्रकटोत्सव दिनास हार्दिक शुभेच्छा !



NIRMA Distributers

## Kulkarni Sales Pvt.



Jamgaon (Barshi)
Office : Shree Plaza
Tanaji Chowk,
Kacheri Road,
Barshi, Dist.- Solapur.
Shop Ph. (02184) 222842
Mo. 9822836826

---



### श्री भगवंत प्रकटोत्सव दिनास हार्दिक शुभेच्छा !



## श्री. गणेश बाळासाहेब तांबे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स, गाळा नं. ५,
सुलाखे हायस्कूल रोड, बार्शी, जि. सोलापूर
मो. ९८८१४२६०७९

---

२९ व्या वर्षात यशस्वी पदार्पण
Mo. 9850579746/9405335658



## पद्मावती ज्वेलर्स

सोने चांदीचे दागिन्यांचे व्यापारी

गाळा नं. ४, तानाजी चौक, कचेरी रोड, बार्शी.